
साप्ताहिक १४ डिसेंबर ८५/ २ रूपये.

# माणूस



## मुंबई... अजूनही वाचवता येईल?

## पुस्तक मेळावा... पोलिसांसाठी

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : पंचविसावे
अंक : एकोणतिसावा

¤

१४ डिसेंबर १९८५
किंमत : दोन रुपये

¤

संपादक
श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी
साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठावरील छायाचित्रात– डावीकडून–सौ. सुधा सोमण सौ अलका गोडे, श्री. वा र. गोडे व श्री. विनायक पणशीकर

¤

मुखपृष्ठ–श्याम देशपांडे

## पुणे वार्ता

### □ ओ भोपाळ !

२ डिसेंबर ८४ ची रात्र भोपाळमध्ये काळरात्र ठरली. युनियन कार्बाईड या बहुराष्ट्रीय कारखान्यात झालेल्या विषारी वायू गळतीने भोपाळमधील लाखो लोकासमोर प्राणसंकट उभे राहिले. अचानक उद्‌भवलेल्या या प्रसगाला तोंड देताना शासकीय यंत्रणेचा घाम निघाला. चालू दशकातला हा सर्वात भीषण अपघात, भोपाळ अजूनही यातून सावरलेले नाही किंबहुना या वायूने नवेनवे प्रश्न निर्माण केले आहेत.

२ डिसेंबर ८५ हा भोपाळ स्मृतिदिन ! पुण्यातही तो पाळण्यात आला; पण त्यात युनियन कार्बाईड आणि मध्यप्रदेश सरकार याचा धिक्कार करण्यापलिकडे फारसे काही झाले नाही. लोकविज्ञान मंच, पुणे यानी २ डिसें. च्या रात्री मूकमोर्चा काढला आणि पथनाट्य सादर केले. सर्व श्रमिक सघटना आणि राजकीय पक्षाच्या सहकार्याने हा मोर्चा काढण्यात आला. पण मोर्चात सामील झालेल्यांची संख्या अक्षरशः हाताच्या बोटावर मोजण्या इतकीच होती ! ३ डिसें. ला दोन सभा झाल्या. दोन्ही सभाना वक्ते आणि श्रोते याचा अत्यल्प प्रतिसाद होता ! हेच आमचे गाभीर्य आणि हीच आमची जाणीव ? 'पुण्याचे भोपाळ होऊ देणार नाही' या घोषणा देण्यात आल्या पण म्हणजे नेमके काय ? की केवळ घोषणाच ?

पुणे हे औद्योगिक शहर आहे मोठमोठे औद्योगिक समूह पुण्याच्या चारही बाजूस आहेत. भोपाळसारख्या दुर्घटनेचा धोका पुण्यात केव्हाही संभवतो. त्याच्या परिणामाची आणि पर्यायाने सुरक्षिततेची काय व्यवस्था पुण्यात आहे ? भोपाळसारख्या भीषण दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक औद्योगिक शहरात लोकशिक्षणाची गरज आहे. केवळ अज्ञानापोटी भोपाळमध्ये हजारो जीवानी प्राण गमावले. या स्मृतिदिनाच्या आधाराने हे लोकशिक्षण साधता आले असते. छायाचित्रे, चित्रपट, व्याख्याने याच्या माध्यमातून लोकाना जाणिव करवून देता आली असती. पर्यावरण आणि प्रदूषणावरही चर्चा घडू शकली असती. तसं बरच काही झालं असत पण आता लिहून आणि बोलून काय उपयोग ? या घटनेची, एवढी का होईना, दखल घेतली गेली हेही नसे थोडके !

### □ होनराव गेले

होनराव कोण हा प्रश्न निदान पुणेकरानी तरी विचारू नये. सो बा. होनराव हे नाव पुणेकराना चागलेच परिचित आहे. निवडणूक लोकसभेची असो की विधानसभेची, होनरावाचे नाव उमेदवाराच्या यादीत असणारच. अगदी नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीतही होनरावाचे नाव मतपत्रिकेवर होतेच आणि साथीला त्यांची खूण चिमणी !

मतपत्रिकेवर त्याचे नाव पाहताना बऱ्याचजणांना हायसे वाटले असेल ! पण केवळ निवडणूक लढवतात म्हणून होनराव प्रसिद्ध होते असे नाही; तर त्याची निवडणूक प्रचाराची तऱ्हा काही और होती. १९८४ च्या निवडणुकीच्या वेळी ते आजारी होते. प्रचारात त्यानी भाग घेतला नाही. पुणेकराना चुकल्या चुकल्या सारखे वाटले 'यंदा होनराव दिसत नाहीत' अशी पृच्छाही कित्येकानी केली.

स्वतःच्याच जहाल हिंदू महासभेचे ते सर्वेसर्वा होते. भगवी टोपी, पाढरा सदरा आणि धोतर अशा वेषात ते शनवारवाड्यावर भाषण ठोकायचे तेव्हा ऐकायला फारसे कुणी नसायचे आणि जे ऐकायचे ते त्याची टर उडवायचे एकूणच होनराव म्हणजे पुणेकराच्या दृष्टीने निवडणुकीतला विनोद होता निवडणूक कुठलीही असो, अपक्ष उमेदवार कसाही असो, लोक त्याला नकळत होनराव ही पदवी देऊन टाकायचे.

असे अजब होनराव आता गेले नुकतेच त्याचे देहावसान झाले. तसे फारसे काही जगावेगळे न करताही ते परिचित राहिले. पुणेकराच्या चेष्टेचा विषय बनून का होईना ते स्मरणात राहतील. लोकसभेच्या आगामी निवडणुकीत त्याची आठवण हमखास येईल. अन्य एखाद्या उमेदवारास होनराव ही बिरुदावली लाभेल !

### □ रंगलेले कवी संमेलन

कवी समेलने नेहमीच रटाळ होतात हा समज ( किंवा गैरसमज) पुण्यात नुकत्याच

झालेल्या एका कवी समेलनाने खोडून काढण्यात थोडे फार यश मिळवले आणि दिवाळीच्या ऐन मोसमात रसिकाना चांगल्या कवितांची सुखद मेजवानी दिली.

ताज्या आणि नव्या दमाच्या कवीना घेऊन 'कविता' सस्थेने सादर केलेले हे समेलन महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पटवर्धन सभागृहात संपन्न झाले. अध्यक्ष होते श्री. ह मो. मराठे ह. मो. आणि कविता याच्यात नक्की काय वितुष्ट आहे माहित नाही. ते कवी समेलनाना पाहुणे म्हणून जातात आणि कवितेवर बोलत नाहीत (किती छान !) कारण काहीही असो; पण कवितेविषयी कवी समेलनात न बोलणारा हा पाहुणा कवी समेलनाकरता नक्कीच आदर्श आहे. (समस्त सयोजकानी नोद घ्यावी.)

निवेदक मंडळीत विनिता पिंपळखरे आणि राजा दीक्षित होते. यात राजा दीक्षिताचा समावेश ऐनवेळी बदली खेळाडू म्हणून झाला. अर्थात त्यानी बाजू सावरली आणि फारसा रसभग होऊन देता आपले काम पार पाडले. शेवटी या निवेदक मडळीनी कविता म्हणून जे काही वाचले ते फारसे रूचकर नव्हते. (त्याचे निवेदन मात्र स्वादिष्ट होते.)

मेहरबान सुरेश भटाची मेहेरनजर सध्या नवीन आणि नव्या जोमाच्या कवीवर असल्याने 'गझलाळू' कवीचा मोठा जमाना पुढे येतोय. एकूणच या समेलनावर गझलकाराचा वरचष्मा होता (आता चष्मेवाल्या हेमत जोगळेकरानी विलबित गझल सादर करून त्याना चष्मा घातला ही गोष्ट वेगळी.) गझल हा मराठी कवितेचा एक चिंतनीय विषय बनला आहे (चिंता आणि चिंतन या दोन्ही अर्थांनी.)

दीपक करंदीकर, रमण रणदिवे, अनिल कांबळे, नदकुमार पुरोहित आणि हेमत जोगळेकर यांच्या कविता चागल्या होत्या तर सतीश इनामदार, सगिता जोशी, श्रीकात तापीकर हे अपेक्षा पूर्ण करू शकले नाहीत.

प्रसाद सावरकराची मध्येच फर्माईश, काही अ-कवीचा समावेश आणि टिळक रोडवरची रहदारी हे सन्मान्य अपवाद वगळता एकूण समेलन छान झाले.

— मनोहर सोनवणे

मुक्काम मुंबई–नायगाव

# पोलीस मेळाव्यात यंदा ... पुस्तकेही

नायगाव–मुबई–इथला पोलीस दिवाळी मेळावा दरवर्षी भरणारा... उधाण उत्साह... गोल चक्र.. मेरी गो... इ मुल, तरुण, वयस्कर याचा विशाल सागरच जणु आनद देणं, आनद घेण एवढाच माफक उद्देश. 'खास सवलत' या आगेळीखाली काय वाट्टेल ते... भेळेपासून थड पेये, आईस्क्रीम्स, शिवणयत्र, तयार कपडे ... इ. प्रकार यातील खरोखर स्वस्त केलेल्या वस्तू कोणत्या व ओव्हर इन्व्हॉयसिग करून मेहेरबानी केल्यासारख्या स्वस्त कोणत्या... ताळा करून पडताळा घेण्याचं ठिकाण ते नक्कीच नव्हत. उत्साहात वहात जाणं एवढच त्या गर्दीच्या सवयीच झाल होतं–वर्षानुवर्ष.

हे असच चालण शक्य होत. त्यात वास्तविक काही वावगं असायचा प्रश्नच नव्हता. दिवाळीसारख्या सणाच निमित्त करून चार घडी मौज करायला हरकत कोणाची असणार ? विकत घेऊन वाचणं किंवा वाचण्यासाठी विकत घेण. ही सकल्पना असू शकते याची जाणीव ज्या स्तरातील समाजाला नसण स्वाभाविक, त्याना प्रत्यक्ष पुस्तके पहायला/हाताळायला मिळाली तर ? कल्पना चागली होती, पण ती कल्पनाच ठरण्याचा सभव अधिक. पण धोका पत्करायचे ठरवले. यासाठी पोलीस कमिशनर बृहन्मुबई, श्री. द. शं. सोमण याच्यापर्यंत पोचणे आवश्यक होते. सौ. सुधाताई सोमण याचा कधी काळचा 'माणूस' मधला लेख आठवला आणि बादरायणी ओळख काढून भेट ठरवली. 'तुमच्याचसाठी चहा घ्यायची थाबल्येय' अशा मोकळ्या स्वागतानं भीड पार चेपली, आणि स्पष्टपणे आमचा हेतू सागितला

आतापर्यंत सुमारे २५ लहान मोठ्या कारखान्यातून तीन दिवसाची अनेक पुस्तक प्रदर्शने आयोजित केली असल्याने आम्हाला यशाबद्दल विश्वास होता. पुस्तके लोकांच्या दारात घेऊन गेल्यास चागला प्रतिसाद मिळतो वगैरे नमनाच्या पाट्या टाकून झाल्या.

बाईंना विचारात पडलेल पाहून 'बराय... येतो' वगैरेची तयारी करून ठेवली. पण चहान घोळ केला आणि बैठक लांबली. बाईंनी बोलायला सुरवात करताच त्याना कल्पना आवडल्याचं जाणवू लागलं. कोणत्या प्रकारची पुस्तके असावीत, माडणी कशी असावी. अशा तपशिलाच्या दिशेने बैठक सरकू लागताच आमच्या या उद्योगाला पहिली टाळीच जणू मिळाल्यासारखे वाटले. अमुक दिवशी साहेबाची भेट घ्या, मीही त्याना सागते असे मोघम आश्वासन मिळाले.

कमिनरसाहेबाच्या केबिनमध्ये कार्ड सरकावताच भेट मिळाली आणि मोजून तिसऱ्या मिनिटाला आम्ही बाहेर ! 'बघु या... मी जरुर प्रयत्न करते... तुम्ही चागलं काम करताय... वगैरे– या बाईंच्या बोलण्यातला खरेपणा हळूहळू जाणवू लागला. बाहेर थाबलेल्या आमच्या बरोबरच्या दोघानाही या आगंतुक शिखर परिषदेतून काही हाती लागले नसल्याचा वास आला. पण परवानगी मिळाल्याचे सागताच दोघेही विस्फारले गेले. सलग अशी जेमतेम दोन–तीन वाक्य आणि मोजून तीन मिनिटात कमिशनरानी आम्हाला मोकळं केलं होत आणि वर संपूर्ण सहकार्याची दक्षणासुद्धा दिली. आमच्या विनती पत्रातला मजकूर काय असणार हे जणू ठाऊक असल्याप्रमाणे वाचण्याची अगर त्यावर विचार करण्याची त्याना गरजच भासली नाही. आवश्यक उपचार म्हणून ते पत्र फायलीत गडप झाले. पुस्तक प्रदर्शनाची आमची कल्पना बहुधा बाईंनी त्याना पटवली असावी असे वाटले. परवानगी मिळाली असली तरी साहेबांची या कल्पनेबाबतची व्यक्तिगत मते काय

असावीत ते कसे समजावे ? असो... परवानगी मिळाली हे आमच्या दृष्टीने महत्त्वाचे.

पुढील कार्यवाहीसाठी यथावकाश आम्ही इतर पोलीस उच्चाधिकाऱ्याकडे टोलाविले गेलो. या मंडळींबाबतचा ऐकीव अनुभव विशेष चांगला नव्हता. तशी पोलीस ही अल्पसंख्य जमात आमच्यासारख्या सर्वसामान्य पापभिरूंच्या ब्लॅकलिष्टातलीच. पोलीसाला आपण घाबरत नसल्याचे स्वतः-लाच बजावण्यासाठी दिसला पोलीस की त्याचं लक्ष वेधून घेऊन सलाम करण्यात बालपण गेलं. तेवढाच यांचा आमचा संबंध. त्यामुळे आता कशी काय ससेहोलपट होईल याची मोठी धास्तीच होती.

श्री. चरणसिंग आझाद यांच्याकडे आमची प्रॅक्टिकल्स सुरू झाली. त्यांच्या केबिनमध्ये आम्हास मुक्त प्रवेश असल्याप्रमाणे वागणूक मिळाली. अग्रक्रमानं आमच्या अडचणी व गरजा विचारात घेतल्या गेल्या. ' And all the problems were officialy taken care of.'

प्रत्यक्ष मेळावा सुरू होण्यापूर्वी सौ. सोमण बाईंशी वेळोवेळी भेटी होऊ लागल्या. कधी फोनवर तर कधी प्रत्यक्ष. दर वेळी या नवीन प्रयोगाबद्दल त्या साशंक वाटत गेल्या. आनंद-मेळाव्यात पुस्तके–संस्कार–उपदेश ज्ञान हे पिंजऱ्यातले कागदी वाघ ठरतील की काय त्यांना भीती. आधीच वाढत चाललेली महागाई, त्यात नेहमीच अपुरा पडणारा पैसा, भरीत भर म्हणून मेळाव्यातील अनेक उथळ प्रलोभने– ज्यांना करमणुकीची साधने म्हणतात– या खाऊ गर्दीत साहित्यशास्त्र विनोद म्हणजे निव्वळ भोंगळ आगाऊपणा– कोण त्या वाटेला जाणार ?

काय वाट्टेल ते झालं तरी स्वीकारण्याची तयारी ठेवून सुधाताई रोज नवीन नवीन कल्पना मांडत गेल्या. पोलीस वस्त्यांतून सर्वदूर वाचनालये सुरू करण्याची कल्पना मांडू लागल्या. इकडे आम्ही मेळाव्यातील पुस्तक प्रदर्शनाच्या तयारीला लागलो. रात्री बाईंचा फोन– 'मी उद्या परत येतेय., एक वाचनालय ताबडतोब सुरू करायचे आहे. पुस्तके हवीत.' 'माणूस'च्या दिवाळी अंकाची धांदल, त्यातून प्रदर्शनाची तयारी. त्यात भर म्हणून हे नवीन काम. सगळं शेड्युल मोडीत काढून त्यांची वाट पहात थांबलो, बाई



**मुख्यमंत्री श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर, श्री. व सौ. सोमण व 'राजहंस'चे पणशीकर**

□

दिल्या वेळेवर हजर पुस्तके निवडताना प्रत्येक पुस्तकांवर कॉमेंट. आम्ही पुस्तकातली माणसं असून एक संपूर्ण पुस्तक वाचायचा योग क्वचितच. बाईंच्या चौफेर वाचनाचे उघड कौतुक करायची चोरी; आमचंच पितळ उघडं पडायचं. एक म्हणता तीन वाचनालयाची पुंजी बाईंनी जमवली– आम्हाला वेठीला धरून, पण खुषीतच आम्ही या वेठबिगारीत गुंतून गेलो.

दि. १ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या दिवाळी मेळाव्याची तयारी कशी काय चाललेय ते पहाण्यासाठी सहज पोलीस ग्राउंडवर फेरी मारली.

नायगाव पोलिस स्टेशनचे श्री. तंबाकू आणि श्री. वालिशेट्टी यांची ओळख करून घेतली. आम्हाला पूर्ण सहकार्य करण्याच्या सूचना वरून आल्यामुळेच वरवरचा हा गोडपणा असावा असे त्यांच्या वागण्यावरून प्रथम वाटले पण तो आमचा पूर्वग्रहदोष होता. मंडळी शेवटपर्यंत आपुलकीनं, गोडीनंच वागली. पोलीसवर्गात पुस्तकांचा प्रसार होणं किती आवश्यक आहे हे आम्ही दमेपर्यंत ते बोलत होते. पोलिसी खाक्या दाखवण्यात ज्यांची हयात जाणार आहे ते खाकीतले पोलीस साहित्याबद्दल आत्मीयतेनं बोलताना पाहून आम्ही आपले हैराण होत राहिलो. हे सगळे पोलीसवाले 'माणसं' ही असल्याचं जाणवायलाही लागलं. यामुळे आमचा उत्साह वाढत गेला हे मात्र नक्की.

मेळाव्यात या वर्षी, पुस्तकंदेखील आहेत, हे पोलिसांच्या कानीकपाळी ओरडून सांगण्यासाठी पोस्टर्स छापली. सगळ्या पोलीस स्टेशन्समधून लावायची हा उद्देश. पण इकडे दहिसरपर्यंत आणि तिकडे मुलुंड-पर्यंत पसरलेल्या पन्नास विभागीय पोलीस मुख्यालयापर्यंत जाणार कोण ? पुस्तकं बांधण्यासाठी त्याचा उपयोग करावा की वजनावर तोलावं, या भ्रमात असताना श्री. टी. श्रृंगारवेल व श्री. चरणसिंग आझाद DCP–ACP मंडळी मदतीला धावली. 'नाईट सर्व्हिस' मार्फत सर्व ठिकाणी त्यांनी पोस्टर्स पाठवण्याची व्यवस्था केली आणि 'नीट लागली पाहिजेत' अशा सूचनाही पाठवल्या.

दि. १ नोव्हेंबर १९८५. नायगाव पोलीस दिवाळी मेळावा. उद्‌घाटक मा. मुख्यमंत्री श्री शिवाजीराव पाटील निलंगेकर. काही अपरिहार्य कारणामुळे फक्त एकशेवीस मिनिटं उशीर. निमंत्रक श्री. द. शं. सोमण यांनी स्वागत केले व सर्व दालनांना भेटी देत देत व्यासपीठावर जाण्यासाठी निघाले. आम्ही बिनीचे मानकरी असल्याच्या तोऱ्यात पहिले दालन अडवून बसलो होतो. एखादा

नेहमीचाच रटाळ स्टॉल असावा अशा समजुतीत आमच्या स्टॉलवर सगळी फौज यांत्रिकपणे आली—पटकन पुढे जाण्यासाठी— आणि पोलिसांच्या दिवाळी मेळाव्यात पुस्तकाची मांदियाळी पाहून ठेचकाळली आपल्याला उशीर झाल्यानं सगळा पुढचा कार्यक्रम खोळंबलाय हे क्षणभर विसरून मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य आणि कमिशनर ऑफ पोलीस-बृहन्मुंबई हे परस्पराना साहित्य व त्याची आवश्यकता याबद्दल माहिती देतायत की काय असे वाटण्याइतके गुतत चालले. आमची ओळख करून देताना व पुस्तकाबद्दल माहिती देताना सौ. सुधाताईंचा उत्साह पहाण्यासारखा होता. पण पुढचे पाच दिवस आम्हा मडळीच काय होणार या चिंतेचं सावटपण त्याच्या चेहऱ्यावर आम्हास स्पष्ट दिसत होत. या कल्पनेमध्ये त्याचाच विशेष पुढाकार असल्यान ते स्वाभाविकच होतं. शेवटी मडळी पुढ गेली आणि सलामी जिंकल्याच्या आनंदात आम्हीही थडावलो.

मेळाव्यासाठी आलेली मडळी पहिल्या दिवशी पुस्तके पाहून विचकतच 'म्होरल्या वाटला' लागत होती. गेला बाजार निदान पाण्याचा स्टॉल उघडायचा सोडून ही मडळी पुस्तके मांडून का बसल्यायत याचा बोध त्याना होऊ शकत नव्हता. 'इकत घेता यील असा माल ठेवा की राव' असा अनाहूत सल्लाही एका दडुक्यान दिला. 'पुस्तके हीदेखील विकत घेण्याची वस्तू आहे' असा मोठा बोर्ड लावण्याच्या तयारीला आम्ही लागलो. इतक्यात, काही धीराची मडळी दबकत दबकत आत शिरू पहात होती. आम्हीही आळस झटकून उठलो आणि उत्साहात माहिती देऊ लागलो एकाला लागून दुसरा—दुसऱ्याला लागून तिसरा असे करत आमचं दालन माणसानी गच्च भरून गेल. उभ राहून वाचत थांबली. गर्दी अनावर झाली. गर्दीला जागेअभावी बाहेर काढण्याचा एकवार प्रयत्न केला पण मडळी पुस्तकात हरवून गेली होती. हळूहळू पुस्तकाची खरेदीही होऊ लागली. अगात वारं शिरल्यासारखी मडळी पुस्तकात रमत चालली होती. शेवटी बारा वाजले तसे आम्ही आवरायला घेतले नाईलाज म्हणून हळूहळू सगळे बाहेर पडले.

पाच तारखेला मेळाव्याचं सूप वाजेपर्यंत रोज हाच अनुभव. क्षणाची उसत नाही. या पोलिसानी बाकी आम्हाला दाखवलं. नेमकं नसलेलं पुस्तक 'असत तर आम्ही घेतलं असतं' किंवा 'मुद्दाम किंमती वाढवून १० % सूट देताय' म्हणून वाद घालायलाही या मडळींनी काही कमी केलं नाही. शालेय पुस्तकाव्यतिरिक्त साहित्याशी कधीही संबंध न आलेली ही सर्व मडळी होती. मोठ्या कारखान्यातील कामगारापेक्षा अर्ध्यानं पगार मिळवणारा पोलीसवर्ग आमच्या अपेक्षेहून अधिक प्रतिसाद देतोय ही घटनाच उत्साहवर्धक होती.

लहान मुलाचा उत्साह दुथडी भरून वहात होता. टारझन—बिरबल, पचतत्र, इसापनीती हे सर्व प्रकार अपुरे वाटू लागले. काय घेऊ आणि काय नाही अशी त्याची अवस्था होऊन गेली. सुरुवातीला आईवडील व पालकमडळींनी तर आमच्या स्टॉलचा धसकाच घेतला होता. पण हळूहळू मंडळी मोकळी होत गेली. मुलाना वेळच्या वेळी संस्कारक्षम बालवाङ्मय वाचू देण आवश्यक असल्याची जाणीव दररोज कणाकणान प्रबळ होत चालली होती.

मुल घोरपडीसारखी पुस्तकाना चिकटली की गर्दी वाढत असे. वाचत थाबू नका असे सांगावे तर 'आम्हाला डिस्टर्ब करू नका' म्हणून आम्हालाच ही मुलं सुनावू लागली. अशा धुद वातावरणात आम्ही रगून गेलो होतो. फार लहान मुले एका मुठीत बद रुपया घेऊन यायची व पुस्तक मागायची. पुस्तकाची किंमत जास्त असली तरी त्याना शक्यतो आम्ही नाऊमेद होऊ दिलं नाही. त्याना पुस्तक मिळताच होणारा आनद लाख मोलाचा होता. याचसाठी केला होता अट्टाहास !

काही वेळा गर्दी अनावर होऊन हिशेबात बऱ्याच गफलती होऊ लागल्या. एका पोलिसाला चुकून पन्नास रुपये जास्त गेले. घरी त्याच्या लक्षात आल्यावर दुसऱ्या दिवशी शोधत येऊन आवर्जून त्याने पैसे परत केले. या व अशा कित्येक घटना अविस्मरणीय !

सगळं श्रेय श्री. व सौ. द. शं. सोमण यानो द्यायला हव. दोघही जातीन कुठऱ्याही निमित्तानं आमच्याकडे यायची, आवर्जून विचारपूस करायची. मुळातच साहित्याबद्दल आदर असल्याशिवाय एवढ अगत्य केवळ अशक्य.

इन्स्पेक्ट्रेस ऑफ पोलीस सौ. रूडकर व श्रीमती गुजर याचीही तीच गत. पोलिसातल्या बायकाचे साहित्यिक संदर्भ एवढे प्रबळ असतील असं वाटलं नव्हतं.

मेळावा सपला पण या मंडळींनी काही आम्हाला सोडल नाही. छाया निंबाळकर नावाची १२–१३ वर्षाची मुलगी. वडील जमादार. तिच्या वयात न शोभणारी प्रौढ पुस्तके तिने वाचली आहेत हे पाहून थोडी गमतच वाटली. मेळाव्याचे पाचही दिवस एका ठराविक पुस्तकासाठी हिनं रोज भडावल.

आमच्याकडे नसलेल्या पुस्तकाबद्दल सातत्याने विचारणारी एक न्यूसन्स व्हॅल्यू म्हणून आम्हीही दुर्लक्ष करीत होतो. पण चार दिवसानी वडिलाबरोबर आमच्या ऑफिसमध्ये आलेली पाहून आश्चर्यच वाटले. बरीच पुस्तके घेतली, बरीच नवी मागवायला लावली. असा या लोकानी आम्हाला जीव लावला.

ही सर्व पोलीस मंडळी आमच्याशी एवढ्या आस्थेनं का वागली ? हा पोलिशी खाक्या एवढा कनवाळू कसा काय ?

'सद्रक्षणाय'पेक्षा 'खलनिग्रहणाय'वर यांचा विशेष भर! रामपाट आडदांड वागणारी ही माणसं आमच्याशी इतक कसं काय जमून गेली हे म्हटलं तर कोड नव्हतच. त्याच्या रुक्ष, निवडुंगी दिनक्रमात व्यक्तिमत्त्वाची साहित्यिक बाजू कायमच उपेक्षित राहिली. कामाच्या स्वरूपापुढे नक्कीच इलाज नव्हता. म्हणूनच सधी मिळाल्यावर मडळी उफाळली आम्ही निमित्तमात्र. कोणी तरी ही पाणपोई त्याना खुली करून देणच आवश्यक होतं. सुधाताईंनी हा बाध फोडला. पाणी वाहू लागलं. एकूणच ही पोलीसमंडळी आम्हाला भावली

—विनायक पणशीकर
राजहंस प्रकाशन, पुणे

## महाराष्ट्र ज्योतिष महामंडळाचे तिसरे अधिवेशन

# ज्योतिष दैववादी नाही, दैव जाणणारे शास्त्र आहे...

पुण्याचे भालचंद्र ज्योतिर्विद्यालय आणि महामंडळ याचे संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय ज्योतिष समेलन आणि महामंडळाचे तिसरे अधिवेशन डिसेंबर ता. १, २ व ३ रोजी पुण्यातील टिळक स्मारक मंदिरात यशस्वीपणे पार पडले. लो. टिळकाचे पंचाग व ज्योतिष सशोधन प्रसिद्धच आहे. महाराष्ट्राचे हल्लीचे अग्रगण्य पचागकर्ते पं. धुंडिराजशास्त्री दाते या समेलनाचे अध्यक्ष होते आणि टिळक स्मारक मंदीर हे स्थळ असा त्रिवेणी सगम या अधिवेशनात झाला.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सकाळी भालचंद्र ज्योतिर्विद्यालयाचे सस्थापक श्री. काकासाहेब अवचट याच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त 'सहस्र द्वद्र दर्शन' आणि सत्कार समारंभ साजरा झाला. समारंभाचे अध्यक्ष होते डॉ. रा. शं. वाळिंबे आणि प्रमुख पाहुणे होते मा. दे. भ. रत्नाप्पा कुंभार. प्रमुख वक्ते बाळ सामत होते.

सुरुवातीलाच ता. ३० नोव्हेंबर रोजी पुण्याचे प्रसिद्ध वृद्ध ज्योतिषी श्री. श्री के. भट याच्या झालेल्या निधनानिमित्त सर्व उपस्थितानी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून त्याना श्रद्धाजली वाहिली.

श्री. रत्नाप्पा कुभार यानी त्याच्या जीवनातील ज्योतिषी लोकाचे आलेले अनुभव व पडताळे मनोरजक भाषेत सागितले.

डॉ. वाळिंबे यानी आपल्या नेहमीच्या विद्वत्ताप्रचूर भाषणात ज्योतिष शास्त्र हे डोळसपणे वापरल्यास कसे उपयुक्त आहे हे सागितले. त्यानी आपल्या भाषणात वेद-पुराणातील या शास्त्रावरील सशोधनाचा व अनुभवाचा उल्लेख केला. सध्याचे ज्योतिषानी संकुचित न रहाता या शास्त्रात अधिकाधिक संशोधन होण्यावर भर दिला. त्यांचे जीवनात आलेले व इतरत्र अनुभवास आलेले या शास्त्राचे अनुभव त्यांनी खुमासदार शैलीत सागितले.

श्री. बाळ सामतांनी श्री. काकासाहेबांचा व त्याच्या भालचंद्र ज्योतिर्विद्यालयाचा अनुक्रमे ८० व्या व ५० व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आणि उपस्थिताचे आभार मानले.

दुपारी 'हॅलेचा धूमकेतू' या विषयावर प्रसिद्ध ज्योतिषी व पचागकर्ते कै. कृ. के. सोमणशास्त्री यांचे चिरजीव श्री. दा. कृ. सोमण याचे स्लाईड-शोसह अत्यत माहितीपूर्ण व मनोरंजक व्याख्यान झाले. यात त्यानी खग्रास सूर्य ग्रहणाच्यापण स्लाईडस् दाखविल्या तसेच त्यानी धूमकेतूचे विविध प्रकारपण स्लाईडस्द्वारे दाखविले. सध्या जगभर 'हॅलेच्या धूमकेतू'ची उत्सुकता आहे आणि संशोधनाची साधने वाढली आहेत. त्यामुळे आता काही महिने दिसणाऱ्या धूमकेतूचा सखोल, सविस्तर अभ्यास होईल हे सागितले.

समेलनाध्यक्ष व राजकीय आणि जागतिक ज्योतिषाचे 'स्पेशालिस्ट' श्री. श्री. के. केळकर यानी समारोपाच्या भाषणात श्री. सोमण याच्या उत्कृष्ट व्याख्यानाबद्दल अभिनंदन केले पण हसत हसत कोपरखळी मारली की श्री. सोमण यानी ग्रहण व धूमकेतू याचे जग, वातावरण व विविध राष्ट्रे यावर काय परिणाम होतील हे सागण्याचे टाळले ते मी सागतो असे म्हणून थोडक्यात १९८६ च्या मार्च ते मे पर्यंत जपानमध्ये भूकप होईल आणि याचेमुळे व 'लढाऊ' ग्रह-युत्या व त्याचे इतर परिणाम यामुळे मध्यपूर्वेत अधिक विध्वस संभवतो; भारताला काळजी करण्याची जरुरी नाही हे सांगितले. मेक्सिको भूकप त्यानी आधीच सागितला होता व त्याचे हे भाकीत खरे झाले याचाही त्यानी उल्लेख केला.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी महाराष्ट्र ज्योतिष महामडळाच्या तिसऱ्या अधिवेशनाला प्रारभ झाला. या अधिवेशनाचे उद्घाटन करणार होते मा. ना. अनतरावजी थोपटे; पण आयत्या वेळी मंत्रिमंडळाचे कार्यक्रम निघाल्यामुळे ते आले नाहीत. म्हणून मा. डॉ. पतगरावजी कदम, आमदार व सरचिटणीस, भारती विद्यापीठ, पुणे यानी या अधिवेशनाचे उद्घाटन केले. श्री. कदम यानी लहानपणापासून ज्योतिषांनी सागितलेले भविष्य भावी जीवनात कसे खरे ठरले याचे विविध 'किस्से' सागितले. पुष्कळ पुढारी जाहीरपणे ज्योतिष शास्त्रावर त्यांचा विश्वास नाही म्हणतात पण गुपचुपपणे सतत ज्योतिषाचा सल्ला घेतात हे सागितले आणि स्पष्टपणे जाहीर केले की त्यांचा या शास्त्रावर पूर्ण विश्वास आहे.

नतर नाशिक समेलनाध्यक्ष 'कालनिर्णय' पंचागकर्ते व ज्योतिषी श्री. जयंत साळगावकर यानी या शास्त्राचे महत्त्व आणि अनुभव विनोदी शैलीत कथन केले आणि जाहीर आश्वासन दिले की मडळाला किंवा सभासदाना पैशाच्या अभावी त्याचे सशोधन अडणार नाही व यासाठी जे आर्थिक साहाय्य हवे आहे ते, ते स्वत: व इतराकडून मिळवून देतील.

यानंतर या समेलनाचे अध्यक्ष पं. धुडीराज शास्त्री दाते, सोलापूरकर ('दाते पचांग' कर्ते) याचे अत्यत विद्वत्तापूर्ण भाषण झाले. ज्योतिषशास्त्र वेदागशास्त्र आहे, पुण्यासारख्या विद्येचे माहेरघर असलेल्या ठिकाणी आणि त्यातही ज्योतिषप्रेमी आणि संशोधक लोकमान्य टिळकाचे स्मृतिस्थान असलेल्या टिळक स्मारक मदिरात हे अधिवेशन संपन्न होत असल्याबद्दल व या समेलनाचे त्याना अध्यक्षपद दिल्याबद्दल आभार मानले.

ज्योतिष हे सपूर्णपणे भारतीय शास्त्र आहे ते ग्रीक किंवा रोमन इ. परदेशातून आपणाकडे आलेले नाही हे विविध आधारानी त्यानी सिद्ध केले आणि या शास्त्रात उपयुक्त सशोधन व भर घालणाऱ्या पूर्वीच्या व विद्यमान व्यक्तीचा आदराने उल्लेख करून त्याना अभिवादन केले.

ज्योतिष शास्त्राची तीन प्रमुख अगे (१) सिद्धात (२) संहिता (३) होरा याचे विवेचन त्यानी केले. 'सिद्धांत' विभागात खगोलीय गणित, पंचाग (तिथी, वार, नक्षत्र, योग, करण इ.) समाविष्ट आहेत. 'संहिता' विभागात मदिनीय ज्योतिष पर्जन्य व मुहूर्त प्रकरण असून, हवामान, धरणीकप इ. समाविष्ट आहेत तर 'होरा' विभागात व्यक्तीगत भविष्य शास्त्र समाविष्ट आहे हे विशद केले.

ज्योतिषशास्त्र हे आता गूढ विद्या नाही तर ते इतर प्रगत शास्त्राप्रमाणे एक प्रगत शास्त्र आहे आणि या शास्त्रावर सध्या भारतापेक्षा परदेशात जास्त मासिके प्रसिद्ध होतात व त्याचा खप लाखाचे घरात आहे. या शास्त्रावर विश्वास नाही म्हणून सांगणारे पुढारी कसे गुप्तपणे ज्योतिषाचे मागे असतात हे सांगून ही 'आत एक बाहेर एक' वृत्तीची मीमांसा केली. ज्योतिषशास्त्र हे दैववादी शास्त्र नसून दैव जाणणारे शास्त्र आहे यात संशय नाही. तरी पण इतर शास्त्राप्रमाणे या शास्त्रात पण सर्वांगिण संशोधन होणे आवश्यक आहे हे त्यांनी आवर्जून सांगितले.

त्याच दिवशी दुपारी न्युमरॉलजी (सख्या शास्त्र) या विषयावर श्री. नरेंद्र देसाई यांचे अध्यक्षतेखाली श्री. एम. कटककर यांचे व्याख्यान झाले. संख्या शास्त्राचे आधारे भविष्य सांगण्याचे प्रकार त्यांनी विशद केले. यानंतर हवामान शास्त्रावर परिसवाद झाला.

सायंकाळचे अधिवेशन 'वैद्यक ज्योतिष' शास्त्रावर होते. या अधिवेशनाचे सूत्रचालन श्री. गो. द. गाडगीळ यांनी केले व यात सहभागी होणाऱ्या व्यक्तींचा परिचय करून दिला. अध्यक्षस्थान जागतिक कीर्तीचे सुप्रसिद्ध स्त्री रोग चिकित्सक व ज्योतिषशास्त्र अभ्यासक डॉ. भा. नि. पुरंदरे यांनी भुषविले होते. वैद्य गणेशशास्त्री शेंडे, डॉ. सुरेंद्र पै, डॉ. कालकुंद्रीकर, श्री. शरद आबकर इ. व्यक्तींनी यात भाग घेतला. डॉ. पुरंदरे यांनी त्यांना ज्योतिष व हस्त सामुद्रिक शास्त्राचा त्यांच्या व्यवसायात व रोग निदानात किती महत्त्वपूर्ण उपयोग झाला हे सांगितले. श्री. गाडगीळ यांनी खरी जन्मवेळ नक्की नसेल तर कुंडलीत चुका होतात किंवा कुंडली नसते अशा व्यक्तींचे भविष्य कुंडली हस्त–पद–तळ सामुद्रिकाचे साहाय्याने मानसिक व शारीरिक आरोग्याचे निदान व उपाय कसे करता येतात तसेच तब्येत सांभाळून कोणत्या क्षेत्रात त्यांनी कार्य करावे ह्याचे मार्गदर्शन करता येते हे पण विशद केले.

डॉ. पुरंदरे यांनी रुद्राक्ष शास्त्राचा ज्योतिषशास्त्राबरोबर आरोग्य व इतर निदानात कसा उपयोग होतो हे पण या अधिवेशनात व दुसऱ्या दिवशी पण सप्रयोग स्पष्ट केले.

ज्योतिषाकडे येणारे लोक अडचणीत असतात. त्यांचे अडचणीचा गैरफायदा घेऊन त्यांना घाबरवून सोडण्यापेक्षा त्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांचे मनोबल वाढवावे हे श्री. गाडगीळ यांनी आवर्जून सांगितले.

अधिवेशनच्या तिसऱ्या दिवशी सकाळी ज्योतिष शिक्षण कोणत्या प्रकारे करावे व या शास्त्राबद्दल असणारे गैरसमज दूर करण्यासाठी लोकांत जागृती कशी करावी यावर परिसवाद झाला. अध्यक्षस्थानी होते श्री. जयंत साळगावकर व सहभागी होते 'कुंडलीची भाषा' ३ ग्रंथात प्रकाशित करणारे महामंडळाचे उपाध्यक्ष श्री. कृष्णराव वाईकर, श्री. व दा. भट, श्री. आ व. जयकर, श्री. उदय बापट, प्रा. रमणलाल खटाव यांनी आपले विचार सांगितले.

नंतर श्री. केदार गोस्वामी यांचे 'भाग्य रेखा' या विषयावर लंडनमधील प्रसिद्ध ज्योतिषी श्री. एम. के. गांधी यांचे अध्यक्षतेखाली व्याख्यान झाले.

सायंकाळी 'शंका समाधान' या सत्रात ज्योतिषाचे कडून आलेल्या शंका व प्रश्न यांचेवर परिसवाद झाला. यात श्री म. दा. भट, श्री. व. दा. भट, श्री. गो. द. गाडगीळ श्री. प्र. सु. आंबेकर, श्री. ज्योतिंद्र हसबे, श्री. सुहास डोंगरे, सौ. संध्या शेलगावकर (स्वरनाद ज्योतिषी) श्री. के. जी. कुलकर्णी यांचा सहभाग होता. प्रश्न विविध प्रकारचे होते. कुंडली विषयक प्रश्नांची उत्तरे श्री. व. दा व म दा. भट यांनी, कृष्णमूर्ती पद्धतीवर श्री ज्योतिंद्र हसबे व श्री. डोंगरे यांनी उत्तरे दिली. आणि हस्तसामुद्रिक शास्त्रावर श्री. कुलकर्णी यांनी आणि श्री. गाडगीळ यांनी हस्त सामुद्रिक–पदतल सामुद्रिक, जन्म कुंडली व प्रश्नकुंडली या शास्त्राचा समन्वय साधून शंका व प्रश्नांची उत्तरे दिली.

तिन्ही दिवशी ज्योतिषाची व ज्योतिष प्रेमी व्यक्तींची उपस्थिती उत्तम होती.

सायंकाळी समारोप समारंभात महामंडळाचे सरचिटणीस श्री. श्री. भट यांनी आतापर्यंतच्या कार्याचा आढावा घेतला व पुढील योजना सांगितल्या. संमेलनाध्यक्ष श्री. दाते शास्त्री यांचे समयोचित समारोपाचे भाषण झाले. आणि संमेलनाची यशस्वी सांगता झाली–

–श्री. गो. द. गाडगीळ


ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ आयडानी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

डॉ.
आयडा स्कडर
सौ. वीणा गवाणकर
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

एक होता
कार्व्हर
सौ. वीणा गवाणकर
तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

शहाबानो प्रकरण

# मुस्लिम जातीयतेला खतपाणी कुणी घातले?

अभय गोखले

**श**हाबानो प्रकरणी सुप्रीम कोर्टाने ऐतिहासिक निर्णय दिल्यावर भारतातील मुस्लिमधर्मियांकडून ह्या बाबत तिखट प्रतिक्रिया अपेक्षित होतीच. मात्र सुप्रीम कोर्टाच्या निकालाच्या बाजूने बोलणारे मुस्लिमबांधव इतके कमी निघतील असे वाटले नव्हते. ज्या शहाबानोचा हा ऐतिहासिक लढा लढवल्याबद्दल सर्वत्र सत्कार झाला, तिच्यावर दडपण आणण्यात शेवटी मुस्लिम धर्मातील जात्यंधच लोक यशस्वी झाले व सुप्रीम कोर्टाने आपला निकाल बदलावा व शरियतमध्ये हस्तक्षेप करू नये असे जाहीर करण्यापर्यंत तिची मजल गेली. तिच्या या मागणीचा सुप्रीम कोर्टाच्या निकालावर काही परिणाम होणार नाही हे गृहित धरले तरी मुस्लिम धर्मातील मुल्लामौलवी आपल्या जमातीतील बडखोर लोकावर कशी दडपणे आणू शकतात हेच या घटनेने सिद्ध होते. यातील एक समाधानाची गोष्ट म्हणजे शरियतची आगळीक केल्याबद्दल शहाबानो व तिच्या मुलाना जमाती-तील प्रतिगामी लोकाकडून मारहाण झाली नाही.

मुस्लिमामध्ये असलेला कमालीचा मागासलेपणा व अशिक्षितपणा, या गोष्टी मुल्लामौलवीना जमातीतील बहुसंख्य लोकांना आपल्या धार्मिक पगड्याखाली ठेवण्यात यशस्वी होतात. याविरुद्ध बडखोरी करणारावर बहिष्कार तरी टाकला जातो किंवा त्यांच्या सभा व मोर्चे उधळवले जातात व त्यांना काफर ठरवले जाते. मुस्लिमातील अशिक्षितपणा कायम राखण्यात मुल्लामौल्लवीकडून हातभार लावला जातो. त्या योगे त्यांच्या गळी काहीही उतरवणे त्याना सोपे जाते व निवडणुकात जो पक्ष त्यांच्या वेडगळ मागण्याना पाठिंबा देईल त्या पक्षाला एकगठ्ठा मते मिळवून देण्यात हे धार्मिक पुढारी यशस्वी होतात. कॉंग्रेससह सर्वच पक्षानी मुस्लिमाची जास्तीत जास्त मते मिळविण्यासाठी निरनिराळ्या निवडणुकीत मुस्लिम धर्मातील मुल्लामौलवी व इमामाना हाताशी धरलेले आहे. यातूनच मते मिळविण्यासाठी एखाद्या जमातीचा अनुनय करण्याची प्रवृत्ती बळावली व त्या जमातीतील धर्मगुरूंना महत्व मिळून प्रतिगामी व जातीयवादी प्रवृत्ती वाढीस लागल्या. याचा दोष फक्त कॉंग्रेसकडेच नसून जनता पक्षही त्यात मागे नाही. कारण बॅरिस्टर जीनांनाही लाजवतील असे शहाबुद्दीन यांच्यासारखे मुस्लिम नेते जनता पक्षाकडे आहेत. त्यांच्या विखारी वक्तृत्वाकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष केले जाते ते मुस्लिम जमातीची मते मिळविण्यासाठीच. हे जातीयतावादी नेते स्वपक्षाच्या श्रेष्ठ नेत्यांवर टीका करतात ती खपवून घेतली जाते व ते वारवार निवडणुकीत पडूनही आम्ही मुस्लिम जमातीच्या लोकाना तिकीट देतो या उदात्त भावनेचे प्रदर्शन करण्यासाठी त्याना पुन्हा पुन्हा उमेदवारी दिली जाते. एखाद्या जमातीचे लाड या राजकीय पक्षाकडून पुरवले जातात त्याच्या अयोग्य मागण्याना हे राजकीय पक्ष पाठिंबा देतात. तेव्हा ही जमात डोक्यावर बसल्यास तो जमातीचा दोष नसून राजकीय पक्षाचा आहे आणि या राजकीय पक्षाची मताची लाचारी संपेल तेव्हा हिंदू–मुसलमान, हिंदू–शीख, हिंदू–ख्रिश्चन यांच्यातील संघर्षाला पायबंद बसेल. पाकिस्तान, बांगलादेश या देशातील अल्पसंख्याकाची परिस्थिती वेगळी असली (तेथील पोलिटिकल सेटअपमुळे) तरी तेथील राजकीय पक्ष भारतातील पक्षाप्रमाणे मतांची लाचारी करत नसल्याने तेथील अल्पसंख्य डोक्यावर बसण्याचे तर सोडाच पण त्यांना बहुसंख्याकांच्या पायाजवळही जागा नाही.

**काश्मिरमधेही तेच!**

सुप्रीम कोर्टाच्या महत्त्वपूर्ण निकालामुळे खरे तर घटस्फोटाच्या बाबतीत मुस्लिम स्त्रीवर जो भयानक अन्याय होतो तो दूर होणार आहे व तिला समाजात मानाने वावरता येऊन मुस्लिम धर्मात घटस्फोटाच्या बाबतीत नवऱ्याला जे फाजील अधिकार मिळाले आहेत, ज्यामुळे स्त्रीचे पोतेरे होते, त्याला पायबंद बसणार आहे व नवऱ्याला, बायकोला घटस्फोट देताना दहा वेळा विचार करावा लागणार आहे. परंतु हा फायदा मुस्लिम स्त्रीला मिळवून देण्यात मुस्लिम मौलवीचा तोटा आहे. कारण त्यामुळे त्याचा जमातीवरील पगडा नाहीसा होईल व त्यामुळे राजकीय पक्षातील त्याचे वजन कमी होईल कारण ते एकगठ्ठा मते राजकीय पक्षाना मिळवून देऊ शकणार नाहीत. जोपर्यंत शरीयतपेक्षा भारतीय घटना श्रेष्ठ आहे व इस्लामपेक्षा राष्ट्र मोठे आहे हे मुस्लिमातील बहुसंख्याकांना समजत नाही तोपर्यंत हे असेच होत रहाणार. मुस्लिम लोगलाच कशाला दोष द्यायचा, महाराष्ट्राचे एक मंत्री जावेदखान व केरळचे उपमुख्यमंत्री याचे याबाबतीतील वक्तव्य पुरेसे बोलके आहे. मग यातूनच स्वराष्ट्राबद्दलची आपुलकीची भावना नाहीशी होऊन आपल्या धर्माच्या लोकाची ज्या राष्ट्रामध्ये सत्ता आहे त्याच्याबद्दल प्रेमाची भावना वाढीस लागते. मात्र एखादा धर्म, एखादे राष्ट्र एकसंध राखू शकत नाही ही गोष्ट या लोकाच्या लक्षात येत नाही. साध्यासाध्या गोष्टीचे भांडवल करण्यात येते. भारतीय घटनेने मिळणारे अधिकार हवेत, परंतु घटनेची कोणतीही बंधने नकोत ही विचारसरणी राज्यकर्त्यांकडून खपवून घेतली जाते. आपण अल्पसंख्य आहोत या नावावर

जातीय व विखारी वक्तव्ये खपवून घेतली जातात. एखादा विभाग म्हणजे या जमातीचा अड्डा किंवा सस्थान बनते व हे लोक पोलिसावरही हात टाकण्यास कचरत नाहीत. नळबाजारात अनधिकृत बाधकामे व स्टॉल्स पाडण्यास महापालिका कर्मचारी गेल्यास त्याच्यावर हल्ला केला जातो व या प्रकरणास जातीय रंग देण्यात येऊन खरा उद्देश बाजूलाच रहातो. महापालिका कर्मचाऱ्यावर हल्ला करण्याचा प्रकार इतरत्र खपवून घेतला जाईल का, याला राज्यकर्त्यांकडे उत्तर सापडणार नाही. याबाबतीत घाबरून वागल्याने मग उत्साही मंडळीना ऊत येतो व आपले कोणी वाकडे करू शकणार नाही या भावनेने भारतीय क्रिकेट संघ अथवा हॉकी सघ पाकिस्तानविरुद्ध सामना हरल्यास राजरोसपणे फटाके वाजवण्यात येऊन आनदोत्सव साजरा केला जातो. या प्रवृत्तीला पायबद घालता येणार नाही का? ज्या लोकाना स्वतःच्या राष्ट्राबद्दल प्रेम नाही, आत्मीयता नाही, त्या लोकांकडून राष्ट्राचे काय भले होणार? अर्थात सगळेच लोक असे असतात असे म्हणणे योग्य ठरणार नाही. पण दुर्दैवाने त्याची संख्या कमी आहे. याबाबतीत या उत्साही लोकाना धाक दाखवून किंवा पाकिस्तानात चालते व्हा म्हणून ते सुधारणार नाहीत तर ते असे का वागतात याच्या मुळाशी जायला हवे. राष्ट्रापेक्षा धर्म श्रेष्ठ आहे ही भावना त्याच्या मनात सतत बिंबवली जाते, त्यामुळे हे सर्व घडते. आज काश्मीरमध्ये काय चाललंय? राष्ट्रद्रोही शक्ती उघडपणे वावरत आहेत. पाकिस्तान जिंदाबाद, भारत मुर्दाबाद, झिया जिंदाबाद यासारख्या घोषणा दिवसाढवळ्या दिल्या जात आहेत. पाकिस्तानी घुसखोराची वर्दळ वाढली आहे. शहा सारखा माणूस सत्तेवर असल्याने तो या देशद्रोही शक्तीना काबूत ठेवू शकत नाहीये.

### जातीयवाद्यांची दादागिरी

केरळमध्ये काँग्रेसच्या आशीर्वादाने मल्लापुरम सारखे विभाग आज जात्यध लोकाचे अड्डे बनले आहेत. केरळमधील काँग्रेसप्रणीत आघाडीचे सरकार प्रामुख्याने मुस्लिम लीगच्या पाठिंब्यावर अवलबून असल्याने त्यांच्या अयोग्य व जातीयवादी मागण्या मान्य करण्यात तेथील काँग्रेसप्रणीत आघाडीच्या सरकारला जरासुद्धा सकोच वाटत नाही. त्यातच ऑल इंडिया मुस्लिम लीग व इंडियन युनियन मुस्लिम लीग याचे एकीकरण झाल्याने त्याची बार्गेनिंग पॉवर वाढली आहे. एकीकडून मुस्लिम व दुसरीकडून ख्रिश्चन नेते सतत ओढाताण करत असल्याने मुख्यमंत्री करुणाकरन याना तारेवरची कसरत करावी लागत असली तरी बहुसख्याक हिंदूची मात्र केविलवाणी अवस्था झाली आहे. त्याना त्राता कोणी उरलेला नाही. मात्र मल्लापुरममध्ये मोपल्यांच्या इतक्या दहशतीखाली हिंदू वावरतात की पाकिस्तान किंवा बागलादेशातही त्यांच्यावर असा करुण प्रसग येत नसावा.

प्रोबाच्या प्रतिनिधीने लिहिलेल्या रिपोर्टनुसार मल्लापुरममध्ये मोपल्याच्या वाढत्या दहशतीमुळे हिंदूचे जीवित असुरक्षित बनले आहे. तेथील मशिदीची सख्या, मोपल्याची दांडगाई पहाता व एकंदर मुस्लिम वातावरणाची छाप पहाता मल्लापुरम भारतात आहे का पाकिस्तानात आहे अशी एखाद्याला शका यावी. ज्या नबुद्रीपादनी (केरळचे माजी मार्क्सवादी मुख्यमंत्री) मल्लापुरमच्या वेगळेपणास हातभार लावला, त्यानाही उशिरा का होईना आपली चूक समजली असून मल्लापुरममध्ये आपल्याबद्दल फारसे चागले बोलले जात नाही हे त्याना माहीत झाले असणारच. मल्लापुरममध्ये मोपल्यांचे वर्चस्व व दादागिरी इतकी वाढली आहे की त्याची जास्ती वस्ती असलेल्या भागात शुक्रवारी हिंदू दुकानदारानाही भीतीने दुकाने बद ठेवावी लागतात. रमझानच्या उपवासाच्या काळात हिंदूनाही मोपल्याची जास्त वस्ती असलेल्या भागात दिवसा उघडपणे काही खाता येत नाही. फिशिंगला शुक्रवारी जाता येत नाही. रमझानच्या काळात दिवसा चहाची दुकाने बंद ठेवावी लागतात. पाकिस्तान किंवा बांगलादेशातही असे निर्बंध हिंदूवर नसतील. हिंदूवर मोपल्याकडून अत्याचार केले जातात व हे सगळे का होते? कारण केरळ सरकार या बाबतीत हस्तक्षेप करत नाही. कारण त्यामुळे मंत्रिमंडळातील मुस्लिम लीगचे लोक बिथरतील व पाठिंबा काढून घेतला तर काँग्रेसप्रणीत आघाडीच्या हातून सत्ता जाईल. तेव्हा सत्ता टिकविण्यासाठी मोपल्याचे लाड केले जातात. त्यांच्यामधील राष्ट्रद्रोही प्रवृत्तीना पायबंद घातला जात नाही, कारण राष्ट्राच्या ऐक्यापेक्षा त्याना सत्ता टिकवणे महत्त्वाचे वाटते. मग ते मोपल्याना हात कसा बरे लावणार? खुद्द केरळचे मुस्लिम लीग घटकाचे उपमुख्यमंत्री नाहाय विधानसभेत सागतात की सुप्रीम कोर्टाचा शरीयतवरील निकाल त्याच्यावर बधनकारक नाही, तेव्हा ते खपवून घेतले जाते. मग मोपल्याची दाडगाई, त्याचे हिंदूवरील अत्याचार, त्याच्यातील देशद्रोही प्रवृत्ती खपवून घेतल्या गेल्यावर त्यात आश्चर्य मानण्यासारखे काहीच नाही. □


## राजहंस प्रकाशन

# कुंपण आणि आकाश

मंगला गोडबोले

वीस रुपये

बाईच सुख? तिला दुःख आहेच कुठे?
हा युक्तिवाद एकीकडे आणि
आपल्या सांस्कृतिक, सामाजिक संदर्भात
बाईला सुख मिळणं शक्य नाही
ही भूमिका दुसरीकडे.
खरं तर या दोन टोकांमध्येच
स्त्रीजीवनाच्या अमर्याद शक्यता,
सामर्थ्य आणि मर्यादा असण्याची
शक्यता आहे. त्या शोधण्याचा
एक प्रयत्न !

# आठ कलमे : मुंबई वाचवण्यासाठी

रामदास टेमगिरे

मुंबईचा विध्वंस टाळण्यासाठी आठ कलमी उपाय पदपथावर झोपड्या बांधून रहाणारे सुमारे तीन लाख लोक आज भयग्रस्त स्थितीत आहेतच, पण अनधिकृत झोपड्यात रहणारे किमान तीन लाख लोकही चिंताग्रस्त आहेत. कारण सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला आहे की, 'पावसाळ्यानंतर एक महिन्याने म्हणजे ३१ ऑक्टोबरनंतर फूटपाथवरील तसेच सार्वजनिक उद्दिष्टासाठी राखून ठेवलेल्या जमिनीवरील झोपडपट्ट्या किंवा कोणतीही अनधिकृत बांधकामे नोटीस न देता पाडण्याचा मुंबई महापालिकेला हक्क आहे.' सरन्यायाधीश यशवंतराव चंद्रचूड यांच्या प्रमुखत्वाखाली पाच न्यायमूर्तींच्या बेंचने हा निर्णय दिला तेव्हा पावसाळा होता. आता महाराष्ट्रात दुष्काळाची भीषण छाया पसरून पावसाळा संपला आहे. १९७२ पेक्षाही यंदाचा महाराष्ट्रातील दुष्काळ भयावह असून हजारो दुष्काळग्रस्त नोव्हेंबरमध्ये मुंबईत येतील असा अनेकांचा तर्क आहे. त्याचवेळी फूटपाथ आणि सार्वजनिक उद्दिष्टासाठी राखलेल्या जमिनी मोकळ्या करण्यासाठी झोपडपट्ट्या पाडून हजारो लोक बेघर करण्यात येतील अशा दाट बातम्या आहेत. झोपडपट्टीवासियांचे मोर्चे दररोज निघत आहेत. जाहीर सभा व परिषदा घेतल्या जात आहेत. जहालात जहाल भाषा वापरून मुंबई महापालिकेच्या झोपड्या तोडण्याच्या मोहिमेविरुद्ध इशारे देण्यात येत आहेत या गंभीर प्रश्नावर महाराष्ट्र सरकारने अजून कोणतेच धोरण ठरविले नाही. आता महाराष्ट्र सरकारचे नेते आणि मुंबई महापालिकेचे नोकरशहाही असेच सत्तेच्या धुंदीत असून त्याच मस्तीत त्यांनी कोणत्याही सखोल योजनेशिवाय झोपड्या तोडण्याच्या मोहिमा केल्या तर मुंबईत बेबंदशाही माजण्याचा धोका आहे. जर दंगली सुरू झाल्या तर आवरणे कठीण अशी आजच मुंबईची अराजकी अंदाधुंदी आहे. कारण एका बाजूला लक्षावधी रुपये खाऊन बड्या भाडवलदारांना व बिल्डरना जमिनी घ्यायच्या आणि दुसऱ्या बाजूला लक्षावधी लोकांच्या झोपड्या पाडून टाकायच्या असला सत्तेचा आणि मत्तेचा मद फार महागात पडेल.

मुंबईत आज जे लोक आहेत त्यांची कसून तपासणी करून सविस्तर ओळखपत्रे द्या, मुंबईच्या जमिनीचे राष्ट्रीकरण करून एक-दोन खोल्यांचे लाखो गाळे बांधून ओळखपत्र – धारक बेघरांना द्या आणि आजच्या रहिवाशांना निवारा व नोकरी देईपर्यंत नवीन येणारा लोंढा कायद्याने थांबवा पण मुंबईतील जमिनीचे राष्ट्रीकरण करायचे म्हणजे बड्या धनिकांना भूखंड विकून सत्ताधाऱ्यांना, नोकरशहांना व राजकीय नेत्यांना पैसे हडप करता येणार नाहीत. आणि म्हणून या योजनेबाबत सामसूम आहे. लाखो रुपयांचा काळा पैसा मराठी माणसाजवळ नसल्याने गरीबांना हटविणार म्हणजे मराठी माणसांनाही हटविणार ? तेव्हा सरकारनेच सर्व जमीन ताब्यात घेऊन एकदोन खोल्यांचे लाखो गाळे बांधले पाहिजेत व झोपडपट्टीवासियांना सदर गाळे देऊन झोपडपट्टी हटविली पाहिजे. त्याचवेळी नवा लोंढा थोपविला पाहिजे. नाहीतर मुंबापुरी म्हणजे काळा बाजारवाल्या परप्रांतीय धनिकांची नगरी होईल. मग झोपड्या तोडण्याची मोहीम सुरू झाली तर मुंबापुरीतच किमान दोन लाख रुपये काळा पैसा असलेल्यांनाच यापुढे रहाता येईल असा त्याचा अर्थ होईल.

मुंबईतील गगनचुंबी इमारतींचे बांधकाम एकजात बेकायदा झाले आहे. मजलेच्या मजले बेकायदा आहेत. पण त्यांची वीटही पाडली जात नाही. ही माणसे मुंबईतच रहाणार. कारण त्यांना जायला सांगताच येत नाही. रोज ३०० कुटुंबे नव्याने येणार त्यातून कोणती परिस्थिती उद्भवेल ? आज जनतेला सर्व ढोंग नि सोंग समजली आहेत. जरी जनता हतबल वाटत असली तरी सहनशीलतेला मर्यादा असते.

मुंबईची दुरवस्था अशीच चालू राहिली तर आणखी काही वर्षातच मुंबई अराजकामुळे उध्वस्त होईल. नाहीतर तुफानी पर्जन्यवृष्टी खवळलेल्या दर्याला साथीदार बनवून मुंबईला जलसमाधी देईल. महापालिका आयुक्त जमशेट कांगा यांनी सरळ सांगून टाकले आहे की, ताशी २५ मिलिमीटरपेक्षा म्हणजे एक इंचापेक्षा अधिक पाऊस पडला की पाण्याचे तलाव मुंबईत ठिकठिकाणी तयार होणारच ! मुंबापुरीची शोकांतिका होणार आहे. कारण मुंबईची जमीन व जागा विकून अफाट काळा पैसा कमावण्याची चटक लागलेले राज्यकर्ते, नोकरशहा, धनिक आणि बुद्धिवंत घटनातज्ज्ञ हे जाणूनबुजून अटळ निर्णय पुढे ढकलत आहेत

## अटळ निर्णय

मुंबई मेट्रोपोलिटन रिजनच्या लोकसंख्येची वाढ बेसुमार सुरू आहे संयुक्त महाराष्ट्र निर्मितीनंतर एक वर्षाने म्हणजे १९६१ साली ४१ लाख ५२ हजार लोकसंख्या होती. १९७१ साली ५९ लाख ७२ हजार आणि १९८१ साली ८२ लाख २ हजारावर गेली म्हणजे फक्त वीस वर्षात लोकसंख्या दुप्पट झाली विसावे शतक संपून एकविसाव्या शतकात पदार्पण केले जाईल तेव्हा मुंबई मेट्रोपोलिटन रिजनची लोकसंख्या १ कोटी २० लाखावर जाईल हा अंदाज यावरून समर्पक ठरतो.

मुंबई हे दक्षिण–उत्तर पसरलेले द्विपकल्प आहे. सात बेटे जोडून निर्मिलेले हे द्विपकल्प आहे यामुळे मुंबईचा विस्तार करता येत नाही. दिल्लीची सीमा वर्तुळाकार वाढविता येईल पण मुंबईत ही शक्यताच नाही. अर्थात लोकसंख्या बेसुमार वाढल्याने स्वच्छ हवा, स्वच्छ व रुंद रस्ते, पाणीपुरवठा, वहातुक, हॉस्पिटले, शाळा, किमान निवारा आदी जीवनावश्यक सुविधा पुरविता येणारच नाहीत. यावर नवीन परप्रांतीयांना येऊ न देणे हाच एकमेव उपाय आहे. पण हा अटळ निर्णय केवळ स्वार्थाने पुढे ढकलला जात आहे.

मुंबईत रहाणाऱ्या लोकांपैकी नव्वद टक्के लोक अत्यंत वाईट स्थितीत रहातात व

जगतात. त्यांच्या दुस्थितीवर प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय विश्वासही बसणार नाही. अजित केरकर कमिटीच्या अलीकडच्या अहवालानुसार १९८१ साली मुंबईत किमान ३७ लाख लोक गलिच्छ झोपडपट्टीत रहात होते आणि १० लाख लोक फूटपाथवर पुलाखाली व पाईपात आसरा घेऊन जगत होते. आशियातील सर्वात मोठी आणि सर्वात गलिच्छ झोपडपट्टी म्हणून कुविख्यात असलेल्या धारावी झोपडपट्टीत ४ लाख २० हजार लोक रहात होते.

नानी पालखीवाला आणि नाना चुडासामा यांच्यासारख्या एअरकंडीशन्ड घटना तज्ज्ञांना जर अशा वस्तीत एक आठवडाभर रहाण्याची सक्ती केली तर उरलेल्या आयुष्यात ते घटनेतील १९ व्या कलमाचे नाव उच्चारणार नाहीत.

निम्म्याहून अधिक लोकसंख्या फूटपाथवर आणि झोपडपट्टीत रहाते पण ज्याना एकदोन खोल्या रहायला मिळाल्या आहेत त्याची स्थितीही भयानक आहे १९७१ च्या खानेसुमारीनुसार असा निवारा लाभलेल्यापैकी ७७ टक्के कुटुंबे फक्त एका खोलीत रहात होती आणि त्यापैकी ८१ टक्के कुटुंबांना स्वैपाकघरच नव्हते. १७५२ इमारती दुरुस्तीपलीकडच्या असून ८७०७ इमारती पाच वर्षांत पडणाऱ्या आणि १९ हजार ७७८ इमारती पाच ते पधरा वर्षांत कोसळणाऱ्या आहेत, असे ताज्या पाहणीत दिसून आले आहे. ज्याना निवारा आहे त्याची ही दैना आहे.

सारी मुबईच जणू सट्टाबाजार झाली आहे. जमीन व जागा यांचा सट्टाबाजार! यामुळे काळ्या पैशाच्या थैल्या मुबईच्या जागेत व जमिनीत गुतविल्या जात आहेत गरीब माणसे व मराठी माणसे या थैल्याना तोंड देऊन टिकून राहू शकत नाहीत. सत्ताधारी–नोकरशहाही या काळ्या पैशाला विकले जाऊन एकूण परिस्थितीकडे पाठ फिरवीत आहेत या धुमाकुळामुळे मुबईत सार्वजनिक नीतीमत्ताही कोसळत आहे. यामुळे मुबईत सर्वत्र गुन्हेगारीचा सुळसुळाट झाला आहे. मुबईचे एक माजी पोलीस आयुक्त म्हणाले होते–'मी अशा सैन्याचा सेनापती आहे की, ज्या सैन्याचा खराखुरा पगार गुड–स्मगलर–काळाबाजारवाले देतात!' महापालिका आयुक्ताना असेच म्हणावे लागत असणार! अशा स्थितीत मूलभूत कडक उपाय योजल्याशिवाय अतिवृष्टी आणि अराजक यापासून मुंबापुरीला वाचविता येणार नाही.

मुबईचा लोंढा आवरला पाहिजे असे म्हणताच ही भाडवलशाही धार्जिणी आणि धनिकाची कैवारी मडळी ताडकन सागू लागतात की, कुणालाही कुठेही जाऊन निवास करण्याचा आणि स्थायिक होण्याचा मूलभूत हक्क घटनेच्या १९ (१) (इ) या कलमाने दिला आहे पण ही मडळी भोंदू आहेत. कुणालाही कुठेही रहावयाचा अधिकार म्हणजे फूटपाथवर आणि कोणतीही जमीन बळकावून रहाण्याचा अधिकार आहे काय? एफ. एस. आय. सकट सर्व नियम तोडून फ्लॅट बाधण्याचा अधिकार आहे काय? जर तसे असेल आणि फूटपाथवरही रहाण्याचा अधिकार असेल तर या घटना तज्ज्ञाच्या नि पुढाऱ्याच्या फ्लॅटमध्ये शिरून रहाण्याचा अधिकार का नाही? सव्वीस मजली 'उषा किरण' इमारतीचा खास जलतरण तलाव असून त्याची भिंत कोसळून झोपडीत रहाणारे ठार झाले. तेथील बेघरांनी 'उषा किरण'मध्ये का शिरायचे नाही? अशी चळवळ उद्या कुणी पुकारील तरच हे एअरकंडीशन्ड तज्ज्ञ सरळ येतील. कुणालाही कुठेही जाऊन राहण्याचा अधिकार आहे असे जो म्हणेल त्याच्या फ्लॅटमध्येच सरळ घुसले पाहिजे, मग तो मत्री असो, उद्योगपती असो वा घटना तज्ज्ञ असो किंवा पुढारी असो! कारण ही माणसे दुष्टपणाने खोटे बोलत आहेत.

घटनेच्या १९ (१) (इ) या कलमानुसार कुणालाही कुठेही जाऊन रहाण्याचा व स्थायिक होण्याचा मूलभत हक्क असला तरी तो अनिबंध हक्क नाही. प्रत्येक मूलभूत हक्काला बंधन आहेच. भाषण करण्याचे स्वातत्र्य मूलभूत आहे. पण याचा अर्थ असा नव्हे की, हत्याकांड सुरू करा असं लोकाना सागण्याचे भाषण स्वातंत्र्य लाभले आहे.

घटनेच्या १९ व्या कलमातच अगदी स्पष्ट केले आहे की एकाचे मूलभूत स्वातत्र्य जर इतरांच्या रास्त हक्कांवर किंवा सार्वजनिक हितावर आक्रमण करीत असेल तर त्यावर उचित निर्बंध लादण्याचा हक्क आहे. घटनेच्या १९(५) या कलमात असे स्पष्टच म्हटले आहे की, सार्वजनिक हितासाठी कुणालाही कुठेही जाऊन स्थायिक होण्याच्या हक्कावर 'उचित निर्बंध सरकारला आणता येतील. अशा परिस्थितीत सार्वजनिक हितासाठी 'उचित निर्बंध' अत्यावश्यक असून याबाबतीत चालढकल करणे हाच गुन्हा आहे अर्थातच जे घटना तज्ज्ञ व पुढारी घटनेचे फक्त १९(१)(इ) हेच कलम सांगतात, १९(५) कलमाचे नावही उच्चारत नाहीत ते फसवीत आहेत. जर बेघर आणि फूटपाथवरील लोक त्याच्या फ्लॅटमध्ये कुठेही निवास करण्याचा मूलभूत हक्क बजावण्यासाठी शिरले तर हीच मंडळी सागतील की, मूलभूत 'उचित निर्बंध असतात!' अखेर त्यांना याच मार्गाने 'उचित निर्बंधांची' आठवण द्यावी लागेल.

## आठ कलमी उपाययोजना

१) महाराष्ट्र सरकारने मुबईतील प्रत्येक नागरिकाला ओळखपत्र ऊर्फ अतर्गत पासपोर्ट द्यावा. त्यात नागरिकाचे नाव, वय, निवास, पत्ता, त्याचे शालेय शिक्षण कुठे झाले, त्यानतरचे शिक्षण कुठे झाले, मुबईत केव्हापासून निवास, रोजगार इ. माहिती असावी. तीन सरकारी कर्मचारी आणि पाच स्थानिक कार्यकर्ते अशा अनेक पथकानी विविध भागात जाऊन ही कामगिरी कसोशीने पार पाडावी. यानंतर ही सर्व माहिती कॉम्प्युटरमध्ये समाविष्ट करून ओळखपत्र योजनेचे खास खाते विर्सजित करावे. यामुळे कुणाला नव्याने ओळखपत्र दिले जाणार नाही आणि लाचलुचपतीची शक्यताच रहाणार नाही.

२) पोलिसाने किंवा महापालिका वॉर्ड अधिकाऱ्याने मागता क्षणी ओळखपत्र दाखविलेच पाहिजे असा कायदा करावा. खोटे ओळखपत्र बाळगल्यास किमान दोन वर्षे तुरुगवासाची शिक्षा मुक्रर करावी.

३) मुबई मेट्रोपॉलिटन रिजनच्या सर्व जमिनीचे राष्ट्रीकरण करावे आणि गाळे खोल्या व फ्लॅट यांची विक्री फक्त ओळखपत्र धारण करणाऱ्यासच केली पाहिजे असा कायदा करावा.

असा कायदा निश्चित करता येईल. जम्मू

काश्मीर राज्यातील जमीन किंवा मालमत्ता राज्याबाहेरील कुणालाच विकत घेता येत नाही. खुद्द महाराष्ट्रात शेतीची जमीन कुणाही बिगर शेतकऱ्याला विकता येत नाही.

४) सर्व नवीन खाजगी बांधकाम बंद करून फक्त सरकारनेच एक खोल्यांचे नि दोन खोल्यांचे गाळे असलेल्या उंच इमारती बांधाव्यात. मात्र या योजनेत परदेशी अंधानुकरण करू नये आणि ओळखपत्र धारण करणाऱ्या बेघरांना या जागा द्याव्यात. मुंबईत जास्तीत जास्त निवास असणाऱ्या ओळखपत्र धारकांना प्राधान्य द्यावे. कुणी जागा सोडून गेल्यास ती जागा पुन: सरकार जमाच झाली पाहिजे. यामुळे जसजशा इमारती उभ्या रहातील तसतशा झोपडपट्ट्या मोडून त्या जागांवर इमारती बांधता येतील.

५) यासाठी अर्थपुरवठ्याची अडचण येणार नाही. एका खोलीसाठी १५ हजार आणि दोन खोल्यांसाठी ३० हजार रुपये आगाऊ घ्यावेत. लोक आनंदाने कदाचित हप्त्याने देतील.

६) मुंबईतील सर्व ओळखपत्र धारकांना किमान सोयी उपलब्ध होईपर्यंत, ओळखपत्र नसणाऱ्यांना मुंबईत स्थायिक होण्यास बंदी करावी. रोजगार, रहावयाची जागा, दुकानासाठी परवाने फक्त ओळखपत्र धारकांनाच द्यावेत. याचाच अर्थ असा की, ज्या दिवशी ओळखपत्र देण्याचे काम यथास्थित पूर्ण होईल तो दिवस हा 'कट ऑफ डे' म्हणून धरला जाईल.

७) हे सर्वच निर्बंध तात्पुरते रहातील आणि जोपर्यंत निवास, रोजगार, पाणीपुरवठा समाधानकारक वहातुकीची सोय, पुरेशा शाळा, हॉस्पिटले यांच्या किमान सुविधा आजच्या लोकसंख्येला उपलब्ध होत नाहीत. तोपर्यंतच ते निर्बंध राहातील.

८) महाराष्ट्रातून जी मराठी माणसे मुंबईत स्थायिक होण्यास किंवा कायम, निवासासाठी येतील त्यांच्यासाठी आजच्या गोदरेजच्या जमिनीचा काही भाग राखून ठेवला जाईल. तेथे सरकारतर्फे गाळे बांधून त्यांना दिले जातील.

## योजनेचे फायदे

(१) जमिनीचे राष्ट्रीयीकरण आणि जागांचे हस्तातर किंवा विक्री ओळखपत्र धारकालाच करण्याची सक्ती यामुळे काळ्या पैशाच्या मुंबईवरील आक्रमणाचा कणाच मोडेल. जागांच्या किंमती धडाधड कोसळतील.

२) या योजनेला मुंबईतील सर्व लोकांचा पाठिंबा मिळेल.

३) मुंबईत नवीन लोंढा येतच राहिला तर भिन्न प्रांतीयांच्या नि भिन्न धर्मीयांच्या दगलीच होतील. कारण जागा व नोकऱ्या यांच्या टंचाईमुळे प्रांतीय वैमनस्य संपुष्टात येऊन राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागेल. कारण जे आज मुंबईत स्थायिक आहेत त्यापैकी कुणालाच जायला सांगावयाचे नसून त्यांच्यासाठी सुविधा करावयाच्या आहेत. परस्पराबद्दल असणारा अविश्वासही यामुळे नाहीसा होईल.

(४) मुंबईतील ९० टक्के लोकांना स्वच्छ पाणी, स्वच्छ हवा, निवारा, समाधानकारक वहातुक, रोजगार, रस्त्यावरून चालायला पदपथ आदी माणसाचे किमान हक्क मिळत नाहीत. त्यामुळे मुंबईकरांच्या अमाप हाल-अपेष्टाकडे राज्यकर्ते स्वार्थामुळे पहात नाहीत आणि समुद्र हटवून जमिनी मिळविण्याचाच विचार करतात हे सर्व अनैतिक प्रदूषण सदर योजनेने तोडले जाईल. नाही तर याच गतीने लोक मुंबईत येऊन शेवटी गटारात रहातील. किंबहुना काही ठिकाणी गटारे व नाल्यांच्या जागा ताब्यात घेऊन तेथेही बांधकाम आजच सुरू आहे! माणसांची ही भयानक हलाखी या योजनेनेच बंद होईल.

(५) अन्य प्रांतातील दरोडेखोर सरळ मुंबईत येऊन लुटालूट करून जातात. त्यांना पकडले तरी जामिनावर सुटतात. हजारो बेकायदा पाकिस्तानी मुंबईत मुक्काम ठोकून आहेत, पण अशा सर्वांना खोटे अंतर्गत पासपोर्ट धारण केल्याबद्दल तत्काळ दोन वर्षांची सजा देता येईल. कोर्ट त्यांना सोडू शकणार नाही. फरारी लोकांना पकडणेही सोपे जाईल.

(६) जे कायदेकानूंचे पालन करणारे प्रामाणिक लोक आहेत त्यांना शासकीय ओळखपत्राचा अत्यंत उपयोग होईल. अडीअडचणीत तसेच अपघातात त्यांच्याजवळील ओळखपत्र एखाद्या मित्राप्रमाणे मदत करील.

'कनिष्क' या एअर इंडियाच्या जेट विमानाला घातपात केल्याबद्दल लालसिंग नावाच्या दहशतवाद्यावर संशय आहे आणि परिणामी मुंबईत भलत्याच लालसिंगला अटक होऊन तुरुंगात रखडावे लागले. ओळखपत्र असते तर निरपराध लालसिंग सुटू शकला असता. ओळखपत्र म्हणजे सज्जनाचा साथीदार व गुन्हेगाराचा दुष्मन आहे.

(७) सत्ताधारी – नोकरशहा – बिल्डर यांची भयानक युती मोडेल. तसे न केल्यास मुंबई काळ्या पैशाला विकली जाईल आणि परिणामी मुंबईचा गुन्हेगारी शिकागो होईल.

(८) मुंबईत उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण झाले असून त्यामुळे जास्तीत जास्त रोजगार मुंबईत उपलब्ध आहे. तेव्हा मुंबईच्या विकासावर सर्वांचा हक्क असून कुणालाही मुंबईत जाऊन जाऊन स्थानिक होण्यास प्रतिबंध करता येणार नाही. तथापि हा युक्तीवाद भ्रामक आहे. कारण मुंबईत सध्याच असलेले हजारो युवक बेकार आहेत. ते विविध प्रांताचे आहेत. त्यांना रोजगार न मिळता नवीन परप्रांतीय येऊन रोजगार घेऊ लागले तर अन्याय होईलच, पण स्फोटक परिस्थिती व शत्रुत्व आपापसात निर्माण होईल. तेव्हा जे मुंबईकर आजच बेकार आहेत त्यांना कामधंदा मिळेतो लोंढा थांबविलाच पाहिजे. मुंबईच्या वैभवावर जे कर आहेत ते मुख्यत: केंद्र सरकारचे असून केंद्र सरकारला प्रचंड पैसा मुंबईतून कररूपाने मिळतो. हा प्रचंड पैसा मुंबईवर खर्च केला जात नाही. देशाच्या विविध भागांवर खर्च होतो. तेव्हा मुंबईतील विकासात देशाचीच ऐंशी टक्के भागिदारी आहे.

मुंबईतील लोंढा आवरण्यास कायदा करता येतो. यासाठी सर्वात भरभक्कम पुरावा म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय घटनेचे शिल्पकार असून त्यांनीच घडविलेली घटना २६ जानेवारी १९५० पासून अमलात आली. त्यानंतर पाच वर्षांनी १९५५ मध्ये 'थॉट्स् ऑन लिंग्विस्टिक स्टेटस्' प्रबंधात ते म्हणतात— 'याची जाणीव कुणी ठेवत नाही की मुंबई शहरात बिगरमराठी लोकांची संख्या वाढली याचे कारण परप्रांतीयांना येऊ न देणारा कायदा नव्हता. जर मुंबई राज्यात असा कायदा असता तर मुंबई शहरात येणारा लोंढा थांबविता आला असता.'

जर शासनाने काहीच केले नाही तर काळ्या पैशाला मुंबई विकली जाईल आणि एक दिवस उध्वस्त होईल किंवा बुडेल. जर सरकारच काही करणार नसेल तर 'दि राईस ॲन्ड फॉल ऑफ बॉम्बे सिटी' असा ऐतिहासिक ग्रंथ लिहिण्याच्या कामाला इतिहासकारांनी आतापासूनच प्रारंभ करावा. □

# झोपडपट्टीवाले

## आहेत कोण ? आले कुठून ? जाणार कुठे ?

शरद जोशी

झोपडपट्ट्याचा प्रश्न सध्या मुंबई शहरात गाजतो आहे. या प्रश्नावरील माझी भूमिका मी जाहीर करावी असे आवाहन झोपडपट्ट्यात काम करणाऱ्या काही संघटनानी केलेले आहे. संघटनेच्या साहित्यात या प्रश्नाविषयी लिहिलेले आहे. तरीही झोपडपट्ट्या उठवून लावण्याच्या मोहिमेच्या संदर्भात ही भूमिका थोडक्यात स्पष्ट करीत आहे.

### झोपडपट्टीवाले आहेत कोण ?

झोपडपट्टीवाले निर्वासित आहेत. इंग्रजांच्या आमदानीपासून औद्योगीकरणाला सुरुवात झाल्यापासून शेती बुडवून कारखानदारी उभी करण्याचे धोरण सरकारने राबवले. गावे उजाड होत गेली. इंग्लंडची भरभराट झाली. इंग्रजाच्या शोषणात दलाली करणारे मुंबईसारख्या शहरात स्थिरावले. तेथेच इंग्रजाच्या सांडलेल्या उष्टयाने का होईना थोडी लक्ष्मी स्थिरली. कर्जात बुडालेले, दुष्काळात निराधार झालेले, गावगाड्याच्या जुलुमाने त्रस्त झालेले थोडक्यात शेतीवर जगणे असह्य झालेले, जगण्यासाठी जवळच्या शहरात गेले. मुंबईला उद्योगधंद्याचा मोठा गड्डा म्हणून सगळ्याचा ओढा. सुरुवातीला मुंबईत आलेल्या या निर्वासिताना पत्र्याच्या चाळी मिळाल्या; पण लोंढा वाढतच राहिला आणि त्याना झोपडपट्ट्या आणि गलिच्छ वस्त्यात उतरावे लागले. आता तेथेही जागा नाही म्हणून त्यांना फूटपाथवरच आडोसा करून जनावरासारखे जगावे लागत आहे. गोरा इंग्रज गेला तरी शेती उजाड करून उद्योगधंदे जोपासावयाची त्याची नीती देशी साहेबाने चालूच ठेवली. गोऱ्या इंग्रजाची जागा काळ्या इंग्रजाने घेतली. इंग्लंडच्या ऐवजी आता मुंबईसारख्या शहराची भरभराट होऊ लागली एवढाच काय तो फरक. भारतावरील इंग्रजाचे राज्य गेले, यसफयासवाल्या इंडियाचे राज्य आले आहे. ग्रामीण भागांत शेतीवर पोट भरत नाही, शेती चांगली केली तरी कर्जात बुडतो, म्हणून शेती करणारा एक एक पायरी घसरत एक दिवस घरशेती फुकून टाकून शहरात झोपडपट्ट्यात येतो.

झोपडपट्टीवाला हा निर्वासित शेतकरी आहे. एक, दोन, तीन पिढ्यांपूर्वी त्याच्या कुटुंबात शेती व्हायची. बलुतेदारींचा कामधंदा असायचा. मुंबईमुळे ते उजाड झाले आणि मुंबईच्याच आश्रयाला त्यांना यावं लागलं आहे. नियोजनाच्या नावाखाली मुंबईसारखी शहरे स्वर्ग बनली तरी त्या स्वर्गाने सर्व खेडी उध्वस्त करून शेतकऱ्यांच्या शेतीचा नरक बनलेला असतो. झोपडपट्ट्या हा या नियोजनाचाच परिणाम आहे.

### झोपडपट्ट्यांना जबाबदार कोण ?

सरकारच्या आर्थिक धोरणाचा झोपडपट्ट्या हा अपरिहार्य परिणाम आहे. पर्यायी रोजगाराची व्यवस्था न करता कोट्यावधी शेतकऱ्याना घरातून काढून लावणारे दरोडेखोर शासनच आहे.

गाव सोडून शहरांत निघायची वेळ येते तेव्हा सगळी हालाखीच झालेली असते. कोणीही मदतीला येत नाही. जो तो आपल्याच चिंतेत असतो. कारण एखादा पुढारी सोडल्यास सगळे गावच लुटले जात असते. शहराकडे पावले टाकताना निर्वासिताच्या मनात कडवटपणा असतो ते सगळ्या शेतीला लुटणाऱ्या शासनाबद्दल नव्हे, गावातल्या शेवटच्या वर्षांत ज्याचा ज्याचा संबंध आला त्यांच्याबद्दल राग सवर्णाचा येतो, पाटलाचा येतो, जरा जास्त जमीन असणाऱ्याचा येतो. पण या सर्वांची गळचेपी शासनाच्या धोरणाने झालेली आहे हे लक्षात येत नाही. कोणी त्याबद्दल बोलत नाही.

सगळ्या लिखाणात, अगदी 'आक्रोश' किंवा 'दामुल' सारख्या सिनेमातसुद्धा खलपुरुषसुद्धा दाखवला जातो गावातलाच, त्यातलेत्यात उजव्या स्थितीत असलेला टग्या. त्याची स्थिती शहरातल्या पानवाल्याइतकी किंवा पट्टेवाल्याइतकीसुद्धा चांगली नसते. शोषणाचा चरक चालवणारा अदृश्य हात 'इंडिया' चा आहे यावद्दल कोणीच बोलत नाही.

शहरात आल्यानतरही झोपडीतल्या निर्वासिताला शहरच जवळचे वाटू लागते. ज्यांनी त्याची घरे उजाड केली, आजही त्याच्यासारख्या हजारोंची घरे उजाड केली जात आहेत त्याच्याच फौजेत ते भरती होऊ पाहतात

झोपडपट्टीवाले भारतातून आले महाराष्ट्रातून आले, आंध्रातून उत्तरप्रदेशातून आले, तामिळनाडूतून आले, केरळातून आले प्रत्येक राज्यातून आले. सगळ्या देशातल्या भांडवलाचा जास्तीत जास्त साठा चार पाच मोठ्या शहरात झाला. प्रामुख्याने मुंबईत झाला. मुंबई शहर देशभरच्या निर्वासित शेतकऱ्याचे पोट झाले. एका काळी मुंबईत प्रामुख्याने कोकणातील आणि देशावरची मंडळी यायची. मग मराठवाडा, विदर्भातली येऊ लागली महाराष्ट्रातून भरणा अगदी परवापर्यंत जास्त होता. महाराष्ट्र राज्यात रोजगार हमी योजना लागू झाल्यापासून शेतकऱ्याचा झपाट्याने मजूर होत असला तरी तो मोठ्या प्रमाणावर गावातच राहू शकला. रोजगार हमी योजनेने महाराष्ट्रात गावोगाव छोट्या छोट्या निर्वासित शेतकऱ्याच्या छावण्या उभारल्या. त्यामुळे इतर राज्यातून येणाऱ्या निर्वासिताचे प्रमाण झोपडपट्ट्यात वाढत गेले.

या प्रश्नाचे शेवटी उत्तर काय ? हे पाहण्याआधी चुकीची उत्तरे कोणती ती पाहू

झोपडपट्ट्यात थातूर मातूर सुधारणा करून, एखादा दवाखाना, उघडून, एखादे नळाचे कोंडाळे उभे करून किंवा सार्वजनिक संडास बांधून झोपडपट्ट्याचा प्रश्न सुटणार नाही. संजय गांधी किंवा अशाच एखाद्या नावाच्या योजनेखाली हा जळता प्रश्न शमवण्याचा प्रयत्न केला जातो. निराधार झालेल्या झोपडपट्टीवाल्याना नळाचे पाणी आणून देणाराच तारणकर्ता भगवान वाटतो. असे तुकडे तोंडावर

फेकून झोपडीवाल्यांची कृतज्ञता मिळवणारे पुढारी निवडणुका लढवून काळचा इंग्रजांचेच हात मजबूत करतात. झोपडपट्ट्यांच्या सुधारणेने तेथील रहिवाश्यांना रोजगार मिळू शकत नाही. त्यांच्या मुलाबाळांना भविष्य तयार होऊ शकत नाही.

झोपडपट्टीतल्यांपैकी काही जणांना घरे बांधून देऊन इतर दुसऱ्या प्रश्नांची धग शमवू पाहतात. एक पेंडूक दाखवून दहा गायी हंबरत ठेवण्याचा हा प्रकार आहे. आज निम्मी मुंबई झोपडपट्ट्या व फूटपाथवर आहे. त्याखेरीज मुंबईत दररोज चारशे निर्वासित शेतकरी कुटुंबे येतात. या गतीने घरे पुरवण्याचे व रोजगार पुरवण्याचे काम होऊच शकत नाही. ज्या भाग्यवंताना घरे मिळतात त्यांचीही आर्थिक स्थिती इतकी बिकट असते की मिळालेली घरे विकून, पोटभाड्याने देऊन त्यांना पुन्हा झोपडपट्टीतच येऊन रहावे लागते.

झोपडपट्ट्यांचा प्रश्न मराठी–बिगरमराठी रहिवाश्यांचा नाही मराठी माणसाच्या पोटातली भूक मद्रासी निर्वासिताच्या पोटातल्या भूकेपेक्षा कमीजास्त वेगळी नसते. हिंदूच्या पोटातली भूक मुसलमानांच्या पोटातल्या भूकेपेक्षा कमी जास्त जाळणारी नसते. झोपडपट्टीमध्ये आपल्या कुटुंबातल्या पोरीबाळींची वाताहात झाल्याचा दुःखाचा हंबरडा हिंदू–मुसलमान, सवर्ण–दलित, मराठी–अमराठी, सगळ्यांच्या मनात सारखाच फुटतो. निर्वासितांमध्ये फूट पाडूनही हा प्रश्न सुटणार नाही.

सत्तेतील मंडळी थातुरमातुर तुकडे फेकून झोपडपट्टीवाल्यांचा पाठिंबा मिळवतात. त्याउलट दुसरी मंडळी झोपडपट्ट्या टिकवून त्यांचे हुकमी मतदार संघ बनवू पाहतात. झोपडपट्ट्या अनंत काळापर्यंत राहूच शकत नाहीत. मुंबईपासून दूर पर्यायी झोपडपट्ट्या हलवून हा प्रश्न सुटू शकत नाही. झोपडपट्ट्या श्रीमंतांना नको आहेत एवढेच नाही, त्यात राहणाऱ्यांना त्या नको आहेत. पण त्यांनी जावे कोठे ?

हा प्रश्न सोडवण्यासाठी शासनाची आर्थिक धोरणे अशी बदलली पाहिजेत की ज्यामुळे मुंबईत दररोज येऊन पोचणाऱ्या चारपाचशे कुटुंबांचा ओघ पहिल्यांदा थांबेल. त्याकरिता शेती किफायतशीर करणे, गावातले जीवन जास्त आकर्षक करणे हा प्रथम उपाय आहे

याखेरीज आजपर्यंत मुंबईत येऊन पडलेल्या लोकांना परत गावाकडे जाणे शक्य होईल एवढेच नव्हे तर परत जाण्याचा त्यांना मोह पडेल अशी परिस्थिती तयार झाली पाहिजे. १९८० साली उसाला चांगला भाव मिळाल्यावर कितीतरी शेतकऱ्यांची मुले चांगल्या नोकऱ्या सोडून परत शेतीवर गेली. ज्वारीला आकर्षक भाव द्यायला जो खर्च येईल तो झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसाहतीपेक्षा जास्त असणार नाही. त्यातून शेती आकर्षक होईल. निदान मुंबईतकी मजुरी शेतमजुरांना मिळेल, गावातल्या गावात रोजगार चालू होतील. मग मुंबईतील झोपडपट्टीत, गलिच्छ घाणीत, हातभट्टीवाल्या दादांच्या धाकात, पोलिसांच्या जुलुमाखाली, आपल्या मायबहिणींच्या अब्रूचे धिंडवडे पाहात कोणीही तेथे राहणार नाही.

मुंबईतील झोपडपट्ट्यांच्या जागा तेथील भांडवलदारांकरता सान्याचे तुकडे झाले आहेत. त्यांना जमिनी मोकळ्या करून हव्या आहेत. त्याकरिता ते वाट्टेल ते करायला तयार आहेत. भिवंडीच्या जातीय दंगलीमागे झोपडपट्ट्या हलवण्याचीच प्रेरणा प्रमुख होती. आज दुसऱ्या काही भेदाभेदांचा उपयोग करून झोपडपट्टीवाल्यांत फूट पाडून त्या हलवण्याची कारवाई चालली आहे.

शहरातील बुद्धीजीवी उच्च मध्यमवर्गीय सुखवस्तू भद्रलोकांच्या डोळ्यांतही झोपडपट्ट्या आणि फूटपाथवरील वस्त्या टोचत आहेत. त्यांच्या गुलछबू, गोंडस आयुष्याला या अभद्र दर्शनानेसुद्धा त्रास होतो. त्यांना फूटपाथवर चालायला त्रास होतो. झोपडपट्टीत हमेशा चालणाऱ्या दादागिरी, मवालीगिरीमुळे त्यांच्या कुटुंबाला असुरक्षितता वाटते. या चिखलात झोपडपट्टीवासी दिवसरात्र वर्षानुवर्षे जगतात, पिढ्यान्‌पिढ्या त्यांना या नरकापासून सुटकेची आशासुद्धा नाही याचे त्यांना काहीच सुखदुःख नाही. हे भयानक चित्र त्यांना फक्त नजरेआड करायचे आहे.

मुंबईच्या एकूण लोकसंख्येपैकी निम्म्या असलेल्या झोपडपट्टीतील निर्वासित शेतकऱ्यांचा वाली आज कोणी नाही. दयेच्या, भीकेच्या आशेने ते जगत आहेत. त्यांना भीक नको हक्काचे हवे आहे. मुंबईतील सर्व लखलखाट हा शेतकऱ्यांचे आयुष्य उध्वस्त करून उजळला आहे. त्या वैभवावर निर्वासित शेतकऱ्यांचा हक्क आहे. शेतकऱ्यांनी रस्ता अडवून आपल्या प्रश्नाकडे लक्ष वेधून घेतले. झोपडपट्टीच्या प्रश्नाकडे काही रहिवाश्यांनी अलिकडे अगदी अभिनव मार्गाने लक्ष वेधले. काही काळ का होईना ' प्रतिभा ' इमारतीचे बेकायदा बांधलेले आठ मजले त्यांनी व्यापले ही एक चुणूक होती. झोपडपट्टीतूनही हाकलून काढलेले जातील कोठे ? जिथे मोकळी जागा असेल तिथे जातील. पंचतारांकित हॉटेलात घुसतील. गगनचुंबी इमारतीत शिरतील. त्यांनी असे केले तर नैतिकदृष्टया त्यांचे काही चुकले असे कोणीच म्हणू शकणार नाही. ☐

**( २९ नोव्हेंबर ८५ च्या ' शेतकरी संघटक ' या पाक्षिकातून साभार पुनर्मुद्रित.)**



# माझा भाऊ-अनिल

● चंद्रकांत बर्वे ●

### ६ डिसेंबर १९८४

**मा**झ्या आकाशवाणीतल्या मित्राने धावत येऊन निरोप दिला. बर्वे, तुमच्यासाठी मुंबईहून फोन आहे तुमचे बंधू अनिल बर्वे यांचे-विषयी... माझ्या मनात पाल चुकचुकली... बहुधा अनिलची न्यूज असणार... फोन कानाला लावला.

'एक अत्यंत वाईट बातमी आहे, तुमचे बंधू अनिल बर्वे याचं आज सकाळी K E M मध्ये निधन झालं.'

मी थँक्यू न म्हणता प्रथमच रिसीवर ठेवला असावा. सिगारेट पेटवली. लक्षात आलं. अनिल गेला... अनिल इज डेड... बाबा आता आपल्याला आयुष्यात भेटू शकणार नाही. त्याच्याशी बोलता येणार नाही. आता त्याच्याशी भांडायचा योग नाही. तो कायमचा इहलोक सोडून गेलाय. पंतप्रधान राजीव गांधींचा वशिला लावला किंवा टाटा-बिर्लाची इस्टेट ओतली, तरी त्याची आपली नेहमीप्रमाणे भेट होणं शक्य नाही. पेपरमध्ये अनिलविषयी काही छापून येईल तेव्हा त्याच्या नावाच्या मागे 'श्री' च्या ऐवजी कै. लागलेला असेल. इंग्रजीत Mr च्या ऐवजी Late लागलेला असेल. Now it's too late. अनिल इज डेड.

घरी आलो. बरोबर मित्र होतेच. मग लक्षात आलं की या बातमीने मला अद्याप म्हणावा तसा झणका बसलेला नाही. अनिल माझा सख्खा मोठा भाऊ. माझ्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत अनिलचा मोठा वाटा. मी प्रसारमाध्यमात काम करीत असूनही मला लोक अनिल बर्वेंचा भाऊ म्हणून ओळखतात. तरीहो म्हणावा तसा अनिलच्या मृत्यूच्या बातमीचा आपल्याला झणका का नाही बसला? मी फार भावनाप्रधान नसलो तरी भावनाशून्यही नाही. शिवाय भगवतगीताही काही कोळून प्यालेलो नाही. तरीही मी स्थितप्रज्ञ कसा?... मग लक्षात आलं अनिलची बातमी ही आपल्याला पूर्णार्थाने बातमी नव्हे. अनिल जाणार हे गेली वर्षदोन वर्ष वाटत होतंच. 'बाबा तू पिऊ नकोस नाही तर तू मरशील.' असं मीच अनिलला दहादा सांगितलं असेल. आमचे वाईट अंदाज चुकायचे नाहीत. ६ डिसें. ८४ ला माझा अंदाज खरा ठरला. अनिल गेला...कायमचा.

अनिल माझ्याहून साडेतीन वर्षांनी मोठा. प्रत्येक क्षेत्रात साडेतीन पावलं अधिक चाललेला मराठीत म्हण आहे. 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा' अनिलला आयुष्यात बऱ्याच ठचा लागल्या आणि आम्ही मात्र त्याच्या मागेच राहिलो.

अनिलच्या व्यक्तिमत्त्वातल्या दोन ठळक गोष्टी लक्षात रहातात. तो कल्पक तसाच अतिरेकी होता आणि तो स्वयंभू तसाच स्वयंकेंद्रीतही होता टोकाची भूमिका घ्यायला आणि टोकाची वागणूक करायला त्याला आवडायची, मात्र लेखन करताना तो अतिशय बॅलन्सड असे. त्यामुळेच त्याचं लिखाण वाचून त्याच्या एकूण व्यक्तिमत्त्वाचा अंदाज बांधणं कठीण. लिखाणातील बॅलन्स आपल्या दैनंदिन जीवनात त्यानं कधी ठेवला नाही आणि त्यामुळेच अतिमद्यपान करून त्याने या जगाचा निरोप घेतला. तो जेव्हा अयशस्वी ठरला तेव्हा त्याला लोक व्यवहारशून्य म्हणत आणि तो जेव्हा यशस्वी ठरला तेव्हा व्यवहारचतुर म्हणत. खरं म्हणजे तो दोन्हीही नव्हता. अनिलच्या व्यक्तिमत्त्वाचं मोजक्या शब्दात विश्लेषण करणं कठीण आहे, म्हणून या लेखाचा हा प्रपंच.

लहानपणापासूनच एकूण अनिलच्या बोलण्याचालण्यातून तो हुषार वाटायचा; पण शालेय प्रगतिपुस्तकात काही त्याचं चित्र उमटायचं नाही. इंग्रजी, गणित, विज्ञान हे कच्चे विषय; परंतु इतिहास, भूगोल आणि मराठी यावर त्याची पकड जबरदस्त. इतिहास आणि मराठीची त्याला मनापासून आवड आणि त्यातलं त्याचं वाचनही भरपूर असायचं. आता तुम्हाला वाटेल की, मराठीत अनिलला भरपूर मार्क्स मिळालेले असणार; पण थांबा, एकदम अंदाज बांधायची घाई नका करू कुणा संशोधकाने जर आमची शालेय प्रगतिपुस्तके शोधून काढलीच, तर मराठीतही एखादा टक्का आम्हालाच जास्त मिळाल्याचे लक्षात येईल. अहो साधी गोष्ट आहे, आम्ही परीक्षेचा विचार करून अभ्यास करणारी माणसं. पाठांतराला नेमून दिलेली कविता आमचो पाठ असायची. पाठ म्हणजे अगदी मुखोद्गत; पण अनिलचं तसं नव्हतं. तो त्याला आवडणाऱ्या १०-१५ कविता पाठ करायचा. त्यात पाठांतराला नेमून दिलेली कविता असेलच असं नाही. आम्ही शहाणी माणसं पेपरात प्रथम पाठांतर व्याकरण वगैरे सुरुवातीला लिहून उरलेल्या वेळात निबंधादी गोष्टी चावत बसायचो. अनिलचं तसं नव्हतं. तो आवडीचा निबंध सुरुवातीला लिहायला घेऊन त्यात तास दोन तास घालवायचा आणि उरलेल्या वेळात घाईघाईने इतर प्रश्नांकडे वळायचा आणि पेपर संपल्यावर वेळ पुरला नाही, दोन प्रश्न लिहायचे राहून गेले अशी खंत व्यक्त करीत परीक्षा हॉलमधून बाहेर पडायचा, त्यामुळे प्रगतिपुस्तकात काही अनिलने भरपूर मार्क्स मिळवले नाहीत. तरीही शाळेतील वर्गमित्र आणि मास्तर अनिल हुषार आहे ही गोष्ट जाणून असत.

अनिल हा हाडाचाच लेखक होता. शाळेत असतानाही त्याने चांगल्या कथा लिहिल्या होत्या. त्याच्या लिखाणाला त्या काळातही अनुभवाची जोड असायची. पुण्यात सासवड तालुक्यात 'देवडी' नावाच्या खेड्याजवळ आमच्या आजोळची बरीच जमीन आहे. तिथे

उन्हाळयाच्या सुटीत आम्ही १०–१२ भावडं जमायचो. डोंगराळ भागात मोठं माळरान, आमची त्यात बरीच मोठी पडीक जमीन, बरीच गुरं, राखणीला गडीमाणसाचा भोवताली वावर, घरात छऱ्याची बंदूक, बरचे इ. तिथं आमचा वेळ फार छान जायचा. गडी माणसाशी दोस्ती करणं अनिलला आवडायचं. तिथंच राखणीच काम करणारा एक तगडा गडी सदू निरवडा. त्याचा अनुभव त्याने अनिलला सांगितला तो असा.

एकदा एक हौशी शिकारी वाघाच्या शिकारीला आलेला. जंगलात वाघाचा वेध घेणं चालू. सदू त्याच्या मदतीला .. अचानक समोर वाघ उभा ठाकला. शिकाऱ्याची फाटली–शिकारी खरा शिकार व्हायचा; पण सदूने कुऱ्हाडीने वाघाला जायबदी केला नी वाघ मारला. शिकाऱ्याने १० रुपयाचे मोठं बक्षिस सदूला दिले आणि शिकारी पुण्याच्या दिशेने कटला. चार दिवसानी पेपरात, फोटो व बातमी शिकाऱ्याने वाघ मारला. धाडसी शूर शिपाई...वगैरे.

अनिलने या घटनेवर आधारित 'शिकार' नावाची कथा त्या काळी लिहिली. कथा त्याने आम्हा मित्राना ऐकवली होती. आम्ही सगळे भारावून गेलो. अरविंद देशपांडे नावाच्या माझ्या एका मित्राने शाळेच्या तिमाही परीक्षेत ती कथा लिहिली. ती कथा पेपर तपासताना सरांना खूप आवडली म्हणून त्यांनी ती कथा एक आदर्श कथा म्हणून इतर वर्गातूनही वाचून दाखविली. हा तर सागायचा मुद्दा हा की लिखाणाचा टॅलेन्ट हा अनिलकडे मूलतःच होता आणि त्याला लिखाण कधी उगवत्या सूर्याकडे पाहून किंवा बागेत कारज्यामुळे तयार झालेल्या इंद्रधनुष्याला पाहून सुचले नाही. त्याच लिखाण हे माणसाच्या अस्सल अनुभवातून निर्माण झालेलं असायचं. '

आमच्या वडिलांची सरकारी नोकरी असल्याने, त्यांच्या महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी बदल्या झाल्या. ५८ साली आम्ही पुण्याहून जालन्याला गेलो व लगेच एका वर्षाने औरंगाबादला. औरंगाबादमध्ये मात्र सुमारे साडेपाच वर्षे आम्ही राहिलो. टीनएजर अनिलचे व्यक्तिमत्त्व इथेच आकार घ्यायला लागले.

लहानपणीही त्याला खेळापेक्षा वाचनात जास्त रस असायचा. सध्याकाळी जेव्हा आम्ही लेबर कॉलनीतली मुलं क्रिकेट खेळत असू, त्यावेळेस तो अंगणात कॉटवर बसून अधार पडेस्तोवर वाचन करायचा. त्याने ऐतिहासिक बखरीपासून ते अत्रे, फडके पर्यंतच्या सर्व लेखकांचं बरचसं लिखाण वाचून काढलं. इतिहास हा विषय तो आम्हा पोराना अतिशय रंजकपणे समजावून सांगायचा. कॉलनीतल्या मारुतीच्या देवळाच्या कट्टयावर बरेचदा हा कार्यक्रम चालायचा. इतिहास सागताना खऱ्या इतिहासाला तो स्वतःच्या कल्पनाशक्तीची जोड देऊन, थोडासा अतिरंजित पण आवडेल अशा पद्धतीने इतिहासातील एकेका लढाईचे तो वर्णन करायचा. समजणे अधिक सुलभ व्हावे म्हणून तो देवळातील कट्टयावर माती ओतून त्यातून किल्ले, रस्ते वगैरे तयार करायचा, आणि त्यावरून तो लढाईचे सचित्र वर्णन करायचा. दिवाळीत देखील आमच्या घरच्या अंगणातील किल्ला हा अधिक प्रेक्षणीय असायचा.

या काळात RSS शी अनिलचा परिचय झाला. सघाच्या दोन निष्ठावंत कार्यकर्त्यांनी कॉलनीत येऊन आम्हा टारगट पोराना शिस्त लावण्याचे उद्देशाने शाखा भरवायला सुरुवात केली. शाखेचं नाव 'शिवाजी शाखा'. क्रिकेट सोडून आम्ही कोणी सघात जायचो नाही पण त्या कार्यकर्त्यांची जिद्द मोठी होती. कधी कधी सघनायक एकटाच वेगवेगळे खेळ खेळायचा आणि शेवटी 'नमस्ते सदा वत्सले' करून निघून जायचा. आम्ही सुरुवातीला हे सर्व नाटक लांबून उत्सुकतेने पाहायचो. अनिलने मात्र लगेच शाखा जॉइन केली. संघाच्या गाण्यातील काव्य आणि चाल अनिलला फार आवडायचे. हळूहळू शाखेतील पोरांची सख्या वाढली. शाखेमुळे अनिलच्या राष्ट्रप्रेमाला व धर्माभिमानाला भरत यायचं. पण एकूणच कोणत्याही शिस्तीत त्याला फार काळ बसणं शक्य नसायचं. त्यामुळे तो कवायतीपेक्षा शाखेच्या कामात जास्त रस घेई.

हे मात्र खरं की त्या काळात सघात कधीही दलिताना कमी लेखलं जायचं नाही. हिंदू ऐक्याचाच विचार केला जाई. फक्त प्रत्येक मुसलमान हा राष्ट्रद्रोही असा समज मात्र पसरवला जाई. काही काळ अनिल पक्का सघवाला झाला होता.

१९६२ चे भारतचीन युद्ध झाले. पुढे मग रोज पेपर वाचणे, मोठ्याची भाषण ऐकून छोट्याना थोडे बहुत शिकवणे, राष्ट्रीय संरक्षण निधी गोळा करणे, सास्कृतिक कार्यक्रम पाहणे...वगैरे गोष्टीतून अनिल एक पाऊल पुढे गेला. राजकारणातला त्याचा इंटरेस्ट वाढला. मराठा पेपरचा अग्रलेख मोठमोठ्याने वाचला जाऊ लागला. वगैरे दरम्यानच्या काळात एक गोष्ट झाला. अनिलच्या डोक्यातील धर्मप्रेमापेक्षा राष्ट्रप्रेम भारी झाले. कॉलनीत बरेच मुसलमान होते. त्याचाही सास्कृतिक आदो कार्यक्रमात सहभाग असायचा. वैयक्तिक मैत्रीतही कुठे मुसलमान शत्रू वाटायचे नाहीत. त्यामुळे सघात मुसलमानांनाही घ्यायला काही हरकत नाही असं त्याला वाटू लागले. आता झाली की नाही पंचाइत ?

' सघाला जेव्हा कॉलनीत सुरुवात झाली त्यावेळी क्रिकेट खेळणारी आम्ही बरीच मुलं संघात गेलो आमच्यात इम्तियाज नावाचा एक मुस्लिम पोरगा होता. तोही शाखेत आला. शाखेची वेळ संपायच्या आधी एकदा सर्वांनी स्वतःचा परिचय करून दिला; इम्तियाजनेही स्वतःचे नाव सागितले. ते ऐकताच संघनायकाने त्याला तू संघात यायचे कारण नाही असे स्पष्ट सागितले. बिचाऱ्याचा चेहरा पडला. तो निघून गेला. आम्हालाही जरा वाईट वाटल. पण काय करणार? मुसलमान सर्व देशाचे शत्रूच होते. त्यामुळे आमचा नाइलाज झाला. इम्तियाज हा पोरगा तसा गुडाच होता त्याची आणि अनिलची दोस्ती कधीच नव्हती, पण त्याला हाकललेलं पाहून अनिलला जरा दुःख झाल. पण ते दुःख त्याने धर्माभिमानाखाली गिळून टाकले. त्यामुळे त्यावेळी त्याने कधी प्रोटेस्ट केलं नाही. पण पुढे धर्मापेक्षा राष्ट्र मोठे ही जेव्हा संकल्पना त्याच्या डोक्यात रूजू लागली तेव्हा तो सघात मुस्लिमाना घ्यायला काही हरकत नाही वगैरे विचार माडू लागला. मग संघचालक मडळी मुस्लिमांनी भारतावर कसे आक्रमण केले, देवळं फोडली आणि मुस्लिम ही जातच कशी क्रूर आहे औरंगजेबाने भावाला, अल्लाउद्दीन खिलजीने काकाला कसे मारले...वगैरे वगैरे सागत परंतु अनिल इतिहासात तगडा होता. तो हिंदू लोकानी एकमेकावर किती आक्रमणे केली, मराठे आणि पेशव्याच्यात भाऊबदकी कशी होती, सवर्णांनी दलितांना कसे वागवले...वगैरे अधिक सविस्तरपणे सागे. सघवाल्यांचं एक असतं ते कधीही अधिक वाद घालत

नाहीत. आणि त्याना नवीन काही पटतही नाही. आईवडील, गुरुजी आणि मोठी लोकं जे बोलतात ते कोणताही प्रश्न न विचारता शिरोधार्य मानावे एवढच त्याना माहीत असतं. आणि 'बाबा वाक्य प्रमाणम्' हे काही आमच्या बाबाला (अनिलला) फारसे मानवणारे नव्हते. तो नेहमी स्वतंत्र विचार करायचा त्यामुळे तो हळूहळू सघापासून दूर होत गेला.

PUC पर्यंतचे अनिलचे शिक्षण औरंगाबादमध्ये झाले. पण एकूणच ॲकॅडमिक अभ्यासापेक्षा त्याला इतर गोष्टीत जास्त इंटरेस्ट असायचा. त्यावेळी गोविंद गिरधारी हा एक अनिलचा दोस्त. तो असाच एक अवलिया होता. काही तरी निमित्ताने पेपरात वगैरे त्याच नाव यायचं खरं, कुठल्या तरी निमित्ताने अनिलचेही अजिंठा पेपरात नाव यायचं. शेजारीपाजारी व आम्ही सगळी पोरं, आम्हाला त्याचं फार कौतुक वाटायचं हो! पेपरात नाव येण म्हणजे काही थट्टा नव्हे. अनिलने कधी कॉलेजातल्या नाटकातून वगैरे काम नाही केलं, पण काही सास्कृतिक कार्यक्रम झाल्यानतर त्यातले प्लस आणि मायनस तो चागल्या प्रकारे दाखवायचा. हां! S. B. कॉलेजात त्याने एकदा जादूचे प्रयोग केले होते.

## आम्ही पुण्याला आलो

पुढे १९६४ साली माझ्या वडिलाची बदली पुण्याला झाली आणि आम्ही पुण्याला आलो. पुण्यात अनिलची काही समाजवादी आणि साम्यवादी मडळीशी ओळख झाली......दोस्ती वाढली. त्याच्या डोक्यातील राष्ट्रप्रेम आणि धर्मप्रेम यातील धर्मप्रेम गळून पडले. 'नाझी भस्मासूर', 'व्होल्गा जेव्हा' आणि 'ड्रॅगन' वगैरे पुस्तकाची पारायणे झाली. मार्क्स, माओ...वगैरेंची लाल पुस्तके वाचायला सुरुवात केली. M. E. S. कॉलेजमध्ये B. A. साठी त्याने ॲडमिशन घेतली पण कॉलेजात त्याला रुची नव्हती. समाजवादी; साम्यवादी नेते व कार्यकर्त्यांबरोबर चर्चा करण्यात त्याला अधिक उत्साह असायचा. मात्र त्याने कॉलेजातल्या डिबेटिंगमध्ये कधी रस घतला नाही.

सघवाले आणि समाजवादी यात फार फरक असतो. संघवाले कधीही फारसा वाद घालत नाहीत. पण ही डावी मडळी प्रत्येक गोष्टीचा खल करून भरपूर वादविवाद करतात. अनिलही त्यांच्यात तासंतास गप्पा मारायचा. कॉलेजात पिरीएडसना जाणे हे त्याला माहीतच नव्हतं. कॉलेजातील यशस्वी किंवा हिरो पोराशी त्याचं कधी फारस जमायच नाही. तो कॉलेजच्या बाहेरील कॅफेमध्ये चहा पीत बसलेला असायचा. थोडसं लिखाण, बरचसं वाचन, सिनेमे पाहणं, गाणी ऐकण आणि गप्पा मारण हा त्याचा उद्योग असायचा. कॅफेत त्याच्याभोवती एक वेगळच मित्रमंडळ जमलेलं असायच. इथ एक गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे; अनिलभोवती जमणाऱ्यातली बहुतेकजण ही वर्गातील बॅकबेंचर्स, उपेक्षित, श्रीमत नसलेली आणि फ्रस्ट्रेटेड असायची. त्यांना कॉलेजातील हिरोपेक्षा अनिल जवळचा वाटायचा. अनिल सध्याची समाजव्यवस्था, राज्यकर्ते आणि शिक्षणपद्धती यावर टीकास्त्र सोडत असल्याने त्या सगळ्यांना स्वतःच्या वैयक्तिक अपयशाला सागण्यासाठी म्हणून एक सामाजिक कारण सापडायचं. चहापाण्याचा खर्चही कोणी तरी करायचा. त्यामुळे अनिललाही तोडाची वाफ फुकट गेल्यासारखं वाटायचं नाही. काही नोकरीवाले किंवा पैसेवाले मित्र अनिलची कपनीव्हॅल्यू लक्षात घेऊन त्याचा हॉटेलिंग, सिनेमा वगैरेचा खर्च करीत. पण यातून भागण्यासारख नव्हतं. घरून पॉकेटमनी भरपूर मिळण शक्य नव्हतं. मग काय? अनिलने पैसे मिळवण्यासाठी बरेच उद्योग केले.

आमच्या मामाचा दुधाचा धंदा होता. अनिल दुधाचं रतीब घालायचा. ओळखी बऱ्याच ठिकाणी झाल्या होत्या. मामाचे ग्राहकही माहितीचे. त्याच्याकडे अनिल दिवाळीत फटाके विकायचा. मे महिन्यात आबे विकायचा. फिरते वाचनालय चालू केले. सीझननुसार द्राक्षाचा स्टॉल चालवला. मित्राच्या घराला रग लावण्याचेही कॉंट्रॅक्ट घेतले. मी आणि इतर काही मित्र अनिलला यात मदत करायचो. त्यातून आमचाही पॉकेटमनी सुटायचा.

या काळात अनिलच्या व्यक्तिमत्त्वाची घडण तीन पातळ्यांवर होत होती. एक कॉम्रेड अनिल– राजकारणात इंटरेस्ट घेणारा, कम्युनिस्ट क्रांतीची स्वप्ने पाहणारा आणि त्यासाठी पत्रकारिता करणारा; दुसरा म्हणजे कलावंत अनिल; चांगले लिखाण करावे, नाटकसिनेमा काढावेत अशी महत्त्वाकाक्षा बाळगणारा आणि तिसरा म्हणजे व्यक्ती अनिल बर्वे काही तरी व्यवसाय करून स्वतःची गुजराण करण्याचा प्रयत्न करणारा.

त्या काळात अनिलच पुरोगामी मित्रमडळ बरच मोठं होत. अशात १९६७ च्या निवडणुका आल्या. पुण्यात कुणी कम्युनिस्ट उमेदवार नव्हता. पण जनसघाचा उमेदवार पडावा आणि एसेम् निवडून यावेत यासाठी ते सगळे कार्यरत असत. त्या काळी जनसंघाचा गोहत्याबंदीचा स्टट अगदी जोरात होता. अनिल आणि त्याच्या मित्रानी या स्टंटची टिंगल करण्यासाठी म्हणून 'म्हैसहत्या बंद करा' असा एक सायकल मोर्चा काढला. अनिल स्वत.ला 'आचार्य बाबा बर्वे' म्हणवून घेई. पुण्यातल्या चौकाचौकात थाबून ते म्हैसमातेचा जयजयकार करीत आणि उपरोधात्मक भाषणे ठोकीत फिरले पुण्यात दोन दिवस या कपनीने धमाल उडवून दिली.

पेपरवाले कम्युनिस्टाच्या बातम्या छापत नाहीत. कम्युनिस्ट विचारसरणी छापण्याची गोष्टच वेगळी. ते संघवाल्याच्याच बातम्या छापतात. फारतर समाजवाद्याच्या असे अनिल व त्याच्या ग्रूपला नेहमी वाटे त्यातनच स्वतःच एखाद मासिक काढावं अशी कल्पना सुचली. त्यानी पुढे संग्राम नावाच एक मासिक काढले. संपादन अनिल आणि डॉ. सुरेश यानी केल. त्यात त्याचा मुख्य इंटरेस्ट असे तो म्हणजे प्रथितयश लोकाना धक्का मारणे...त्यानी त्यात आचार्य अत्रेंना एक खरमरीत असे अनावृत्त पत्र छापले. अनिल आणि त्याच्या मित्राची अपेक्षा होती की अत्रेंनी त्याना 'मराठा' पेपरमधून झापाव. त्या निमित्ताने का होईना 'सग्राम' या मासिकाचे नाव लोकाना माहीत झालं असतं. पण आचार्य अत्र्यानी त्याची दखलच घेतली नाही. अर्थात सग्राम बद पडले. त्यामुळे पुढे स्वत.चे विचार माडायला स्वतःचा पेपर ही कल्पना तात्पुरती मागे पडली. त्याने पुढे साप्ताहिकात लिहायला सुरुवात केली. माणूस आणि रसरंगमध्ये किरकोळ लिखाण केलं

कलावंत अनिलने लिहिलेल्या पहिल्या नाटकाचे नाव आहे 'ज्युलिएटचे डोळे.' ते १९६९ मध्ये पुण्याच्या कॉस्मोपॉलिटन कल्चरल असोसिएशन नावाच्या एका संस्थेच्या नावाखाली महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेत सादर करण्यात आल. त्या नाटकावर प्रा. तोरड-

मलांच्या 'काळं बेट'ची छाप आहे.

पुढे ३ वर्षांनी त्याने 'कोलंबस वाट चुकला' हे नाटक लिहिलं. तेही नाटक स्पर्धेत सादर करण्यात आलं. नाटकाला स्पर्धेत जरी यश मिळालं नाही, तरी अनिलच्या लिखाणाचा दर्जा वाढला होता हे निश्चित. पुढे त्या नाटकाला सोव्हिएट लॅंड पुरस्कार मिळाला. मात्र दोन्ही नाटके स्पर्धेत सादर करण्यात अनिलला पैशाची बरीच खोट खावी लागली. त्यामुळे त्यापुढे त्याने कधी स्पर्धेचा विचार केला नाही. या दरम्यान त्याला नाट्यनिर्मितीची व अनुषंगिक इतर बरीच माहिती मिळाली. त्याचा उपयोग त्याला पुढे निश्चितच झाला.

या एकूण सगळ्या प्रकरणातून व्यक्तिगत अनिल बर्वेला खोट बसायची. पैशाची आवक वाढणे आवश्यक आणि नोकरी करण्याचा पिंड नाही. त्यासाठी काही तरी नियमित व्यवसाय करणे आवश्यक.


अनिलच्या एका मित्राची लक्ष्मीरोडवरची ४×८ जागा होती. त्याचा पुस्तकाचा धंदा काही चालायचा नाही. अनिलने ती जागा भाड्याने घेतली. त्यात ब्रेड, केक्स, पापड, लोणची...वगैरे पदार्थांचे दुकान थाटले. पण धंदा काही म्हणावा तसा होईना. नियमितपणे दुकानात बसणे ही गोष्ट अनिलला माहितीच नव्हती. आता एका ठिकाणी स्थिर राहणे हे त्याच्या रक्तातच नव्हते. त्याला तो तरी काय करणार? कित्येकदा असं व्हायचं. तो चारला दुकान उघडायचा. मला म्हणायचा, 'चंदा तू जरा दुकानात बस. माझं बाहेर एक काम आहे, तेवढं करून मी तासाभरानं येतो.' असं म्हणून तो जो सटकायचा तो यायचाच नाही. पुढे मी ८–३० वा. दुकान बंद करून घरी जायचो.

अशा तऱ्हेने कोणताही धंदा सुरू करायचं धाडस जरी त्याच्याकडे असलं तरी तो धंदा नियमितपणे चालवण्याची चिकाटी मात्र त्याच्याकडे नव्हती.

आता आम्ही दुकान चालवणार म्हणजे सगळा आनंदच, काही किस्से अजून आठवतात. एक सज्जन दुकानात ब्रेड खरेदीला आले... हा मोठा ब्रेड केवढ्याला?... तीस पैसे... ठीक आहे–एक ब्रेड द्या... हा घ्या... त्याचा हात खिसे चाचपतो...अरेच्या पाकीट घरीच विसरलो. मी इथे जवळच राहतो. एक दहा मिनिटात पैसे आणून देतो... हरकत नाही, आम्ही म्हणालो... पुढे तो सज्जन चेहरा पाहण्याचा पुन: कधी योग आला नाही... पण 'दहा मिनिटांनी याल तेव्हाच ब्रेड घेऊन जा' असं व्यवहारयोग्य सांगणे काही आम्हाला जमलं नाही.

हलवायाच्या तोंडाला पेढे पाहून पाणी सुटत नाही म्हणतात; पण वेगवेगळे केक्स पाहून आम्ही कधीही मोह आवरू शकलो नाही हे मात्र खरं.

एकदा दुकानात अशाच अंबापोळ्या विकायला ठेवल्या होत्या. एक खाऊन पाहिली. फारच आवडली. अंबापोळी खाणे काही परवडणारे नव्हते... एक शक्कल लढवली. एखादी पूर्ण अंबापोळी न खाता सर्व अंबापोळीची लांबी किंचित कमी झाली तर काही बिघडत नाही... सकाळी अंबापोळीची लांबी कमी झाली. संध्याकाळी रुंदी कमी करण्यात आली... दुसऱ्या दिवशी अंबापोळींना अधिक योग्य आकार देण्याचा प्रयत्न करण्यात आला. अंबापोळी कापून त्याची



धंद्याची अनिलला मनापासून आवड नव्हती.
गरज म्हणून मात्र अनेक उचापती..

◻

आयताकृती करण्यात आली... पुन: दोन तासाने अंबापोळी अधिक चांगली दिसावी म्हणून चौकोनी करण्यात आली... अशा रीतीने दोन दिवसानी आम्ही अंबापोळीची अंबावडी करून विकली.

हा! तर सांगायचा मुद्दा म्हणजे धंद्याची अनिलला मनापासून काही आवड नव्हती. केवळ पैशाची गरज म्हणून तो या उचापती करायचा. नाटक, सिनेमे, वाचन, गाणी आणि गप्पा ही त्याची मनापासून आवड. आणि त्याच्या या आवडीत देखील प्रोकम्युनिस्टांचे मदरइंडिया सारखे सिनेमे किंवा साहीरची गाणी ही अनिलची अधिक आवड. तो त्या काळात अगदी पक्का कम्युनिस्ट झाला होता. पोटासाठी म्हणून तो जरा 'धंदा' नावाची अँटिकम्युनिस्ट गोष्ट करीत असला तरी त्यातही तो कम्युनिझम विसरलेला नव्हता. काम करणाऱ्या हमालाला तो इतरांपेक्षा थोडी जास्त मजुरी देई. दुकानातली वेफर्सची...वगैरे पाकिट एका शिवदे नावाच्या म्हाताऱ्या कॉम्रेडला फायदा न घेता उधारीवर देई...वगैरे...पण तोपर्यंत एकूणच अनिल बर्वे हे व्यक्तिमत्त्व जवळच्या काही लोकांनाच माहिती झालेलं होतं. इतरांना त्याच्या लेखनशैलीची आणि विचारसरणीची प्रथम ओळख झाली ती 'माणूस'मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'रोखलेल्या बंदूका आणि उठलेली जनता' या लेखमालेतून.

त्या काळात नक्षलवाद्यांच्या बाजूने प्रतिष्ठित पेपरमध्ये लिखाण करणे धाडसाचे होते. अनिलने ते धाडस आपल्या आठ लेखातून दाखवले. त्याला नक्षलवाद्यांविषयी मनापासून प्रेम वाटे. या लेखमालेनिमित्त तो आंध्रमध्ये भरपूर हिंडला. खूप माहिती गोळा केली. मला अजून आठवतंय, तो हैदराबादहून पुण्याला घरी आला तेव्हा रात्रीचे दोन वाजले होते. काही वेगळं अनुभवलं की तो फार एक्साइटेड असायचा. त्यावेळी तो असाच एक्साइटेड होता. नक्षलवाद्यांचे

कर्तृत्व त्याने मला सकाळी सहापर्यंत ऐकवले. अनिलने ती लेखमाला फार पोटतिडकीने लिहिली कुठे अत्याचार दिसला बनचुक्या पत्र-काराना मोठी स्टोरी किंवा scoop मिळाल्याचा आनद होतो. अनिलचं तसं नव्हतं. तो स्वतःच्या लिखाणात अतिशय प्रामाणिक आणि involved असायचा सामान्य लोकापर्यंत पोहोचलेला अनिल-इतका प्रभावी दुसरा कोणीही कम्युनिस्ट नव्हे. अनिलला चांगल्या पेपरमध्ये चांगले कॉलम्सही मिळाले. माणूसचे सपादक श्री. माजगावकर यांची विचारसरणी अनिलहून भिन्न असूनही, अनिलच्या लिखाणावर फारशी सपादकीय बंधने आली नाहीत. अनिलला ' माणूस 'मधून लोकांपर्यंत पोहचवेल असं लिखाण करण्यास स्वातंत्र्य होतं; परंतु अनिल अतिमहत्त्वाकांक्षी होता, त्यामुळे दुसऱ्याच्या पेपरमध्ये लिहिण्यापेक्षा स्वत.चा पेपर काढावा अशी त्याची इच्छा होती.

अनिलचं फ्रेन्डसर्कल मोठं होतं; परंतु त्यातल्या बऱ्याच जणाना स्वत.ची अशी आयडेंटिटी होती. जयंत प्रधान वकील होता. तर सुरेश बेरी डॉक्टर काही कॉम्रेड्स् इंजिनियर, प्राध्यापक, बँक अधिकारी वगैरे होते. काहीना वडिलांचा बिझनेस मिळालेला... तशी कुणालाच उद्याच्या भाकरीची चिंता नव्हती. अनिल मात्र लोअर मिडल क्लासमधला अजून B. A. ची डिग्रीही न मिळालेला कॉम्रेड होता.

हे कॉम्रेड्स एकत्र आले की भरपूर विचारविनिमय होत असे. लोकांना न पडलेले प्रश्न यांना पडत आणि हेच उत्तर शोधायचा प्रयत्न करीत. बोलणे वाढले की वाद आलाच ...त्यातनच थोडी अहमहमिका सुरू व्हायची...आणि शेवटी तू कोण ? तू स्वतःस काय समजतोस ? Who are you ? हा प्रश्न निर्माण व्हायचाच. अनिलकडे इतरांइतके चागले उत्तर नव्हते.

हाच प्रश्न आजच्या नातेवाईकानीही विचारला असेल; पण त्या वेळेस मी एक कॉम्रेड आहे. मी कम्युनिस्ट याचाच अर्थ मी तुमच्या-पेक्षा अधिक हुषार आणि पुरोगामी आहे असं उत्तर गृहीत धरून तो बोलायचा. परंतु कॉम्रेड मडळींच जेव्हा हा प्रश्न विचारायची तेव्हा कुठे तरी आपण उपेक्षित आहोत ही बोचणी त्याला लागायची. त्यामुळे त्या काळात अनिल स्वत.ची आयडेंटिटी निर्माण करण्याच्या प्रयत्नात होता. 'संपादक अनिल बर्वे' ही आयडेंटिटी त्याला आवडणारी होती. त्यातून सामाजिक प्रतिष्ठा आणि आपले विचार मांडण्याचे हत्यार या दोन्ही गोष्टी त्याला मिळणार होत्या.

अनिलने श्याम मोकाशी नावाच्या त्याच्या मित्राच्या मदतीने ' फुलवा ' नामक सिनेसाप्ताहिक चालू केले...यथावकाश ते बदही पडले; पण अनिलला अनुभव आला. थोडे सपादकीय शहाणपण मिळाले.

अनिलला गुरूसमान असणारे कॉम्रेड V. Y. कोल्हटकर...जग फिरलेले, हुषार, गाडी बंगला असलेले बुद्धिमान कम्युनिस्ट विचारवत अनिलवर खूष होते., त्यांनी काही पैशाची मदत देऊ केली. अनिलने एक पाक्षिक सुरू केले. 'रणांगण'. पाक्षिक सुरू झाले. अनिलच्या बऱ्याच मित्रांनी रणांगणला आजीव सदस्य (Life members) मिळवून दिले. रणांगणचा खप थोडा वाढू लागला काही अनोळखी वाचकही Life member झाले. अक दर्जेदार निघू लागला; पण धद्याचं गणित नीट जमेना जाहिराती नाहीत. विक्रेते लोक पैसे देताना टोलवाटोलवी करायचे. मात्र रणांगणमध्ये अनिलने जीव ओतला होता. रणांगणच्या यशासाठी तो रात्रदिवस मेहनत करी. त्याला मित्राचे सहकार्य मिळायच; पण थोडेसे. फार नाही. लेखक मडळी रणांगणासाठी लिहिताना मानधनाची अपेक्षा ठेवत नसत, प्रत्येकजण Life member झालेलाच होता; पण हळूहळू साप्ताहिक चालवणे ही गोष्टच फार कठीण होऊन बसली. कागदाच्या किंमती वाढल्या. सरकारी मेहेरनजर तर नव्हतीच, शिवाय कोणी पोलिटिकल गॉडफादरही रणांगणाच्या मागे उभा नव्हता...पैशाची गरज तर वाढणारीच होती... मग त्याने ' विवस्वना ' नावाची एक स्वत.ची प्रकाशन सस्था काढली. काही पुस्तके छापली...पण पुस्तकाचे पैसे फार हळूहळू वसूल होतात. त्यामुळे त्याचा रणांगणला काही हातभार लागेना...दर आठवड्याला साप्ताहिक काढणे ही गोष्ट शिवधनुष्याप्रमाणे जड होऊ लागली. रणांगणचा सर्वेसर्वा अनिलच झाला होता. त्यामुळे सगळे वजन त्याच्या अगावरच आले... रणागणमध्ये अनिलने जीव ओतला असल्याने तो फार गभीर झाला होता. मात्र तरीही रणांगणने कधीही चलो जर्नालिझम केला नाही. राशी भविष्य, फिल्मी गॉसिप.. वगैरे गोष्टीना रणांगणमध्ये कधीही थारा मिळाला नाही. रणागण स्वत.च्या पायावर उभे रहाण्याच्या बेतास असतानाच ढळू लागले.... मधनच एखादा अंक निघेनासा झाला.

अशातच एक महत्त्वाची घटना घडली—

सपादक अनिल बर्वे आणि छापखान्याचे काशिनाथ पायगुडे याना अटक.

हे प्रकरण त्यावेळी पुण्याच्या पेपरमध्ये गाजले. पोलिसांना सुगावा लागला काही नक्षलवादी पत्रके छापली असल्याचा. त्यांनी प्रेसवर धाड घातली. बर्वे-पायगुडे सरकारी पाहुणे झाले. १२२ अ. कलमाखाली गभीर आरोप असल्याने त्याना जामीन नाकारून मॅजिस्टेट कस्टडी या नावाखाली तुरुंगात ठेवण्यात आले. विनाखटला विनाचौकशी या अन् त्या कारणाखाली दीड वर्षाचा तुरुंगवास लाभला. अनिलचा एकही कॉम्रेड मित्र अनिलला तुरुंगात भेटायला काही कधी आला नाही. हो ! विनाकारण पोलिसांचा ससेमिरा कोण मागे लावून घेईल ! अर्थात कम्युनिस्ट क्रांती करण्याची सगळ्याची इच्छा होती. ही गोष्ट वेगळी. हां ! नाही म्हणायला श्रीधरपंत फडके नामक एक सघाचे कार्यकर्ते त्याला तुरुंगात जाऊन भेटले. आमच्या घरीही ते कधी कधी येत व आईला धीर देत. तुमचा मुलगा हा राजकीय कैदी आहे ! यात तुम्हाला कमीपणा वाटण्याचे काही कारण नाही .. वगैरे. त्या काळात आमचे वडील रिटायर्ड झालेले होते. आम्हा बाकी भावांची शिक्षणं चालू होती... त्यामुळे घरी आर्थिक झळ मात्र बरीच चटके देऊन गेली. त्या काळात अनिलला भेटणे, वकिलांना भेटणे.. वगैरे गोष्टी मी आणि माझा भाऊ शिरीष करीत असू. अनिलने कबूल नाही केलं; पण अनिलचा त्याच्या कॉम्रेड मित्राबद्दल भ्रमनिरास झाला होता. तुरुगाची हवा काही अनिलला मानवली नाही. त्याची प्रकृती एकदम खालावली.... शेवटी कितीही झालं तरी मध्यमवर्गीय ब्राह्मणी कुटुबात वाढलेला, गप्पा, वाचन, सिनेमा, गाणी वगैरे गोष्टीत

रमणारा कलावंत प्रवृत्तीचा कॉम्रेड हा तुरुंगात कसा ठीक राहणार?

..खटला वाढतच गेला. अनिल डिस्टर्ब होत गेला... कोर्टातील तारखेच्या दिवशी बरेचजण भेटायचे. अनिल चेहऱ्यावर नेहमी उसने हास्य ठेवून असायचा.

### तुरुंगात दै. केसरी न्यायला बंदी

पोलिसही वेळकाढूपणा करायचे. पोलिसी कारभार आणि लाल फीत म्हणजे काय हे आम्हाला त्यावेळी जवळून पाहायला मिळालं. पोलिसांशी डील करणं ही कठिण गोष्ट आहे. हे अतिशय हुशार किंवा बिनडोक माणसालाच शक्य आहे. आमच्यासारख्या इतरांचं फार कठीण असतं. अहो ! तुरुंगात दै. सकाळ किंवा इतर कोणताही पेपर नेलेलं चालायच. पण दै. केसरी न्यायला बंदी होती .. अलिकडे एकदा तिथल्या एका अधिकाऱ्याला सांगायचा प्रयत्न केला की ही बंदी लोकमान्यांच्या काळात ब्रिटिशांनी घातलेली असणार पण आता आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून २५ वर्षे लोटून गेली आहेत आणि आता केसरी हे सरकारवर आग पाखडणारे वृत्तपत्र राहिलेले नाही–

पण त्या अधिकाऱ्याने विचारलं 'म्हणून काय झालं ?'

अनिलच्या लक्षात आलं की आपलच काही तरी चुकलं. त्यापुढे मात्र त्याने कोणत्याही पोलिसाला कोणतीही गोष्ट समजवण्याचा प्रयत्न केला नाही.

*पायगुडेंची गोष्ट मात्र वेगळी. एके काळी लाल निशाण पक्षाचं* कार्य केलेला हा गृहस्थ ! नेहमी शांत असायचा. भरपूर वाचन करणारा, प्रकृती असलेला हा गृहस्थ. तुरुंगात त्याचं वजन एका पौंडानेही घटलं नाही. मानसिक संतुलन होतं तसंच शेवटपर्यंत कायम राहिलं. आम्ही सगळे लोक सोडता अनिलचा एकही नातेवाईक चुकूनही अनिलला तुरुंगात भेटायला आला नाही. मात्र पायगुडेंचे सर्व नातेवाईक कम्युनिझमशी दुरान्वयेही संबंध नसताना आवर्जून आपापली कामे सोडून त्यांना भेटायला येत असत.

त्या काळात अनिलला खरी मदत केली ती माणूसच्या श्री. माजगावकरांनी.

इतर काही सिंपथायजर्स कोर्टात तारखेच्या दिवशी अनिलला भेटायला येत थोडीबहुत आर्थिक मदत करीत. असेच एकदा सोबतकार ग. वा. बेहेरेही भेटले.

अनिलच्या अटकेपूर्वीच्या रणांगणच्या एका अंकात अनिलने समाजवादी एस. एम. जोशींवर बरीच झोड उठवली होती; परंतु अनिलवर अन्याय होतोय ही गोष्ट लक्षात येताच एस. एम. नी एका जाहीर सभेत या अन्यायाविरुद्ध सरकार आणि पोलिसांवर टिका करून अन्यायाला वाचा फोडली. अनिलचे कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते श्री. र. के खाडीलकर आणि श्री. मोहन धारिया यांच्याशी चागले संबंध होते. परंतू ते अधिकृतरित्या अनिलला फारशी मदत करू शकले नाहीत; ( तुरुंगाधिकारी आणि पोलिसांना ही गोष्ट माहित असल्या मुळे असेल कदाचित, पण अनिलवर काहीही थर्ड डिग्रीचा पोलिसांनी प्रयोग केला नाही. )

या खटल्यात अनिलचे वकीलपत्र सुप्रसिद्ध वकील श्री. एम. आर. परांजपे यांनी घेतलं होतं.

परिणामी न्यायाधीश श्री. पाटील यांनी आपल्या निकालपत्रात पोलिसांवर ताशेरे ओढून बर्वे–पायगुडे यांनी संपूर्ण निर्दोष म्हणून मुक्त केलं.

अनिल सुटून घरी आला त्या दिवसाची एक गोष्ट आठवते.

आमच्या घरी आम्ही दोन पोपट पाळले होते. मी आणि आमच्या वाड्यातील मित्रांनी, लहानपणी कथेत वाचल्याप्रमाणे, अनिल जेव्हा सुटून येईल तेव्हा हे पोपट आपण सोडून देऊ, असं ठरवलं होतं. परंतु खटला जसा वाढत गेला तसा दरम्यान एक पोपट मेला. अनिलच्या सुटकेच्या दिवशी दुसऱ्या पोपटाला उठविण्यासाठी आम्ही पिंजऱ्याचे दार उघडले. पण तो पोपट पिंजऱ्याबाहेर पडायलाच तयार नव्हता. त्यामुळे त्या दिवशी आम्हा वाड्यातील मित्रांना आनंदाबरोबर किंचितपणे दुःखही झाले.

या खटल्यामुळे एकूणच अनिलची आर्थिक स्थिती फार खराब झाली. लक्ष्मीरोडवरचे ते दुकान श्री. गिलाजी नामक एका व्यापाऱ्यास चालवण्यास दिले. लँब्रेटा स्कूटरचे एक जुनं मॉडेल अनिलने विकत घेतलेले होते. ती स्कूटरही पुढे विकून टाकली.

तुरुंगातून सुटून आल्यानंतर अनिल जरा अधिक सावध झाला. त्याचे अनुभव भांडारही वाढले स्वप्नाळूपणा कमी झाला. बाहेर आल्यावर त्याने सोबतमध्ये, बाळंतपणासाठी मुद्दाम तुरुंगवास भोगायला येणाऱ्या बायकावर लेख लिहिला. तिथून पुढे अनिलची सोबतकरांशी दोस्ती जमली.

दरम्यान आणखी एक घटना घडली होती. अनिलचे ज्या मुलीवर प्रेम होते, तिचे लग्न झाले होते. *अनिलचा स्वभाव* पाहता तो बराच अपसेट होईल अशी भीती वाटत होती, पण तसे काही घडले नाही. तो बऱ्यापैकी संतुलीत राहिला. त्याने पुन्हा रणांगणच्या कामाला सुरुवात केली. त्याचे समविचारी मित्र, ज्यांनी तो तुरुंगात असताना त्याची कधीही चौकशी केली नाही, अशांनीही रणांगणला lite mem bers मिळवून द्यायला मदत केली, बहुधा स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धीची टोचणी कमी व्हावी म्हणून असेल.

रणांगण पुनः सुरू झाले. दरम्यान अनिल बर्वे हे नाव लोकांना माहिती झालेले होते. आणि अतिडावी विचारसरणी असलेल्या बरेच जणांनी अनिलचा परिचय करून, दोस्ती करून घेतली होती. 'रणांगण'चा खप वाढला. रणांगणची भूमिका अर्थात डावी होती. मात्र रणांगणमधून कधीही अतिडावा अतिरेकी विचार मांडला गेला नाही नक्षलवाद्यांबद्दल सहानुभूती जरूर होती. परंतू नक्षलवादी आजचे सामाजिक प्रश्न सोडवण्यात असमर्थ आहेत, ही गोष्टही स्पष्ट झाली होती.

रणांगणच्या निमित्ताने आणखी एक गोष्ट घडली.

शाहीर अमरशेख यांची मुलगी प्रेरणा. शाहीरशेख यांच्या अपघाती निधनानंतर कॅरोनर कोर्टात त्यांच्या धर्माचा प्रश्न उद्भवला होता. त्यावेळेस प्रेरणाने निक्षून हिंदू मुस्लिम वगैरे न सांगता 'मानवता' हाच धर्म असं सांगितलं होतं. अनिलने हे पेपरात वाचलं होतं. रणांगणचा शाहीर अमरशेख यांच्यावर एक विशेषांक अनिलने काढला. त्यानिमित्ताने प्रेरणाची आणि अनिलची ओळख. ...पुढे लग्न ! धर्माचा प्रश्नच नव्हता .. नोंदणी पद्धतीने लग्न ! आमचे एक पुराणमतवादी नातेवाईक खुष झाले ! हो ! कारण की बरेचदा हिंदू मुली मुसलमान मुलाशी लग्न करतात व त्यांची संख्या वाढते. त्यापेक्षा हिंदू मुलगा मुस्लिम मुलगी हे जास्त चांगलं. दोघं धर्म जरी

मानत नसले तरी संस्कार थोडेबहुत होतीलच की !

वडिलांचा लग्नाला विरोध ! ते लग्नालाही आले नाहीत. माझ्या वडिलाच्या दृष्टीनेही अशी लग्ने होणे काही वाईट नाही ! पण ते दुसऱ्याच्या घरात. आपल्या नव्हे... असं. वडिलाचा राग काही फार दिवस टिकला नाही. शेवटी माणसाचे एकमेकाशी संबंध काही जाती धर्मावर अवलंबून नसतात. स्वभाव ही गोष्ट जास्त महत्त्वाची. आणि प्रेरणाचा स्वभाव जरा अधिकच चागला.

अशा रीतीने रणागणच्या ससाराबरोबर अनिलचा वैयक्तिक संसारही सुरू झाला. मु. पो. मुबई येथे ! त्यापुढे अनिल कायमचा मुबईकर झाला.

अनिल जरी स्तभलेखक किंवा लेखक म्हणून उत्कृष्ट असला तरी 'सपादका'ला आवश्यक असणारे सर्व गुण त्याच्याकडे कधीही नव्हते. एकखांबी तंबू फार काळ टिकत नाही, हे त्याला कधीही नीट समजले नाही. बरे, दुसऱ्या कुणाच्या हाताखाली काम करण्याची सवय नाही. त्यामुळे तो आणि त्याचे समविचारी इटेलेक्चुअल्स याचे कधीही नीट जमले नाही. इथे हळूहळू सर्वांच्या राजकीय विचार-सरणीव्यतिरिक्त सगळयाच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा यांचाही ताळमेळ जमत नव्हता.

सुधीर बेडेकर हा अभ्यासू कॉम्रेड मागोवा चालवत असे. तो व त्याचे सहकारी, अनिलच्या मते, ते सगळे चारचौघात कॉफी पिताना आपली वेगळी आयडेंटिटी असावी म्हणून झालेले कम्युनिस्ट होते... त्याच्या मते अनिल हा वैयक्तिक महत्त्वाकाक्षेने पेटलेला, वैचारिक बैठक स्थिर नसलेला मूर्ख कम्युनिस्ट होता.

...दोघाच्याही आरोपात तथ्यांश आहे. 'मागोवा' ही जरा उजव्या कम्युनिस्टाची मित्रमडळी. 'राजकारण' हे अतिडावे व मध्यम डाव्या कम्युनिस्टाचे साप्ताहिक. कॉम्रेड V. Y. कोल्हटकरांचा आशिर्वाद असलेला होता परंतु अनिलची काम करण्याची व खर्चाची पद्धत त्याना आवडत नसे. 'रणागण'च्या सपादकाने पुणे–मुबई हा प्रवास टॅक्सीने करणे V. Y. ना पटणारे नव्हते. परतु अनिल कम्युनिस्ट विचार जनसामान्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचवू शकतो ही ही गोष्ट लक्षात घेऊन ते अनिलशी वाद घालणे टाळायचे.

मागोवा आणि रणागणची मित्रमंडळी एकमेकाला सहकार्य मात्र अवश्य करीत. फक्त ते एकमेकाला मदत करताना मदतीपेक्षा उपदेश जास्त करीत. महाभारतात कर्णाला शल्याने जसे सहकार्य केले तसेच सहकार्य ते एकमेकाला करीत.

१९७४ साली जेपीनी सपूर्ण क्रातीची भाषा सुरू केली. सगळीकडे राजकीय वातावरण ढवळून निघाले. त्या गदारोळात अनिलही राजकीय भाष्ये करीत होताच......इथून पुढे त्याच्या डोक्यातील राजकीय गोंधळ वाढायला लागला. 'रणागण'च्या एका अकात जेपीचे आदोलन हे जनआदोलन आहे. ..सपूर्ण क्रांती. ..काळाची गरज . वगैरे छापले. त्यानतर एकदा श्री. डागे यांना भेटला असता डांगेंनी अनिलला जबरदस्त ब्रेनवॉश केला. काही दिवसानी रणागणने जेपी हे प्रतिगाम्याच्या हातातील बाहुले आहे, त्याच्या चळवळीचा बिमोड केला पाहिजे...वगैरे छापले. अर्थात अनिलने हे दोन्ही विचार दोन्ही वेळेला अगदी मनापासून लिहिले होते. खरं काय हे त्यालाच नीट कळेनासं झालं होतं.

अनिलने डागेवादी सूर लावल्यावर V. Y. कोल्हटकर त्याच्या-वर भयकर सतापले. त्यानी आपला साचलेला राग व्यक्त केला. अनिलने दुसऱ्याच्या पैशावर स्वतः मजा मारू नये...वगैरे. अनिलही दुरुत्तरे करण्यात व घालून पाडून बोलण्यात कमी नव्हता...पुढे त्या दोघाचे संबंध अतिशय वाईट झाले.

### थँक्यू मि. ग्लाड

मुबईत एकदा दोन्ही कम्युनिस्ट, समाजवादी, शेकापक्ष आणि लाल निशाण गट अशा पाच डाव्या पक्षाचे पुढारी एकत्र जमले. बोलाचाली केल्या...वगैरे. अनिल एकदम भारावून गेला. रणागणा-मध्ये सगळयाचा एकत्र फोटो छापला. आता महाराष्ट्रात पुरोगामी विचारसरणीची डावी आघाडी काही तरी प्रचंड क्राती करणार अशी दिवास्वप्ने तो रणागणमध्ये रेखाटू लागला. डावे एकत्र आले की अनिलला सपादकीय भाष्य करणं सोपं जायचं. डाव्याच कौतुक करा-यचं आणि बाकीच्यांना शिव्या घालायच्या. कोणत्याही राजकीय घटनेवर या एका दृष्टिकोनातून भाष्य करायचं. पण अनिलचं हे सपादकीय काम इतक सोपं असणार नव्हतं...डाव्याच्यात फूट पडली. डावे कम्युनिस्ट जेपीच्या बाजूने तर उजवे कम्युनिस्ट कॉंग्रेसच्या बाजूने. इतराचे असेच काहीतरी ! अनिलची पचाइत व्हायची. अनिलचे मित्र आणि रणागणचे वाचक हे या सर्व डाव्या पक्षात विखूरलेले होते...अनिलच्या एक गोष्ट लक्षात आली की या कम्युनिस्टाच्या मदतीने काही आपला पेपर टिकाव धरू शकणार नाही. कम्युनिस्टाच्यात उपजाती बऱ्याच असतात. (इमर्जन्सीत जेव्हा नक्षलवाद्यावर बदी घालण्यात आली तेव्हा त्यांच्या एकूण २२ गटावर बदी घालण्यात आली होती.) प्रत्येकाची आपण स्वत. शहाणे असून बाकीचे मूर्ख आहेत याबद्दल खात्री. त्यामुळे त्याच्यापैकी एकाच जरी कौतुक केल तरी बाकीचे शिव्या घालत.

या कम्युनिस्टाच्या मदतीवर रणागण चालणे कठीण हे अनिलने ओळखले. रणागणसाठी कोणी वेगळा Financer च्या शोधात अनिल होता. मराठा पेपरमध्ये अनिलचे जाणेयेणे चालूच होते. पुढे कै. व्यकटेश पैशी अनिलची दोस्ती जमली...पुढे रणागण मराठा प्रेस-मधून छापले जाऊ लागले. रणागणचा अतिडावेपणा कमी झाला. वि. वि. करमरकराच्या मदतीने एक क्रिकेट विशेषाक काढला. अंक वाचकाची रूची लक्षात घेऊन काढलेला असल्यामुळे हा पेपर चागला उचलला गेला. यात अनिलने एक महत्त्वाची गोष्ट छापली होती. 'वधस्तभावरील जाहीरनामा' नागभूषण पटनाईक नावाच्या एका नक्षलवाद्याला फाशी झाली होती. त्याने आपल्या मृत्युपत्रात नेत्र-दान, मूत्रपिडदान करून शव मेडिकल कॉलेजला शवविच्छेदनासाठी देण्यात यावे अशी इच्छा व्यक्त केली होती...अनिलने त्या क्रिकेट विशेषाकात हे मृत्यूपत्र जसेच्या तसे छापले. अनेक वाचक ते वाचून फार भारावून गेले...पुढे यथावकाश रणागण बद पडल्यानतर याच मृत्यूपत्राचा अनिलने आपल्या 'थँक्य मि. ग्लाड', या कादबरीसाठी आधार घेतला.

अनिलला तुरुंगाचा अनुभव होताच. तुरुगात अनिल अतिशय डिस्टर्ब्ड असायचा. एखाद्या निर्भीड ध्येयवादी क्रातिकारकाने ज्या प्रमाणे तुरुंगवास स्वीकारायला हवा तसा तो अनिल स्वीकारू शकत नव्हता. या कादबरीचा नायक हा अनिलच्या wishful thinking मधून तयार झाला. आपण जसे वागू शकत नाही, पण जसे वागायला

हवे, या त्याच्या दिवास्वप्नातून ह्या कादबरीचा नायक 'नागभूषण पटनाईक' हा साकार झाला. अनिलच्या उत्कृष्ट पत्रकारितेची सुरुवात 'माणूस' मधून झाली. 'थॅंक्यू मि. ग्लाड' ही कादबरीही माणूसने दोन अंकात छापली ते दिवस आणीबाणीचे होते त्या काळात ही कादबरी वाचकाच्या हातात पडणे म्हणजे एक आश्चर्यच होतं. हीच कादबरी पुढे पुस्तकरूपाने आली; वाचकाची भरपूर दाद मिळाली. प्रोकम्युनिस्ट लिखाण ही काही मराठीत नवीन गोष्ट नव्हे. पण सामान्य वाचकाच्या काळजाला हात घालणारी अशी कम्युनिस्ट विचारसरणीची बैठक असणारी ही कादबरी पहिलीच असावी.

अँटीकम्युनिस्ट मडळी देखील ही कादंबरी अतिशय प्रेमाने वाचत. इथे एक गोष्ट महत्त्वाची वाटते त्याग करण्याची वृत्ती ही कोणत्याही पुरोगामी, प्रतिगामी, धार्मिक, अधार्मिक वृत्तीच्याही वरची मनोअवस्था आहे याचे आकर्षण सामान्यामध्ये आढळतेच. कोणत्याही भावनाप्रधान माणसाला, तो कोणत्याही विचारसरणीची बांधीलकी मानणारा असो, त्यागाच उत्तुग दर्शन वाचायला आवडत. अनिलदेखील गोपाळ गोडसेंची 'गांधीहत्या आणि मी' व '५५ कोटीचे बळी' ही दोन पुस्तके वाचून अतिशय भारावून गेला होता. गोडसेंच्या घरी जाऊन त्याना भेटलाही होता. नथुरामच्या अस्थीचा कलश अजूनही त्या घरात आहे. नथुरामच्या इच्छेनुसार जेव्हा कधी अखड भारत स्वतत्र होईल तेव्हा या अस्थी सिंधू नदीच्या पात्रात सोडाव्यात–हे ऐकूनही अनिल फार हालला होता.

'थॅंक्यू मि. ग्लाड' ही कादंबरी महाराष्ट्रभर गाजली. पणशीकरांनी अनिलकडून त्यावर नाटकही लिहून घेतले. दारव्हेकर मास्तर यानी ते नाटक बसवले चागले, पण कादवरीतील मजा काही नाटकात आला नाही...मात्र नाटकामुळे अनिलला पैसा आणि प्रसिद्धी भरपूर मिळाली. इतर भाषातून अनुवाद झाले...कादंबरीच्या दुसऱ्या आवृत्तीला श्री. श्री. अ. डागे यानी प्रस्तावना दिली. एव्हाना रणांगण बद पडलेले होते; त्यामुळे अनिलने यापुढे ललित लिखाणावर जास्त भर द्यायला सुरुवात केली.

रणागणच्या निमित्ताने अनिलला एक दोस्त मिळाला होता. नामदेव ढसाळ त्या काळात गोलपिठामुळे नामदेव एकदम प्रकाशात आला होता. रिपब्लिक पार्टीचे बरेचसे धोरण पाहून त्याने दलिताची एक लढाऊ सघटना आणि एक लढाऊ पेपर एकत्र झाले रणांगणमधून दलित पँथरचे कोडकौतुक सुरू झाले. अनिलची आणि नामदेवची दोस्ती झाली

नामदेवच्या मागे त्या काळी हजारो पँथर्स होते. दलित पँथर ही एक शक्ती तयार झाली होती, त्यामुळे कम्युनिस्टाच्यात शक्यतो नामदेवला आपल्याकडे ओढून घ्यायची स्पर्धा लागली. नामदेवच कौतुक सगळीकडून सुरू झाल. पँथरमधील काही लोकांचा कम्युनिस्टाना पक्का विरोध अर्थात नामदेव ही गोष्ट जाणून होता. त्यामुळे तो कोणत्याही कम्युनिस्ट पक्षात सामील झाला नाही. पण मनातून त्याचा कम्युनिस्टाकडे ओढा असे.

नामदेवची आणि अनिलची दोस्ती वाढली. दोघाचेही स्वभाव सारखेच असल्यामुळे त्याचे एकमेकाशी नीट जमणे शक्य नव्हते. दरम्यान प्रेरणाची बहीण मल्लिका ही नामदेवच्या प्रेमात पडली. त्याचा गाधर्वविवाह झाला. अशा रीतीने एक झोपडपट्टीत लहानपण गेलेला कवी नामदेव आणि मध्यमवर्गीय ब्राह्मणी समाजातला अनिल हे एकमेकाचे साडू झाले.

आता दोघे एकाच घरातले मेंबर्स झाले... अतिपरिचय... भांडणाला सुरुवात झाली... घरात पार्टिशन पडले पुढे दोघे सख्खे शेजारी झाले... जरा वातावरण शात झाले पण तात्पुरते.

खालीलप्रमाणे बरेचदा घडले.

कुठली तरी एखादी बातमी वाचून एक जण शेजारी गप्पा मारायला गेला. एकाने कॉमेंट केली, दुसऱ्याने दाद दिली गप्पाना सुरुवात झाली... एकाकडे एक क्वार्टर शिल्लक होतीच. दुसऱ्याने शेजारनं पटकन दाणेपापड आणि दोन ग्लास आणले... गप्पा रगल्या... दोन दोन पेग घेऊन झाले... गप्पाचा विषयही वाढत गेला... तू ग्रेट... तू ग्रेट... मीही ग्रेट... पण मी जास्त ग्रेट... नव्हे मी एकटाच ग्रेट. तू फाल्तू आहेस... तुझी भडव्या लायकी ती किती ?...

अशा प्रकारे सवादाचा परिसवाद होऊन सुरुवातीला चागल्या मूडमध्ये असलेले हे दोघं एकमेकाना शिवीगाळ करीत या सुसवादाचा समारोप करीत.

आजपर्यंत अनिलला सामान्याशी तासतास वाद घालायची सवय होती... त्यामुळे अनिल जरा तोल जाऊन वाट्टेल ते बडबडत सुटला की दुसरा बर बाबा, तुझच बरोबर असं म्हणून निरोप घेई पण नामदेवची गोष्ट वेगळी. तो सवाई अनिल होता. त्यामुळे त्या दोघाचं फारसं पटल नाही.

दरम्यान 'थॅंक्यू मि. ग्लाड' मुळे अनिलची आर्थिक स्थिती एकदम सुधारली. नाटका–सिनेमाचे, तसच इतर भाषातून अनुवादाचे पैसे मिळाले. प्रेरणाने बॅंकेकडून कर्ज काढलं. घरातल सोनं विकलं. इकडून–तिकडून पैसे गोळा केले आणि दादरला फ्लॅट घेतला. त्याकाळी ९०,००० रु. गोळा करताना अनिलची अगदी त्रेधातिरपीट उडाली. फ्लॅटमध्ये राहायला जाईपर्यंत त्याची अगदी दमछाक झाली. पण अशा रीतीने का होईना, अनिल पॉश लोकॅलिटीतील पॉश फ्लॅटमध्ये राहायला गेला १५ फ्लॅटात असलेल्या सोसायटीच्या टेरेसवरती मात्र १४ च टिव्हीच्या अँटेना दिसायच्या, हे काही वेगळं सागायला नको इथेही अनिलचा अतिरेकी स्वभावच दिसून येतो. असो !

हळूहळू अनिल 'एस्टॅब्लिशड' अशा सोसायटीचा मेंबर होऊ घातला होता. पण त्याच्या लिखाणातून 'अँटीएस्टॅब्लिशमेन्ट'चा सूर मात्र कमी झाला नाही... त्याची सोबतच्या दिवाळी अकात 'डोगर म्हातारा झाला' ही कादंबरी प्रसिद्ध झाली.

कम्युनिस्टाना 'कॉम्रेड' म्हणून सबोधतात. हा शब्दही मोठा डिग्नीफाइड वाटतो. कॉम्रेड म्हणवून घेताना छोट्या कार्यकर्त्यालाही प्रमोशन मिळाल्यासारख वाटत. बाळ ठाकरेंनी मात्र 'कॉम्रेड' या शब्दाची विटंबना करण्यासाठी म्हणून कमराद हा मराठी शब्दप्रयोग सुरू केला जुने जर मार्मिकचे अंक पाहिले तर 'कमराद' हा शब्द प्रयोग करण्यामागे टिंगल करण्याचाच उद्देश लक्षात येईल. मात्र अनिलने ह्याव 'कमराद' हा शब्द कॉम्प्लीमेंट या अर्थाने स्वीकारला, 'कमराद' या शब्दालाही प्रतिष्ठा आणून दिली.

पणशीकराना ही कादबरीदेखील आवडली. त्यानी अनिलला या कादबरीचे नाट्यरुपातर करण्याचा आग्रह केला. पण अनिलच्या डोक्यात दुसरीच गोष्ट चालू होती. 'हमीदाबाईची कोठी'

मुमताज एका वेश्येची मुलगी. आईने, आपल वेश्येचं वाईट आयुष्य मुलीला भोगायला लागू नये म्हणून तिला लहानपणापासून शाळेत होस्टेलवर ठेवले. मुमताज S. S. C. झाली. मध्यमवर्गीय संस्कार घेऊन बाहेर पडली. चारचौघीसारखी सामान्य मुलगी. आईच्या घरात तिचा प्रचंड मानसिक कोंडमारा व्हायचा. रूप, बुद्धिमत्ता, अथवा पैसा यातल तिच्याकडे काहीच नसल्याने बाहेरच्या जगात स्वतंत्र स्थान मिळवणे तिला शक्य नव्हते. आईवरील प्रेमामुळें, आईला सोडून वेगळी रहायची तिची इच्छा नव्हती. आयुष्यभर वेश्याव्यवसाय केलेली आई. ती तरी वेगळ काय करू शकणार होती ? मुमताजवर झालेले संस्कार तिच्या आयुष्यावरच विळेसारखे येउन कोसळले ती एकच गोष्ट करू शकत होती. ती म्हणजे खोलीच्या कोपऱ्यात बसून काही तरी वाचत रहायच. वाचतावाचता अनिलचे 'रणांगण'ही वाचले, ग्लाड वाचली आणि तिला मनोमन पटलं हा माणूस आपल्यासाठी काही करू शकेल. ती अनिलला भेटली. तिची कहाणी ऐकून अनिल हादरलाच. अनिलने सहानुभूतीने तिच्यासाठी जे करता येणे शक्य होते ते केले. मुंबईत नोकरीसाठी प्रयत्न केले. ती मुंबईत आली की अनिलकडेच उतरत असे. प्रेरणाने देखील तिच्याशी दोस्ती करून तिला मानसिक आधार दिला. अनिल पुण्याला येई तेव्हा तिच्या वस्तीत तिच्या घरी जाउन तासन्तास गप्पा मारीत असे. शेजारच्या इतर जणी, वेश्याही त्यांच्या चर्चेत सामील होत असत ही सगळी मंडळी अनिलकडे अतिशय आदराने बघत. मुंबईचा फोरास रोडही अनिलने पालथा घातला आणि त्या सर्व अनुभवातून नाटक–निर्माण झाले– 'हमिदाबाईची कोठी' विजयाबाईंनी ते नाटक बसवलेही छान. पुण्यात नाटकाच्या पहिल्या प्रयोगाच्या वेळी पहिल्या रांगेत जे काही निमंत्रित उच्चभ्रू पाहुणे होते, त्यातच मुमताजही बसली होती. नाटक सर्वांनाच आवडलं पण मुमताजला मात्र ते पाहणदेखील सहन झाल नसावं. ती नाटक संपताच काहीही न बोलता त्वरीत निघून गेली. तिच्या नोकरीसाठी अनिलने प्रयत्न केले होते. पण ती पुढे मुंबईला आलीच नाही. आईला सोडून मुंबईला राहण तिला शक्यही नव्हतं. तिनं शिवणाचा क्लास करावा यासाठी अनिलने त्याच्या एका बँक अधिकारी मित्राला कर्ज मिळवून देण्यासाठी गळ घातली. पण हळूहळू तिच्या वागण्यातही मानसिक संतुलन ढळू लागले. अनिलने देऊ केलेला मदतीचा हातही स्वीकारण्यास ती असमर्थ होत चालली होती. मी पुणे आकाशवाणीत असताना बरेच दिवसानतर एक दिवस अचानक मुमताज आली. चेहऱ्यावरून ती फार डिस्टर्ब दिसत होती. अनिलचा नवीन पत्ता तिनं माझ्याकडे मागितला. ( दरम्यान अनिल जेकब सर्कलकडून दादरला रहायला गेलेला होता. ) ती पुढे आणखी काही बोलायला तयार नव्हती. तिला मोकळेपणी बोलता याव म्हणून मी शेजारच्या इराण्याच्या हॉटेलात तिला घेऊन गेलो. चहा मागवला, अनिलचा पत्ता दिला आणि तो आत्ता मुंबईत असेलच असही नाही, हेही सांगितलं. लिखाणाच्या निमित्तानं तो कुठही असू शकतो. मी सहानुभूतीन मदतीविषयी विचारल, पण ती मुलगी काहीही बोलण्याच्या किंवा ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हती. अनिच्छेनेच चहा गिळला आणि लगेच निघून गेली.

काही दिवसांनी अनिलकडून मला कळले तिची आई वेडसर झाली आहे. तिला बरी करण्यासाठी मंत्रतंत्र, तर कुठे मारहाण अशा त्याच्या उपचारपद्धती चालू आहेत. त्या लोकाना मनोरुग्णांवरील उपचार पद्धती काय आहे, हेही माहीत नाही. मनोविकृतीशास्त्राला देखील अशा रुग्णाची निश्चित कारण आणि उपचार पद्धती माहित नाही. सगळेच आंधळें...

काही दिवसानी अनिल तिच्याकडे गेला असताना त्याच्या लक्षात आलं की, मुमताजची आई ठार वेडी झालेली आहे आणि मुमताजचे मानसिक आरोग्य नीट नाही. आता या घटनेलाही बरीच वर्षे होऊन गेली.

मुमताजला सामान्य जीवन जगायला मिळावं म्हणून अनिलने बरेच प्रयत्न केले. पण आजच्या समाजरचनेत ते पुरेसे नव्हते. जंगलातली वेल बगिच्यात लावायचा प्रयत्न तिच्या आईनं केला. त्याला कोण काय करणार ?

कधी कधी वाटत की तिला शहाणी बनवण्यासाठी तिच्या आईने होस्टेलला न ठेवता आपल्या कोठीतच वाढवल असतं तर तिला वेश्यांचा समाज आपला वाटला असता. त्या समाजाची संस्कृती तिनं स्वीकारली असती. स्वतःचा 'भाव' ठरवला असता आणि 'धंदा'ही केला असता. त्याच समाजात शहाण्यासारखी जगली असती. बाकी तिच्या आईच चुकलच ! त्या समाजात हे कधी तरी घडणारच होतं. कारण मुमताज वेश्या झाली असती तरी उद्या तिनही आपल्या मुलीला शाळेत घातलं असत. मध्यमवर्गीय संस्कार दिले असते. मुमताजचं जे आज झालं, तेच उद्या तिच्या मुलीच झालं असतं. इथं दुःख एवढ्यासाठी करायच की सुधारणा करणाराला फक्त बळी जावं लागत, मात्र समाज सुधारण्याची कोणतीही लक्षणे न दाखवता !

पण या घटनेवरच अनिलने लिहिलेले नाटक मात्र फारच छान वठलेय ! तो नाटक लिहिताना खूप विचार करून, आत्मियतेने लिहीत असे. हे नाटकही तसेच जन्माला आले. यातलं 'सत्तार' हे कॅरेक्टर मात्र अनिलला अगदी मनापासून आवडलेलं. आपल्या बऱ्याचशा भाषणातून किंवा चर्चेतून तो सत्तारची वाक्ये म्हणून दाखवायचा. 'नाना पाटेकर'नं ही भूमिका विलक्षण ताकदीने उभी केली होती. तरी पण अनिलचे पूर्ण समाधान झाल्यासारखे वाटले नाही.

त्याची 'ग्लाड' आणि 'कोठी' ही दोन्ही नाटकं गाजली, चालली– अनिलला पैसा आणि प्रसिद्धी ही देउन गेली. समाजातील 'एस्टॅब्लिश्ड' मंडळीमध्ये अनिलची वर्णी लागली.

मी एकदा अनिलला म्हटल– 'नागभूषण पटनाईक'– जे जगला ते तू लिहिलस, मुमताजला जे आयुष्य वाट्यास आलं ते तू लिहिलंस. तर तुझ्या या लिखाणावर हक्क कुणाचा ? त्याचा की तुझा ? अनिलने लगेच उत्तर दिलं– 'माझा'. –

आता अनिलचं उत्तर चूक होत, असं मला वाटत नाही. परंतु त्याने क्षणाचाही विलंब न लावता पटकन् उत्तर दिलं, तिथं मला वाटत त्याच काही तरी चुकतंय– हे त्याच्या व्यक्तिमत्वात झालेल्या बदलाचं द्योतक आहे. त्याच्या हळूवार भावनाशील स्वभावाचं रुपांतर व्यावसायिक, व्यवहारी स्वभावात झालेलं होतं. त्याच्या स्वभावातील ट्रान्सफॉर्मेशन अधिक वेगानं झाल. हा वेग त्याच्या

मूलभूत प्रकृतीला शोभणारा नव्हता.

अनिलला नाटककार म्हणून मान्यता मिळाली होती. 'रणांगण' कधीच बंद पडले. त्याचे कर्ज अनिलच्या डोक्यावर होतेच. पण त्याचा विचार त्याने कधी फारसा केला नाही. रणांगण जरी नव्हते तरी त्याचा पोलिटिकल इंटरेस्ट कमी झालेला नव्हता. ७७ साली इमर्जेन्सी विरुद्ध त्याने 'जनता'च्या बाजूने लिखाण व प्रचार केला होता. जनता सरकार स्थापन झालेले होते. मंत्रिमंडळातील चारजण त्याच्या खास मैत्रीतलेही होते. पण एकूणच तो सरकारवर वैतागलेला असायचा. अनिल तसा तोपर्यंत संघविरोधी होता. पण त्या काळी 'दुहेरी निष्ठा' यावरून मधु लिमये, जॉर्ज वगैरेंनी बराच आरडाओरडा सुरू केला होता. अनिल नेहमी म्हणायचा की हे समाजवादी किंवा जनता सरकार टिकणारे नाही. कॉंग्रेसविरुद्ध खरा टिकाव धरू शकतील ते कम्युनिस्ट आणि संघवाले. त्याकाळी इंदिरा गांधीविरुद्ध शहा कमिशन हा तमाशा चालू होता. बाळासाहेब देवरसांनी एकदा म्हटलं होतं, 'Forget and forgive her.' या देवरसांच्या उक्तीवर अनिल बेहद्द खूश होता. हळूहळू त्याने वाजपेयींना शिव्या देणं सोडले होतं.– हे सर्व तो वैयक्तिक गप्पातून सर्वांशी बोलायचा. पण राजकीय लिखाण मात्र जवळजवळ बंद झालं होतं.

१९७९ ची चिकमंगळूरच्या प्रसिद्ध निवडणुकीची वेळ आली.

(अपूर्ण)

## वर्ल्ड बुक डिस्ट्रिब्युटर्स : नवा उपक्रम

पुण्यात सदाशिव, नारायण, शुक्रवार पेठ या भागात चांगले प्रशस्त पुस्तकाचे दुकान नव्हते. विद्येच्या माहेरघरात ही गोष्ट मनाला खटकत होती. ही उणीव भरून काढावी व ह्या भागातील वाचक, लेखक, प्रकाशक, शिक्षक, विद्यार्थी व इतर ग्रंथप्रेमी मंडळींची सोय व्हावी म्हणून पुण्याच्या प्रसिद्ध पॉप्युलर बुक हाऊसने एक नवीन पुस्तक दालन वर्ल्ड बुक डिस्ट्रिब्युटर्स अॅन्ड होलसेलर्स हे नुकतेच सुरू केले आहे. हे सदाशिव पेठेत, चिमण्या गणपती जवळ, डॉ गाडगीळांच्या बंगल्यात आहे. ह्या प्रशस्त जागेत शांतपणे रमतगमत पुस्तके पाहून खरेदी करता येतील. हे ह्याचे मुख्य वैशिष्ट्य आहे.

येथे अनेक इंग्रजी मराठी कथा कादंबऱ्या विक्रीकरता आहेत. सर्व लोकप्रिय लेखकांची पुस्तके येथे मिळतील.

जगप्रसिद्ध पेनग्विन, पेलिकन ह्यांची सर्व पुस्तके येथे आहेत. तसेच रीडर्स डायजेस्ट ह्या प्रकाशनाची काही मनोरंजक पुस्तके, अनेक प्रकारच्या डिक्शनरीज (शब्दकोश), प्रसिद्ध ऑक्सफोर्ड, कॉलीन्स, केंब्रीज, चेंबर्स इ. कंपन्यांच्या जवळजवळ १५/२० प्रकारच्या डिक्शनरीज येथे आहेत.

उपयोगी, उद्बोधक असे (ज्ञानकोश) एन्सायक्लोपिडियाज येथे आहेत. ह्यात प्राणी, जग, निसर्ग, शास्त्र, तंत्रशास्त्र इ. विषयावर ज्ञानकोश आहेत. १ खंडापासून ३५ भागाच्या खंडापर्यंत ह्यांचे प्रकार आहेत. जगप्रसिद्ध सचित्र, माहितीपूर्ण असा एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिकाचे– ३० खंड विक्रीसाठी आहेत.

हल्लीचे युग हे कॉम्प्युटर युग आहे. ह्या दुकानात ठेवलेली कॉम्प्युटर विषयाची अनेक पुस्तके आपल्याला ह्या युगात घेऊन जातात. ह्या विषयाची सुमारे ५०० पुस्तके येथे आहेत.

इंजिनियरिंग, पॉलिटेक्निक, एम. बी. ए. ह्या विद्यार्थ्यांना लागणारी अनेक देशी व विदेशी पाठ्यपुस्तके येथे विकत मिळतील.

विश्वविख्यात 'नॅशनल जिऑग्रॅफिक' ह्या कंपनीची अनेक पुस्तके येथे आहेत. ह्यात प्रसिद्ध वर्ल्ड अॅटलास, आपली सृष्टी, आपले जग, निसर्ग, सस्तन प्राणी वगैरेवर उद्बोधक पुस्तके आहेत.

तसेच भारतात प्रथमच आलेली ह्याच कंपनीची ऑडीओ–व्हिज्युअल स्टडी किट्स येथे मिळतील ह्यात एकूण २६ विषयांवर विविध संच आहेत प्रत्येक संचात ५ कलर फिल्मरोल्स, ५ बॅगप्लेइंग रेकॉर्ड्स व २ छोट्या पुस्तकांचा समावेश असतो. ह्या संचाची किंमत प्रत्येकी रु. २००/– आहे.

छोट्या बाल मित्रांसाठी येथे अनेक पुस्तके आहेतच.

शिवाय लहान मुलांना गोष्टी वाचता वाचता गोष्ट प्रत्यक्ष ऐकता यावी म्हणून कॅसेट पुस्तके आहेत. ह्यात १ कॅसेट व १ पुस्तक येते गोष्ट म्युझिकसकट कॅसेटवर सांगितलेली असते. ह्यात वॉल्टडिस्ने, लेडीबर्ड, गाणी वगैरेचा समावेश आहे.

ज्यांना विदेशी भाषा आत्मसात करायची आहे त्यांच्यासाठी 'कॅसेट बुक्स' आहेत. त्यात फ्रेंच, जर्मन, चायनीज, जपानी, इंग्रजी ह्या भाषांकरता संच आहेत. ह्यात कॅसेट्स व पुस्तकाचा समावेश असतो.

फर्निचर कॅटलॉग, घरदुरुस्ती, बागकाम, बॉनसाई हस्तकला, ड्रॉइंग पेंटिंग, जाहिरात व्यवसाय ह्या विषयाची नवीन पुस्तके आहेत.

महिलांकरता पाककला, फॅशन्स ह्या विषयावर अनेक पुस्तके आहेत ह्यात रुचिरा, अन्नपूर्णा, सौ. तरल दलाल ह्यांची इंग्रजी पुस्तके महत्त्वपूर्ण आहेत. फॅशन्समध्ये अनेक कपड्यांचे प्रकार, डिझाईन्स दिली आहेत.

भारतात प्रथमच आलेले पृथ्वीगोल येथे आहेत. हे इटली डेन्मार्कमध्ये बनवले असून फायबर ग्लासाचे आहेत. सुंदर रंग व आतून लाईटची सोय असे हे पृथ्वीगोल आहेत.

पुण्यात हल्ली दिवे जाण्याचे प्रकार फारच वाढलेले आहेत. ह्यावर तोडगा म्हणून 'लाईट हाऊस' विक्रीला आहेत. अतिशय आकर्षक असा हा दिवा ४ बॅटरीजवर चालतो.

पुस्तकाला लावून पुस्तक वाचण्याकरता लहान दिवा देखील येथे विक्रीला आहे. तो बॅटरीज व वीज दोन्हीवर चालतो. किंमत रु. १००/–

येथे जगातील अनेक प्रसिद्ध मासिकांकरता वर्गण्या स्वीकारल्या जातात. टाईम, न्युजविक नॅशनल जिऑग्रॅफिक वाईट (कॉम्प्युटरवर इतर मासिके) सायंटिफिक अमेरिका, वुमन अॅन्ड होम, इंडिया टुडे, मनी, संडे, रिडर्स डायजेस्ट ही त्यातील प्रमुख होत. त्यातील टाईम, न्युजविक ही साप्ताहिके घरपोच पोहचविण्याची सोय आहे.

पुणे, महाराष्ट्रातील पुस्तक विक्रेते, प्रकाशक ह्यांना येथे मुंबईच्या भावातच होलसेल दरात पुस्तके मिळतील अशी व्यवस्था आहे. ह्या दुकानाची वेळ सकाळी ९ ते रात्री ८ अशी आहे. रविवारी दुकान बंद राहील. □

# तिसरे समाजाभिमुख दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन

तिसरे दक्षिण महाराष्ट्र साहित्य समेलन २३ व २४ नोव्हेंबर या काळात कोल्हापूर जिल्ह्यातील जयसिंगपूर येथे सुप्रसिद्ध भारतीय गीतकार मा. पी. सावळाराम यांच्या अध्यक्षतेखाली अणुव्रत नगराच्या अलिशान शामियान्यात संपन्न झाले. पहिले द. म. साहित्य समेलन कै. ग. ल. ठोकळ याच्या अध्यक्षतेखाली कोल्हापूरला आणि दुसरे रणजित देसाई याच्या अध्यक्षतेखाली इस्लामपूरला संपन्न झाले होते. पहिल्या व दुसऱ्या समेलनाप्रमाणेच जयसिंगपूरच्या तिसऱ्या संमेलनाने चांगलीच रगत आणली. अप्रतिम जीवन साधना केंद्र, जयसिंगपूर तर्फेच्या या समेलनात नामवतांची उपस्थिती उत्कृष्ट संयोजन व रसिक प्रेक्षकांचा उदड उत्साह यामुळे आनदाला उधाण आले होते.

साहित्य समेलनाची सुरुवात कु. प्रतिभा बुलबुले याच्या स्वागतगीताने होऊन सुप्रसिद्ध साहित्यिक गं. बा. सरदार यांनी समेलनाचे उद्‌घाटन केले व पी सावळाराम यांनी आत्मनिवेदनात्मक भाषण केले 'काव्याच्या माध्यमापेक्षा गीताच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांपर्यंत मला जाता आले लोकांच्या प्रेमाने मी लिहिता झालो, पैशासाठी, प्रसिद्धीसाठी मी बाजारू शब्दाचा वापर मात्र कधी केला नाही. सरळ आणि भावस्पर्शी भक्तीगीते, भावगीते व लावण्या मी केल्या. द्वर्थी शब्दरचना करून मी सवंग लोकप्रियता मिळविण्याचा प्रयत्न कधीही केला नाही, पैशासाठी लाचार झालो नाही, त्यामुळे मी सात्विक आणि आनदी जीवन जगतो आहे' असे ते म्हणाले.

समिक्षकाचा समाचार घेत पी. सावळाराम म्हणाले, साहित्यिक हा नवोदित असला तरी त्याचा समाजाने आदर केला पाहिजे. योग्य साहित्यिकावर समाज फुलाचा वर्षाव करील. यात शंका नाही पण सध्याच्या युगात भ्रष्टाचारी, वशिलेबाजी, या सर्वांना तोंड द्यावे लागते. ती परपरा लवकरात-लवकर नष्ट झाली पाहिजे.

यावेळी स्वागताध्यक्ष दे. भ. रत्नाप्पाण्णा कुंभार यांनी साहित्य व समाजाचा सबंध साधण्याचा' मनोदय व्यक्तवला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु के. भोगीशयन यानी मराठीतून भाषण करून प्रेक्षकांना जिंकले. त्यानतर उद्‌घाटक प्रा. गं. बा. सरदार प्रबोधनात्मक भाषणात म्हणाले— 'समाजातील राजकीय, आर्थिक मक्तेदारी संपुष्टात आणण्यासाठी आवश्यक असणारी साहित्य निर्मिती करणे ही आजची खरी गरज आहे, समाजातील राजकीय व आर्थिक मक्तेदारी अद्याप सपलेली नाही, त्यासाठी जरूर ते प्रयत्न होणे आवश्यक आहे.

'नवोदितांचा विकास होऊ लागतो तेव्हा प्रस्थापित त्याना विरोध करतात, मग टीका होते, पण त्याला नवोदित साहित्यिकांनी जुमानता कामा नये, सर्व क्षेत्रात मराठीचा वापर झाला पाहिजे, मराठी भाषा अधिकाधिक समृद्ध झाली पाहिजे, नवा समाज आज बोलू लागला आहे, समिक्षकांना त्यात हवी तशी गुणवत्ता मिळणार नाही, पण गुणवत्ता म्हणजे नेमके काय ? तेही ठरविणे आवश्यक आहे केशवसुतापासून मर्ढेकरापर्यंत होणारा विरोध वेगळ्या स्वरूपाचा होता व आजच्या नवोदित साहित्यिकाना होणारा विरोध वेगळ्या प्रकारचा आहे, जे पिढ्यान्‌पिढ्या दबलेत ते उच्च आवाजात बोलणारच, त्याबद्दल ओरड करून चालणार नाही.'

'विभागवार' साहित्य समेलनानेच साहित्य चळवळ लोकाभिमुख बनते आहे साहित्याचे लोण सर्व थरात पोहचविण्यास सुरुवात झाला आहे. अशावेळी साहित्यिकानी लोकांना साहित्याचा आस्वाद घेण्याची शिस्त लावली पाहिजे' असही ते म्हणाले.

यावेळी यशवंतराव चव्हाण ग्रथ पारितोषिके दिली गेली.

उद्‌घाटनानतर 'वृत्तपत्रे आणि सामाजिक बाधिलकी' या विषयावर शकर सारडाच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद झाला. त्यात प्रा. वैजनाथ महाजन, विद्या बाळ, प्राचार्य आर. टी. अवकोळे, प्रा डी यू पवार, प्रा. प्रल्हाद वडेर, डॉ. भालबा विभुते, व कमलाकर कर्णिक यानी भाग घेऊन अतिशय चागली उद्‌बोधक चर्चा घडविली.

दुपारी रा. र. बोराडे याच्या अध्यक्षतेखाली कथाकथनाचा कार्यक्रम बहारदार झाला. वामन होवाळ, रा. रं. बोराडे याच्या कथा विशेष रंगल्या. शकर खंडू पाटील, अनुराधा गुरव, मोहन पाटील, विश्वास पाटील याच्याही कथा रसिकाना आवडल्या. कवी समेलनाचा कार्यक्रम नारायण सुर्वेच्या अध्यक्षतेखाली रात्री अडीचपर्यंत चालला शेकडोनी आपली हजेरी लावली, ज्येष्ठ कवी वि. दा. करंदीकर, सुधांशु, केशव मेश्राम, फ. मु. शिंदे, राम गोसावी, लक्ष्मीकात तावोळी आदीच्या काव्य-वाचनाने रसिकाच्या उत्साहाला उधाण आले होते.

रविवारी 'स्त्रियांच्या वास्तव समस्या आणि मराठी साहित्य' हा वेधक परिसवाद विद्या बाळ याच्या अध्यक्षतेखाली लक्षणीय झाला, प्रा. रविकिरण बुलबुले डॉ. तारा भवाळकर, प्रा. डी. यू. पवार, शैलजा शितोळे, प्रा. बाबुराव गुरव व प्रा. मुमताज रहिमतपुरे यांचा सहभाग होता.

दुपारी केशव मेश्राम याच्या अध्यक्षतेखाली अनुभव आणि आत्मकथनाचा कार्यक्रम होता. महादेव मोरे, प्रा. मधुकर वेदाते, डॉ आनद पाटील, पार्थ पोफळे, शरणकुमार लिंबाळे, अनत तिबीले व दादासाहेब मोरे यांनी हृदयस्पर्शी नि उपेक्षित समाजाचे दर्शन घडविले.

खुल्या अधिवेशनात द. म. साहित्य सभेचे अध्यक्ष कृ. गो. सूर्यवंशी यानीच सर्व ठराव एका दमात वाचून दाखविले. सूचक, अनुमोदक नसताना ते सर्व टाळयाच्या गजरात मजूर झाले. शासन यत्रणेत व शिवाजी विद्यापिठात मराठी भाषेची उपेक्षा व गळचेपी, नामातराला पाठिंबा, कृष्णवर्णीय कवी मोलाहसी याच्याविषयीचे ठराव होते प्रा. बुलबुले यानी प्रास्ताविक केल्यावर अक्षर पालखीचे प्रकाशन मा. पी. बी. पाटील (चेअरमन, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक) यांच्या हस्ते झाले.

साहित्य समेलनाची सागता प्रा फ. मु शिंदे याच्या 'बहिणाबाईचा मळा मराठवाड्याचा गळा' या बहारदार कार्यक्रमाने झाली तेव्हा तर प्रचड गर्दी झाली होती. बहिणाबाईच्या गावरान, भावस्पर्शी कवितांना सुरसाज साध्या वाद्यवृदाने दिला होता

जयसिंगपूरसारख्या छोट्याशा शहरात हे पहिलेच साहित्य समेलन इतिहास घडविणारे व प्रेक्षकानी चागला प्रतिसाद देवून यशस्वी केलेले आहे. प्रत्येक कार्यक्रमाला साहित्यिकाचा उत्साह वाढविणारी अशीच प्रेक्षकाची हजेरी होती. प्रा. राम कानगुडे, प्रा. रविकिरण बुलबुले, डॉ. एस. के. पाटील, प्रा. विकास काबळे, श्री. वसतराव भोसले व प्रमोद पाटोळे आदीनी या समेलनासाठी विशेष प्रयत्न केले. अनेकानी संमेलनाबद्दल प्रशसोद्‌गार काढले. त्यात श्री. नारायण सुर्वे म्हणाले, 'हे समेलन खऱ्या अर्थाने समाजाभिमुख झाले.' अशा यशस्वीतेनंतर अप्रतिम जीवन साधना केंद्राने अखिल भारतीय साहित्य संमेलन पार पाडण्याची उमेद आकांक्षा ठेवली आहे.

—प्रा. राम कानगुडे

पुस्तके

# इस्रायलचा विधाता– डॉ. वाइझमन यांच्या कार्याचा आढावा

दोन हजार वर्षांपूर्वी पॅलेस्टाइनमधून परागंदा व्हावे लागलेल्या व देशोधडीस लागलेल्या ज्यू लोकांनी दोन हजार वर्षांनंतर निरनिराळ्या देशांमधून व निरनिराळ्या खंडांमधून येऊन आपल्या पूर्वजांच्या पुण्य भूमीमध्ये–पॅलेस्टाइनमध्ये आपले राष्ट्र–इस्रायल–निर्माण करणे हे आधुनिक काळातील एक आश्चर्यच आहे.

अर्थात इस्रायलच्या या निर्मितीला एक पार्श्वभूमी आहे, एक अथक प्रश्नांची परंपरा आहे. देशोधडीस लागलेल्या ज्यू लोकांना भारत आणि काही प्रमाणात अमेरिका यासारखे काही सन्माननीय अपवाद वगळल्यास जगाच्या पाठीवर कुठल्याही देशात चांगली वागणूक मिळाली नाही. काही देशांमध्ये तर त्यांचा उघड उघड छळ झाला. त्यामुळे व आपला धर्म, भाषा व संस्कृती यांचा सार्थ अभिमान असल्यामुळे देशोधडीस लागलेल्या ज्यू लोकांनी आपला धर्म, परंपरा व काही प्रमाणात भाषा सोडली नव्हती. आपल्या पूर्वजांच्या मायभूमीमध्ये आपण केव्हा तरी एकदा परत जाऊ ही भावना ज्यू लोकांमध्ये टिकून राहिली. आधुनिक राज्यांच्या निर्मितीनंतर ( सतरावे शतक ) हा प्रश्न अधिक स्पष्ट व गंभीर अशा स्वरूपात उभा राहिला. आपले स्वतःचे राष्ट्र असणे ज्यूंना आता आवश्यक वाटू लागले आणि असे राष्ट्र निर्माण करण्यासाठी त्यांना एकच प्रदेश दिसू लागला. तो प्रदेश म्हणजे दोन हजार वर्षांपूर्वी त्यांच्या पूर्वजांची ज्या ठिकाणाहून हकालपट्टी झाली होती तो पॅलेस्टाइनचा प्रदेश. मागच्या शतकाच्या शेवटच्या वर्षामध्ये त्या दृष्टीने काही ठोस विचार झाला आणि या शतकाच्या उत्तरार्धावर ( १९४८ ) त्यांनी पॅलेस्टाइनमध्ये इस्रायल या नावाने आपले राष्ट्र निर्माण केले.

हे शक्य होण्यास वरील अनेक घटनांबरोबरच ज्या दोन पुरुषांना इस्रायलच्या निर्मितीचे श्रेय आहे त्यातील एक म्हणजे १८९६ साली The Jewish State (ज्यूंचे राज्य) हे पुस्तक लिहिणारे थिओडार हर्झल. हे पुस्तक लिहून हर्झल यांनी ज्यूंच्या राज्यनिर्मितीचा विचार पक्का केला आणि दुसरे पुरुष म्हणजे प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. हाइम वाइझमंन–हर्झल यांनी सिद्धांत दिला. वाइझमन यांनी तो कार्यान्वित केला. हर्झल यांनी स्वप्न पाहिले, वाइझमन यांनी ते प्रत्यक्षात उतरवले आणि त्या दृष्टीने विचार करता वाइझमन हे इस्रायलचे विधाताच आहेत. **इस्रायलचा विधाता** हे डॉ. प्र. ग. बापट यांचे सदरहू पुस्तक म्हणजे डॉ. वाइझमन यांच्या या संदर्भातील कार्याचा आढावाच आहे.

हाईम वाइझमन यांचा जन्म पश्चिम रशियातला. आई–वडील खाऊन–पिऊन सुखी, पण कनिष्ठ मध्यम वर्गात मोडणारे. बालवयात आजोबांकडून त्यांना इस्रायलच्या गतवैभवाची व महान व्यक्तींची ओळख झाली. झारशाहीमध्ये ज्यू लोकांवर असलेली बंधने व वाइझमन यांच्या मनात झारशाहीविषयी असलेला द्वेष यामुळे आर्थिक परिस्थिती तेवढीशी समाधानकारक नसतानाही वयाच्या अठराव्या वर्षी उच्च शिक्षणासाठी पश्चिम युरोपला जायचे त्यांनी ठरविले व ते जर्मनीत आले. १८९८ साली त्यांनी जर्मनी सोडले व पुढील शिक्षणासाठी स्वित्झर्लंडला गेले प्रथम फ्राय बुर्ग व नंतर रसायन शास्त्राच्या खास शिक्षणासाठी त्यांनी जिनेव्हा निवडले. जिनेव्हा येथे ते १९०४ पर्यंत राहिले.

विद्यार्थी दशेच्या काळात शास्त्रीय ज्ञानाची उपासना करतेवेळी ते ज्यू लोकांनी स्वतःच्या राज्याच्या निर्मितीसाठी चालवलेल्या पण अजूनही विचाराच्या पातळीवर असलेल्या झिओनिस्ट चळवळीकडे आकर्षित झाले. जर्मनीमध्ये शिकतेवेळी त्यांच्या ध्यानात आले की रशियातील ज्यूंपेक्षा पश्चिम युरोपमधील ज्यू लोकांची स्थिती वेगळी होती. तिथे ज्यूंवर शासकीय बंधने नव्हती व तेथील ज्यू तेथील वातावरणाशी एकरूप होण्यास उत्सुक होते. ज्यूंचे स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याचे स्वप्न त्यांना फारसे आकर्षित करीत नव्हते. ज्यूंचा यहुदी हा धर्म होता पण जर्मनी हे त्यांचे राष्ट्र होते. पण ही स्थिती रशियात नव्हती. वाइझमन हे ' रशियन ' नव्हते तर ते ' रशियन ज्यू ' होते. रशियन समाज प्रवाहापासून ते अलग होते. त्यामुळे ज्यू राष्ट्रवादाची निकड त्यांना जास्त होती.

पण हे ज्यू राष्ट्र कुठेही उभे करण्यास त्यांची तयारी नव्हती. पुनर्वसनासाठी रशियन ज्यूंना पॅलेस्टाइनच हवे होते. ज्यू राष्ट्राची अमूर्त कल्पना पॅलेस्टाइनची भूमी व हिब्रू भाषा याशिवाय मूर्त होणे त्यांना अशक्य वाटत होते. म्हणूनच ज्यावेळी १९०४–५ ला आफ्रिकेतील युगांडामध्ये (ब्रिटिश साम्राज्याचा भाग) ज्यूंचे राष्ट्र निर्माण करण्याची योजना ब्रिटनच्या संमतीने पुढे आली, तेव्हा त्याला विरोध करणाऱ्यांमध्ये वाइझमन प्रमुख होते.

याच काळात डॉ. वाइझमन यांनी वंशभेदाचा त्रास नसलेला व स्वकर्तृत्वाने योग्य स्थान मिळण्यास संधी देणारा देश म्हणून इंग्लंडची निवड केली. १९०४ साली ते इंग्लंडला मँचेस्टर येथे आले व तेथील विद्यापीठात रसायन शास्त्राचे प्रयोग करणे व शिकविणे यात मग्न झाले. याच काळात १९०६ साली त्यांचा विवाह झाला.

१९०७ ते १९१४ हा काळ पॅलेस्टाईनमधील ज्यूंना वसाहती करण्याचा यशस्वी काळ. या कामामध्ये डॉ. वाइझमन यांचा सिंहाचा वाटा होता. या काळामध्ये त्यांनी पॅलेस्टाइनमध्ये सांस्कृतिक व शैक्षणिक मूल्ये जोपासणाऱ्या संस्थांची उभारणी केली. हिब्रू विद्यापीठाची स्थापनाही त्यापैकी एक

जग पहिल्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर होते. महायुद्धामध्ये डॉ. वाइझमन यांनी

रसायनशास्त्रातील आपल्या ज्ञानाचा उपयोग इंग्लंडसाठी संशोधन कार्य करण्यात केला व त्याचबरोबर ज्यूंच्या राज्य निर्मितीसाठी प्रयत्न चालू ठेवले. पॅलेस्टाइनमध्ये ज्यू लोकांचे राज्यनिर्मिण्यासाठी मदत करण्याचे ब्रिटिश सरकारचे लिखित आश्वासन याच काळात ज्यू संघटना मिळवू शकली. बाल्फोर जाहीरनामा म्हणून ते इतिहासात आता प्रसिद्ध आहे. डॉ. बापट यांनी बाल्फोर जाहीरनाम्याची पार्श्वभूमी पुरेशा विस्ताराने दिली आहे.

युद्ध संपल्यानंतर नव्याने निर्माण झालेल्या राष्ट्रसंघाची बाल्फोर जाहीरनाम्यास मान्यता मिळाली. राष्ट्रसंघाने पॅलेस्टाइनचा कारभार पाहण्याची जबाबदारी इंग्लंडवर सोपवली. दोन महायुद्धामधला काळ हा ज्यू राज्य-निर्मितीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरला. पॅलेस्टाइनच्या पुनर्निर्मितीसाठी लागणारी प्रचंड आर्थिक मदत, पॅलेस्टाइचा कारभार पाहणाऱ्या ब्रिटिश सत्तेशी ज्यूंच्या वसाहतीच्या संदर्भात येणारे संघर्ष, झिओनिस्टामधील अंतर्गत संघर्ष, अरब-ज्यू संघर्ष या सर्वामधील वाइझमन यांची भूमिका, विचार व कार्य यांचा आढावा डॉ. बापट यांनी पुढील भागात ( भाग चौथा ) घेतला आहे.

दुसरे महायुद्ध घोषित झाले होते. युद्धपूर्व कालातील पॅलेस्टाइन बाबतचे ब्रिटिश सरकारचे धोरण जरी ज्यू संघटनेला सहानुभूतीकारक नव्हते तरी हिटलरचा विजय म्हणजे ज्यू जमातीचा सर्वनाश याची जाणीव असल्यामुळे झिओनिस्टांनी इंग्लंडला संपूर्ण सहकार्याचे धोरण जाहीर केले. त्यानी युद्धात ब्रिटनला मदत करण्यासाठी ज्यू पटलणीची स्थापना केली. ( इस्रायलच्या स्थापनेच्या वेळी या अनुभवाची फार मदत झाली ) आणि त्याचबरोबर ज्यू राष्ट्र-निर्मितीसाठी केवळ इंग्लंडवर अवलंबून न राहता, सहानुभूती असणाऱ्या इतर राष्ट्रांच्या मैत्रीची गरज वाइझमन यांच्या दूरदृष्टीने हेरली. या दृष्टीने अमेरिका हे महत्त्वाचे राष्ट्र म्हणून ते तिकडे वळले.

दुसरे महायुद्ध संपले. पण ज्य राष्ट्र-निर्मितीचा प्रश्न काही सुटला नाही. त्यामुळे निर्माण झालेल्या निराश व वैफल्यग्रस्त वातावरणात महायुद्धोत्तर पहिली झिओनिस्ट कांग्रेस भरली. या कांग्रेसमध्ये 'मवाळ वाइझमन यांच्या हातून चळवळ आता जहाल गटाकडे गेली. १९४७ साली वाइझमन पॅलेस्टाईनमध्ये आपल्या आवडत्या संशोधन कार्यात पुन: मग्न झाले. पण त्यांनी राजकारण संन्यास घेतला होता असे नव्हे कारण त्यापूर्वी सतत चाळीस-पंचेचाळीस वर्षे ज्यूंच्या राजकारणाचा केंद्र बिंदू वाइझमन होते. जगातले मुत्सद्दी त्यांनाच ओळखत होते. त्यामुळे वेगवेगळी त्यांची मदत मागितली जात होती व ते ती मदत देत होते. पुढे इंग्लंडने हा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघात नेल्यावर जी कठीण परिस्थिती निर्माण झाली होती त्यातून ज्यूंना अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी वाइझमन यांनाच इंग्लंड-अमेरिकेच्या वाऱ्या कराव्या लागल्या. संयुक्त राष्ट्रसंघाने पॅलेस्टाइनच्या विभाजनाचा निर्णय घेतल्यावर व इंग्लंडने ते विभाजन पूर्ण करून न देताच सत्ता सोडल्यावर आजपर्यंत शस्त्रबलाच्या बाहेर्त त मवाळ असणाऱ्या वाइझमननी शस्त्रबलाच्या मार्गाचा जाहीर पुरस्कार केला. या अशा गोंधळाच्या परिस्थितीमध्ये पॅलेस्टाइनमधील ज्यू संघटनेने आपल्या राज्याच्या निर्मितीची घोषणा केली व वाइझमन यांची राष्ट्राध्यक्ष म्हणून निवड केली. त्यावेळी बोलताना इस्रायलचे पहिले पंतप्रधान बेनगुरियन म्हणाले होते— 'डॉ. वाइझमन यांना राष्ट्राध्यक्ष पदाची गरज नाही. परंतु राष्ट्राध्यक्ष ही इस्रायलची नैतिक गरज आहे.'

इस्रायलचा विधाता या आपल्या पुस्तकामध्ये डॉ. बापट यांनी उभे केलेले डॉ. वाइझमन हे असे आहेत. वाइझमन यांचे विचार, विद्वत्ता व कार्य डॉ. बापट यांनी पुरेशा समर्थपणे मांडले आहे. भाषा तशी ओघवती आहे आणि पुस्तक वाचकाची पकड घेते. या पुस्तकाची विभागणी डॉ बापट यांनी एकूण आठ भागात केली आहे ही विभागणी कालानुक्रमे केली आहे डॉ. वाइझमन यांचा जन्म १८७४ सालचा—तेथून सुरुवात करून १९५२ सालापर्यंत म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत सात विभागात डॉ. बापट यांनी वाइझमन यांच्या जीवनाचा आलेख रेखाटला आहे. खरं म्हणजे हे पुस्तक येथेच संपवायला पाहिजे होते. पण लेखकाने शेवटच्या आठव्या भागात शास्त्रज्ञ देशभक्त 'इस्रायल व भारत, ज्यूंचा राष्ट्रवाद व साम्यवाद, ज्यू राष्ट्रवादाच्या ऐतिहासिक प्रेरणा' समारोप व ताजा कलम असे भिन्न विषय एका भागात वीस पानात मांडले आहेत.

प्रस्तुत पुस्तकामध्ये इतर काही त्रुटी आढळतात. जाणकार वाचकाला या पुस्तकातून फारसे काही मिळणार नाही. आणि ते समजण्यासारखे आहे. पण सर्वसाधारण वाचकाला या पुस्तकाचा पूर्ण आस्वाद घेण्यासाठी व वाइझमन यांच्या कार्याचा व्यवस्थित परिचय होण्यासाठी या सर्व प्रश्नांची थोडी अधिक पूर्वपीठिका देणे आवश्यक होते. उदाहरणार्थ— पॅलेस्टाइनचा थोडा इतिहास भूगोल, अरबांची भूमी व भूमिका इत्यादींच्या मदतीने हा प्रश्न मांडणे आवश्यक होते. पुस्तकात बऱ्याच विशेषनामांचा—रोमन व देवनागरी अशा दोन्ही लिप्यांचा वापर झाल्यामुळे वाचनाची गती खुटल्यासारखी वाटते. उदा. डॅनीपर (Daniper) फी-वेल ( Feivel ) ( इंग्लीश स्पेलींग देण्याचा लेखकाचा उद्देश असेल तर पुस्तकाच्या शेवटी एखाद्या परिशिष्टामध्ये ते देणे अधिक योग्य झाले असते.) पुस्तकाचा आणखी एक दोष म्हणजे काही व्यक्ती व प्रसंग हे संदर्भ न देता अचानक येतात. त्यांचे महत्व व पूर्वपीठिका वाचकाला माहीत नसल्यामुळे वाचक गोंधळून जातो. उदा. जेरुसलेममध्ये ते डेविड एडर यांचेकडे राहिले. (८३) राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांचेप्रमाणे श्री. समरवेल्स यांना ज्यूंविषयी सहानुभूती होती. (१०२) हे पत्र हॅन्सर्ड ( Hansard ) मध्ये प्रसिद्ध झाले ( ९४ ) हे समरवेल्स कोण ? हॅन्सर्ड कुठून प्रसिद्ध होते. त्याचे महत्त्व काय ? पुस्तकात अरबांची बाजू समजून घेण्याचा प्रयत्न झालेला दिसत नाही. पॅलेस्टाइनमध्ये राज्य स्थापन करणे हा जणू ज्यूंचा जन्मसिद्ध हक्क आहे असे गृहित धरण्यात आले आहे. हिटलरच्या छळातून वाचलेल्या ज्यूंचा प्रश्न हा सबंध मानवजातीचा प्रश्न होता. त्याचे ओझे अरबांवर टाकणे आणि तेही केवळ पॅलेस्टाइनवर टाकणे ( कारण दोन हजार वर्षापूर्वी ज्यू तिथे रहात होते. ) हे कितपत न्याय्य आहे ? हे व इतर काही दोष टाळले गेले असते तर या पुस्तकाची उपयुक्तता अधिक वाढली असती.

आंतरराष्ट्रीय राजकारण हा विषय मराठीमध्ये तसा दुर्लक्षितच राहिला आहे.

या राजकारणाच्या मंचावर वावरणाऱ्या मुत्सद्यांचे चारित्र्य व कार्य हा विषय अधिकच दुर्लक्षित राहिला आहे आणि त्या दृष्टीने विचार करता अनेक संकटे, अडथळे व महासत्तांच्या स्पर्धेमधून ज्यू राष्ट्राची निर्मिती करणारा इस्रायलचा विधाता डॉ. हाईम वाइझमन याचे चरित्र व कार्य कथन करणारे डॉ. प्र. ग. बापट यांचे हे पुस्तक स्वागतार्ह आहे.

—अंकुश बा. सावंत
राज्यशास्त्र विभाग
मराठवाडा विद्यापीठ

इस्रायलचा विधाता
प्र. ग. बापट
साकेत प्रकाशन, औरंगाबाद
पाने : १४४, किंमत पस्तीस रुपये

## ओझं

चौदा लघुकथांचा हा छोटासा संग्रह. प्रत्येक कथा साधारण ४ ते ८ पानांची. खरं म्हणजे या कथांना लघुकथाच म्हणायला हवे. कथासंग्रहाला 'ओझं' हे नाव पहिल्या कथेवरूनच दिलं आहे ते योग्यच वाटते. येथे 'ओझं' याचा अर्थ 'मानसिक ताण.'

कथा मग त्या ग्रामीण भागातल्या असोत वा शहरी वातावरणातल्या असोत; काही कथा विनोदी धर्तीच्या तर काही कथा गंभीर प्रकृतीच्या असोत; त्या कथेतील नायक व नायिका एक प्रकारच्या ओझ्याखाली वावरत आहेत असे भासते. मग तो मानसिक ताण नियतीने घडवून आणलेला असो वा त्यांच्या विशिष्ट वागण्यामुळे असो वा परिस्थितीने घडवून आणलेला असो हे त्यात प्रामुख्याने आढळते. कोणत्याही वर्णनाचा फापटपसारा न करिता पात्रांच्या संवादाद्वारे त्यांचा स्वभाव व त्यांची परिस्थिती दृगोचर होते. सगळ्याच कथा वाचनीय आहेत. कंटाळा येत नाही. काही कथांचा शेवट अगोदरच जाणवतो तर काही कथांचा शेवट असा होईल हे ध्यानीही येत नाही. गंभीर कथांमध्ये एक प्रकर्षाने जाणवते ते हे की त्या त्या व्यक्तीच्या मनात कुठे तरी सल आहे आणि तो त्यांना सलतो आहे.

गंभीर आणि विनोदी कथा लिहिण्यात लेखिका यशस्वी झाली आहे असे म्हणायला हरकत नाही.

मनोगतात लेखिका म्हणते की हा तिचा पहिलाच कथासंग्रह आहे. पण या कथा कुठे व कधी पूर्वी मासिकांतून प्रसिद्ध झाल्या होत्या का याचा उल्लेख नाही. स्पर्धेकरिता पाठविल्या होत्या असे ती म्हणते. आणखीन अशा तऱ्हेच्या कथा लेखिका लिहू शकेल अशी उमेद वाटते. मग विषय तिने कोणताही निवडावा असे म्हणावेसे वाटते; कारण तसे सामर्थ्य तिच्याजवळ आहे.

महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ आणि प्रकाशक यांनी पाठिंबा देऊन या नवोदित लेखिकेचा कथासंग्रह प्रसिद्ध करून तिला प्रकाशात आणण्याचा प्रयत्न केला आहे हेही नसे थोडके.

—वसंत फाटक

ओझं
सौ. मेधा जोशी
सुपर्ण प्रकाशन, पुणे
पृ. : ८८, किंमत : १४ रु.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा
१९८४ मधील
शिवराम महादेव परांजपे
ग्रंथ पुरस्कार लाभलेलं पुस्तक

निर्माणपर्व

लेखक - श्री. ग. माजगावकर

• मूल्य चाळीस रुपये

राजहंस
प्रकाशन, पुणे

नावडकर

## रंगभूमी

# भोपाळच्या कलाकारांचे दोन नाटचप्रयोग 'घाशीराम' आणि 'महानिर्वाण'

**वि. भा. देशपांडे**

दिवाळीच्या आधीच्या आठवड्यात भोपाळच्या भारत भवनचे नाटच कलाकार पुण्यात आले होते. त्यांचा सध्या महाराष्ट्र गोवा असा दौरा चालू आहे. त्यामध्ये दोन दिवस त्यांनी 'घाशीराम कोतवाल' आणि 'महानिर्वाण' ही दोन नाटके हिंदीतून पेश केली.

ही दोन्ही नाटके मराठी नाटचप्रेक्षकांना पुरेशी परिचित आहेतच. त्यामुळे अनेकांना असे वाटले असणे शक्य आहे की ,या नाटकांचे प्रयोग केवळ हिंदी भाषेतून केले जातील. या कारणाने काहींनी तिकडे लक्ष दिले नसेल आणि काहींच्या मते यात विशेष काय असणार ? असाही भाव असेल; पण हे दोन्हीही अंदाज खोटे ठरले आणि हे दोन्ही प्रयोग वेगळाच अनुभव देऊन गेले.

हे प्रयोग केवळ वेगळे भाषारुप घेऊन आले असे नव्हे, तर प्रयोगामागची स्वतःची अन्वयदृष्टी आणि वेगळी कलात्म दिशा घेऊन आले. ते अशा अर्थाने की, या नाटकांचे आपण मराठीतून जे प्रयोग पाहिले आहेत त्यापेक्षा वेगळ्या ढंगाचे दर्शन आपण अनुभवीत आहोत असे सतत जाणवत होते. 'महानिर्वाण' नाटकात भाऊराव ही केन्द्रवर्ती व्यक्तिरेखा. आपल्या मरण्याचे–महानिर्वाणाचे आख्यान कीर्तनात या भाऊरावाने लावून मानवी स्वभावाचे जे दर्शन घडवले ते नाटचपूर्ण आहे. यामध्ये माणसांचे विविध नमुने आपण अनुभवतो. प्रस्तुत प्रयोगात हे सारे मानवी स्वभावाचे नमुने व्यंग्यात्म रीतीने पेश झाले. त्यामुळे या प्रयोगाला एक वेगळे परिमाण प्राप्त झाले. लेखनातील मूळचा उपरोध व्यंगात्म पातळीवर गेल्याने नाटचाशय अतिशय गडद झाला.मात्र मराठी प्रयोगात जे घडते ते येथेही घडले, ते म्हणजे पहिल्या आणि दुसऱ्या अंकातील परिणामात गुणवत्तेच्या दृष्टीने तफावत पडली. पहिला अंक जितका आणि जेवढा आपल्याला गुंतवून ठेवतो, हसता हसता अधिक अंतर्मुख करायला लावतो, ती तीव्रता, एकात्मता दुसऱ्या अंकाच्या परिणामात काहीशी सैल होते. अर्थात हे मूळ लेखनात असल्याने प्रयोगकर्त्याचा दोष मानता येणार नाही. नाटकाचा अन्वयार्थ आणि दिग्दर्शन याच्याच जोडीला भाऊराव तसेच अन्य कलाकारांचा अभिनय ही महत्वाची गोष्ट होती. दिग्दर्शक आणि भाऊराव दोन्हीही बी. व्ही. कारंथ हेच होते. कारंथ हे स्वतः संगीताचे जाणकार आहेत पण उत्तम गायक नाहीत. त्यामुळे त्यांचे गाणे मूळ व्यक्तिरेखेला आणि पर्यायाने प्रयोगाला पूरक ठरले. स्वतंत्रपणे असे ध्यानात राहिले नाही हे एका प्रकारे ठीकच झाले !

याच कारंथांनी 'घाशीराम कोतवाल' ही (हिंदीमध्ये 'घासीराम') दिग्दर्शित केलेले होते. तेही काहीशा वेगळ्या धाटणीने. त्यांनी मूळ सांगाड्याला कोठेही धक्का लावला नव्हता. घाशीरामची नृत्यशैलीतील किंवा तालबद्ध, लयबद्ध प्रयोगशैली तशीच राखली होती. वेगळेपण होते ते भूमिकांच्या अन्वयार्थात राखलेल्या समतोलात. घाशीरामचे आतापर्यंत मी ज्या काही नाटचसंघांचे प्रयोग पाहिलेले आहेत, त्यामध्ये नाना फडणवीस ही व्यक्तीरेखा मध्यवर्ती ठेवून प्रयोगाची बांधणी होत असे. त्यामुळे त्यातला नाना सर्वार्थाने अधिक लक्षवेधी आणि स्मरणीय होत असे. तुलनेने घाशीराम दुय्यम स्तरावर राहात असे; परंतु या भोपाळच्या प्रयोगात मात्र नाना आणि घाशीराम हे दोघेही समतोल होते. परिणामी प्रयोगप्रभावही समतोलीत राहिला. विशेषतः घाशीरामचे जे दुःख आहे ते उत्तम रीतीने पेश झाले. एक साधा कनोजी ब्राह्मण पुण्यात येऊन सर्वांच्या डोक्यावर बसून कोतवाल होतो हे जसे एका बाजूला आहे, तसेच त्या कोतवालीपायी आपण आपली लाडकी मुलगी ललितागौरी गमावून बसलो हे चित्रही तितक्याच ताकदीने, गडदपणाने व्यक्त झाले. नाना जसा विषयलंपट किंवा स्त्रीलंपट आहे तसाच तो कमालीचा धूर्त, बुद्धिचतुर आहे याचेही दर्शन यथायोग्यपणे घडले. वास्तविक नानाच्या भूमिकेसाठी जो कलाकार घेतला होता तो काहीसा स्थूलतेकडे झुकणारा, मध्यम उंचीचा होता. आपल्या डोळ्यासमोर एरवी नाना फडणवीस म्हणून कृश, उंच अशी रेखीव मूर्ती असते तसे इथे काही नव्हते; पण या कलाकाराने इतक्या सहजतेने अभिनय केला की नानाचे दिसणे प्रेक्षकाला विसरायला लावते. या ठिकाणी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मराठी माणसांचे मराठी इतिहासाशी, त्यातल्या व्यक्तींशी जे सर्वार्थाचे नाते आहे ,तसे मध्यप्रदेशी कलावंतांचे किंवा कन्नड प्रदेशातील कारंथ या दिग्दर्शकाचे असायचे काहीच कारण नव्हते. त्यामुळे ते या कलाकृतींचा विचार स्वतंत्रपणाने–मोकळेपणाने करू शकतात याचा प्रत्यय आला. त्याचबरोबर एखादा प्रतिभाशाली दिग्दर्शक किती वेगळ्या पद्धतीने, वेगळ्या शैलीने नाटच माध्यमातून व्यक्त होऊ शकतो, त्याचाही अनुभव दीर्घकाल स्मरणात राहील असा होता.

## बी. व्ही. कारंथांची तीन व्याख्याने

अखिल भारतीय नाट्य परिषद मुंबई यांच्या वतीने प्रतिवर्षी नाट्याचार्य खाडिलकर व्याख्यानमाला होत असते या वर्षी ही व्याख्यानमाला पुण्यामध्ये झाली. पुण्याच्या नाट्यशाखेने इथले सारे आयोजन केले होते. वक्ते होते बी. व्ही. कारंथ. नोव्हेंबर ७, ८, ९ या तीन दिवशी त्यांनी (१) व्यावसायिक रंगभूमी (२) रंगभूमीसंबंधातले संगीत (३) अभिनय ह्या विषयांवर विस्तारपूर्वक व्याख्याने हिंदीतून दिली. कारंथ हे मूळचे बंगलोरचे. उमेदवारीच्या काळात ते कर्नाटकातील 'वीरण्णा गुब्बी' या नाटक कंपनीत होते. तिथे नाट्यविषयक अनेक गोष्टींचा परिचय त्यांना झाला. पुढे हिंदी भाषेचे प्रचारक म्हणून त्यांनी बरीच वर्षे काम केले. अनेक परदेश वाऱ्या नाटकाच्या संदर्भात झाल्या. काही काळ दिल्लीतील 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'चे संचालक म्हणून काम केले. आता ते भोपाळच्या भारत भवनमध्ये नाटक विभागाचे संचालक आहेत. एक नट, दिग्दर्शक, संघटक, चित्रपट निर्माते, अशा अनेक भूमिकांतून ते वावरत असतात. (त्यांचा 'चोमनादुडी' हा कन्नड चित्रपट काहींना आठवत असेल.)

अशा या अनुभवसंपन्न कलाकाराने रंगभूमी माध्यमाचा किती खोलवर अभ्यास केला आहे याचा प्रत्यय त्यांच्या तिन्ही व्याख्यानांतून येत होता. त्यांनी आपल्या व्याख्यानातून अनेक मुद्दे मांडले. सर्वच मुद्द्यांशी आपण सहमत होऊ असे नाही, तसे अपेक्षितही नव्हते. पण त्यांनी मांडलेल्या काही मुद्द्यांचा विचार पुनः पुन्हा व्हायला हवा असे वाटले. विशेषतः व्यावसायिक रंगभूमीबद्दल बोलताना त्यांनी नागर आणि ग्रामीण विभागातील म्हणजेच नाटक आणि लोकनाटक करणाऱ्या लोकांचा विचार केला. त्यामध्ये हौशी-व्यावसायिक असा फरक करण्यापेक्षा त्या कलावंतांची माध्यमावर पकड आणि व्यक्त होणे किती आहे यावर त्यांचा भर होता. संगीताबद्दल बोलताना त्यांनी नाटकाचा 'साऊंड प्लॅन' तयार करण्यावर जोर दिला. अभिनयासंबंधी बोलताना ते म्हणाले की, आपण कलावंतांच्या कलाकृतीचा-अभिनयाचा आस्वाद घेतो, प्रतिसाद देतो; पण त्याला समजावून घेत नाही. भारतात चांगले नट बरेच आहेत पण श्रेष्ठ-उत्तम असा नट कोणी नाही असे प्रांजळ मतही त्यांनी मांडले.

खरे तर ही व्याख्याने समक्ष ऐकण्याचीच होती. कारण विधानाला-मताला पूरक म्हणून घेतलेली उदाहरणे आणि विश्लेषण अधिक मोलाचे होते. जे व्याख्यानाला आले त्यांनी हे जरूर अनुभवले असणार! ... □

चित्रपट

## 'भवानी जंक्शन'

### ना रहस्य-ना सूडकथा


भवानी जंक्शन हे एखाद्या रहस्यपटाला शोभेलसं नाव; पण हे नाव धारण करणाऱ्या चित्रपटात रहस्य वगैरे शोधून सापडणार नाही. तीच गोष्ट चित्रपटातल्या कलावंतांची. शशीकपूर, शत्रुघ्न सिन्हा, झीनत अमान, रती अग्निहोत्री अशी बडी-बडी, स्टारकास्ट मोडणारी नावं वाचून चित्रपटाला गेलं तरीही अशीच फसगत होते. निर्मात्या-दिग्दर्शकानं मोठ्या उत्साहानं चित्रपट काढला आहे खरा; पण रूढ अर्थानं मनोरंजन करणं काही त्यांना फारसं जमलेलं नाही. मग एकदम कुठलं तरी पात्र घुसडून किंवा अर्थाअर्थी काही संबंध नसलेला प्रसंग टाकून नाहीतर पात्रांना विनोदी अभिनय करायला लावून त्यांनी अशी नाही तर तशी तरी मनोरंजनाची सोय मात्र केलेली आहे!

जैनेंद्र जैन हे या चित्रपटाचे लेखक आहेत. या लेखकानं जेव्हा राजकपूरसाठी चित्रपट लिहिले तेव्हा ते बऱ्यापैकी जमले होते. इथं मात्र त्यांना काय झालंय ते कळत नाही. चित्रपटाची कथा सूडकथाच असली तरी रूढ अर्थानं त्याला नायक-नायिका नसल्यानं तो वेगळ्या वाटेनं न्यायला आणि फुलवायला चांगला वाव होता. प्रत्यक्षात मात्र सगळा आनंदी आनंदच आहे.

राम (शत्रुघ्न सिन्हा) हा सर्व गुणांनी परिपूर्ण असा पोलीस अधिकारी. चित्रपटाच्या सुरुवातीलाच त्याची पत्नी शकुन (रती अग्निहोत्री) हिच्यावर दोन गुंड, विकी (मजहर खान) आणि कुंदन (महेश आनंद) बलात्कार करतात. ती आत्महत्या करते; पण पुढे चित्रपटभर मात्र तिचा खून झालाय असा उल्लेख कायम येतो.

या लोकांनी गुन्हा केल्यावर काही पुरावे मागे ठेवलेले नसतात. रामच्या मुलाने त्या दोघांनाही पाहिलेलं असतं. त्यातल्या एकाच्या गालावर चाबकानं मारल्याची खूण आहे असं तो सांगतो आणि शोध घेत घेत राम शेवटी भवानी जंक्शन या गावाला येऊन पोचतो.

आता हे भवानी जंक्शन गाव भारतातलंच दिसत असलं तरी तिथं म्हणे भार-



ताचा कायदा चालत नसतो. तिथं चक्क भवानीप्रताप नावाचा (शशीकपूर) राजा वगैरे असतो. गालावर चाबकाची खूण असलेल्या लोकांमधून शोधाशोध करून राम विकीला शोधून काढतो. तो नेमका राजाचाच मुलगा. स्वत: गुंडांना अजिबात पाहिलं नसताना, काहीही पुरावा नसताना, स्वत:चा मुलगाही बरोबर नसताना राम विकीला नेमका शोधून काढतो हा भाग आता लेखकाचा कल्पनाविलास म्हणून सोडून द्यायचा.

विकी आणि कुंदनला भवानी जंक्शनच्या, बाहेर नेऊन कानून के हवाले करायचा रामचा बेत. भवानी प्रताप अगदी प्रामाणिक नीतीच्या गप्पा मारणारा असतो; पण हे सगळं राजा म्हणून. बाप म्हणून मुलाला वाचवायला हवं म्हणून तो रामच्या मागं लागतो. सगळं भवानी जंक्शन गाव विरुद्ध असताना राम शेवटी विकीला घेऊन जातो दरम्यान भवानी प्रतापनेच कुंदनला मारून त्याचं काम सोपं केलेलं असतं. शेवटी भवानी प्रतापही (का ते त्यालाच माहित) आत्महत्त्या करतो.

एकूण भरपूर गोंधळ हे या चित्रपटाचं वैशिष्ट्य. लेखक, दिग्दर्शक, कलावंत सगळे आपले काहीही करताना दिसतात. चित्रपटातलं रेश्मा (झीनत अमान) हे पात्र तर एकदम उपरं आहे. आकाशातून टपकावी तशी ती चित्रपटात अवतरते. ती कोण, कुठली, तिथं कशी, 'मेरा घर कभी बसाही नही था तो खाक कैसे होगा ?' इ. निराशावादी संवाद ती का बोलते वगैरे काही कळत नाही. पुन्हा ती सूड वगैरे घेऊ पहाणारी दाखवली आहे. ती कोण याचा पत्ता लेखकानं शेवटपर्यंत लागू दिलेला नाही. या 'रहस्यमय चित्रपटा'त रहस्य असेल तर ते एवढंच.

भवानी प्रताप हाही एक जाम गोंधळलेला माणूस. त्यानं राजा म्हणून वावरायचं का बाप म्हणून याचा खुलासा शेवटपर्यंत दिग्दर्शकानं त्याला केलेला नसावा. त्यामुळे विचारा चित्रपटभर दोन्ही भूमिका सांभाळताना त्यांची जाम कसरत झाली आहे आणि त्यात परस्परविरोधी वागून तो अजून घोटाळा करतो. त्याच्या मुलीच्या पळवापळवीचं प्रकरण चालू असतानाच मध्येच तो 'आम आदमी' म्हणून रेश्माला माझ्याशी लग्न करणार का म्हणूनही विचारतो ! तिकडे तो कुंदन विकी आणि राम असलेल्या खोलीला उगीचच लहर आल्यासारखी आगच लावून देतो. एकूण काहीही चाललेलं असतं.

असल्या चित्रपटात अभिनयाची अपेक्षा नसतेच. झीनत, शत्रुघ्न सिन्हा, शशीकपूर पुरेशा ठोकळेबाज चेहऱ्याने वावरले आहेत. शत्रुघ्न समोर आहे म्हणून की काय शशीकपूरने कमालीची आरडाओरड आणि हातवारे केले आहेत. रती अग्निहोत्रीचं काम पाहुण्या कलाकाराइतकंच आहे.

चित्रपटात नायक – नायिकेची गाणी नाहीत म्हणून नि:श्वास सोडावा तर उलट त्यामुळे भप्पी लाहिरीचं चांगलंच फावलंय. डोक्याला आणि कानाला त्रास होईल अशी भरपूर ठणठणाटाची तीन–चार नृत्यगीतं देऊन तो मोकळा झालाय.

एकूण 'भवानी जंक्शन' पाहिल्यावर रहस्य किंवा सूडपटापेक्षा विनोदी चित्रपट पाहिल्याचा अनुभव येतो !

—सीमा कुलकर्णी

डार्विनचे वेगळेपण हे की त्याने माणसाला 'माणूस' केले. मनुष्यात 'ईश्वरी' अंश आहे, तसेच कोणा एकाच्या पापामुळे मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, या दोन्ही धार्मिक असत्यांच्या मगरमिठीतून त्याने माणूस मुक्त केला.

पण भारतीय समाजाला ही मगरमिठी अजून पूर्ण सोडवता आलेली नाही. माणसातील जाती-पोटजाती थेट परमेश्वराने निर्माण केल्या आहेत अशी आपली श्रद्धा आहे.

म्हणूनच डार्विन चरित्राचा अभ्यास आज उपयुक्त ठरेल.

**चार्ल्स डार्विन**

**व्यक्ती, क्रांती आणि उत्क्रांती**

**लेखक : भा. रा. बापट**

डेमी आकार, पृष्ठे : १८२
भरपूर आकृत्या व साधार
विवेचनासह प्रकाशित झालेली
पहिली आवृत्ती.

**किंमत : रुपये बत्तीस**


शाळा कॉलेजच्या ग्रंथपालांनी
त्वरित मागणी करावी.

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ३०.

विज्ञान

# शाकाहारी मासे



मोठे मासे छोटचा माशांना खातात हे विधान सामान्यपणे बरोबर असले तरीही सरसकटपणे तसे म्हणता येणार नाही. कारण माशांच्या काही जाती अशा आहेत की त्या जातीचे मासे छोटचा माशांनाच काय पण इतर कोणत्याच लहान जलचरांच्या वाटेला जात नाहीत. केवळ पाण्यातल्या वनस्पती खाऊन हे मासे वाढतात. 'व्हाईट अमूर' किंवा 'ग्रास–कार्प' हा मासा शुद्ध शाकाहारी आहे. नद्या आणि तलावात आढळणारा हा मासा काय खाऊन जगतो याचा फारसा विचार आपण करण्याची गरज नव्हती. पण तो शाकाहारी आहे याचा मानवाने आपली एक समस्या सोडविण्यासाठी डोळसपणे उपयोग करून घ्यायला सुरुवात केल्यामुळे गेल्या काही वर्षांमध्ये ग्रास कार्प प्रकाशझोतात आला आहे. ग्रास कार्प केवळ पाणवनस्पती खाऊन जगतो. शिवाय तो इतका खादाड मासा आहे की ज्या जलाशयात त्याला सोडावे तेथील सर्वप्रकारच्या पाणवनस्पती तो हा हा म्हणता फस्त करतो.

चीन व सोविएत रशियामधील नद्यांमध्ये व सरोवरांमध्ये ग्रासकार्प मोठ्या संख्येने आढळतात. रावस माशासारख्या दिसणाऱ्या ग्रास कार्पची लांबी ४ फूटापर्यंत असते तर वजन ३० ते ३२ किलो असते. लांब आकाराच्या या माशाच्या पाठीचा व पंखांचा रंग गडद राखाडी असतो तर पोटाचा रंग चंदेरी असतो. पाणवनस्पती ओरबाडून चघळण्यासाठी त्याचे तोंड खालच्या बाजूस असते व वरचा जबडा मोठा व खालचा जबडा लहान असतो. चघळण्यासाठी आवश्यक अशा प्रकारची दातांची रचना असते. पाने तोडणे व ती चघळणे यासाठी दोन प्रकारचे दात जबड्यात असतात. थोडक्यात निसर्गाने या माशाला त्याच्या आहारविषयक सवयीला अनुकूल अशा सुविधा बहाल केल्या आहेत. या सुविधांचा उपयोग करून घेऊन ग्रास कार्प आपले खाण्याचे व्रत मनोभावे पार पाडत असतो.

ग्रास कार्प हा गोड्या पाण्यातला मासा आहे. अगदो लहान असताना तो पाण्यातील सूक्ष्म जंतू खाऊन जगतो पण सुमारे २ सें. मीटर वाढल्यावर तो पूर्ण शाकाहारी बनतो. जलाशयातील अनेक प्रकारच्या पाणवनस्पती खाण्याचा त्याचा झपाटा इतका मोठा असतो की काही वेळा मुद्दाम एखाद्या जलाशयात सोडलेल्या कार्पनी तेथील पाणवनस्पती खाऊन टाकल्यावर त्यांची उपासमार होऊ नये म्हणून गवत, हिरवा चारा व झाडांची पाने सुद्धा जलाशयात टाकावी लागतात. अगदी जनावरांना चारा घालावा त्याप्रमाणे. आपल्या वजनाच्या दुपटीपेक्षा जास्त पाणवनस्पती हा मासा फस्त करतो. म्हणजे खादाडपणात बकासुरालासुद्धा तो मागे टाकेल. त्याच्या आवडीच्या 'अझोला' सारख्या पाणवनस्पती असतील तर एक किलो वजनाचा कार्प रोज सुमारे पाच किलो अझोलाचा फडशा पाडतो.

खाण्याचा वेग जास्त असल्यामुळे ग्रास कार्पची वाढ सुद्धा झपाट्याने होते. थंड प्रदेशात त्याच्या वाढीचा वेग रोज ३ ग्रॅम्स तर उष्ण प्रदेशात तो ६ ते १० ग्रॅम्स इतका प्रचंड असतो. भारतात हे प्रमाण रोज ४ ते ५ ग्रॅम्स आहे. अल्पावधीतच कार्पचे वजन ३० किलोग्रॅम्सपर्यंत जाते व त्याचा खाण्याचा झपाटासुद्धा वाढतो. वजनदार मासा असल्यामुळे त्याला किंमत सुद्धा चांगली येते. व्यापारीदृष्ट्या ग्रास कार्प हा महत्त्वाचा मासा आहे.

मत्स्य संवर्धन व्यवसायात ग्रास कार्पने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. आग्नेय आशियातील देश व युरोपीय देशामध्ये या माशाला महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतामध्ये ग्रास कार्प प्रथम हाँगकाँगमधून इ. स. १९५९ मध्ये आणला गेला. कटक येथील सेंट्रल इन्लँड फिशरीज रिसर्च इन्स्टिट्यूटच्या 'पाँड कल्चर' विभागाने हा खादाड पाहुणा खास 'इंपोर्ट' करण्याचे कारणही तसेच होते. आपल्याकडील जलाशयात बेसुमार वाढणाऱ्या पाणवनस्पतींवर नियंत्रण ठेवण्याच्या महत्त्वाच्या कामावर त्याची नियुक्ती करण्यात आली.

आधुनिक युगामध्ये जलप्रदुषणामुळे अनेक आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्याचप्रमाणे गोड्या पाण्याच्या जलाशयात असंख्य पाणवनस्पतींची होणारी भरमसाट वाढ ही सुद्धा एक गंभीर समस्या आहे. या पाणवनस्पती सर्व जलाशय व्यापून टाकतात. हायड्रिला, सिरॅटो फायलम, व्हॅलिस्नेरिया, वुल्फिया, अॅझोला, स्पायरोडेला आणि लेम्ना या सारख्या व इतर अनेक प्रकारच्या पाण्यातील तणाने आज जगातील असंख्य जलाशय व्यापून टाकले आहेत. हे तण नष्ट करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे वाटते तेवढे सोपे नाही. कारण रासायनिक पद्धतीनी ते नष्ट केल्याने प्रदूषणाचा धोका वाढण्याची शक्यता आहे. यांत्रिक पद्धतीने तण नष्ट करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही.

पाण्यातील तण नष्ट करण्याचा 'ग्रास कार्प' हा कोणतेही 'साईड इफेक्टस' नसलेला सोपा, सुरक्षित व कमी खर्चाचा उपाय नाही काय? शिवाय तो उत्पन्न मिळवून देणारा आहे. म्हणजे आमके आम और गुठलीके भी दाम.

— डॉ. सुभाषचंद्र सारंग

# दीपावली शुभेच्छा

१. पद्माकर दि. सोहोनी, पुणे
२. डी. आर. पेंडसे, मुंबई
३. श्री. मुकुंद देवधर–विदुला देवधर, पुणे.
४. शहा न्यूज एजन्सी, परभणी
५. विवेक साप्ताहिक–मुद्रणालय, प्रभादेवी, मुंबई
६. मनोज कुलकर्णी, पुणे
७. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, पुणे
८. देशपांडे एंटरप्रायजेस, पुणे
९. जे. बी बागलकोटे, बडोदा
१०. सुरेश नावडकर, पुणे
११. आदर्श एजन्सी, पुणे
१२. अण्णा जोशी, पुणे
१३. पांडुरंग कि. शिंगे, मुदरगड
१४. डॉ धवल्स होमियोमिशन, माधवनगर
१५. चंद्रशेखर राजे, डोंबिवली
१६. प्रभाकर गद्रे–आशा गद्रे, मुलुंड
१७. कोल्हापूर सकाळ, कोल्हापूर
१८. सु. वि. मुळे, ठाणे
१९. पूना पॅटर्नस् अँड फाउंड्रिज प्रा. लि.
२०. पवन प्लॅस्टिक्स, पुणे
२१. मनोहर सोनवणे, पुणे
२२. उल्हास आणि पन्ना लुकतुके, पुणे
२३. अप्पा सलागरे, चिपळुण
२४. माधव भंडारी, पुणे
२५. रामदास टेमगिरे, सायन
२६. मिलिंद जोगळेकर, पुणे
२७. विंग कमा. देशपांडे
२८. प्रतिभा फिरोझ रानडे, मुंबई
२९. सुहास बाक्रे–माधवी बाक्रे, ठाणे
३०. जे. के. कुटे, कतार
३१. बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे
३२. महाराष्ट्र स्टेट फिनानशिअल कॉर्पोरेशन, मुंबई
३३. एच. आर. बर्वे, पुणे
३४. सु अ. राजगुरु, सातारा
३५. शरद जोशी, डोंबिवली
३६. काळे न्यूजपेपर एजन्सी, चादरबाजार
३७. शरद पवार–प्रतिभा पवार, मुंबई
३८. विजया देशमुख, अकोला
३९. शिवाजी सिताराम जवळकर, सोलापूर
४०. विनय गुणे, संगमनेर
४१. जे. एल. साबळे अँड असोशिएटस् डोंबिवली
४२. लोकसत्ता–इंडियन एक्सप्रेस, बडोदा
४३. प्रिंटरोल, नासिक
४४. शिरिष बर्वे, पुणे
४५. सुनील बेल्हे, पुणे
४६. बाबु उडुपी, पुणे
४७. यशवंत ठकार–सुजता ठकार, पुणे
४८. विनय सहस्रबुद्धे, मुंबई
४९. निनाद अॅडव्हरटायजर्स, मुंबई
५०. प्रमिला गोखले, मुंबई
५१. चिन्ह पब्लिकेशन्स, मुंबई
५२. सुर सिंगार संसद, मुंबई
५३. डायमंड टेक्सटाईल वर्क्स, इचलकरंजी
५४. पाध्ये पब्लिसिटी सर्व्हीस, दादर
५५. भारत फोर्ज कं. लि., पुणे
५६. स्टॅंडर्ड मेटॅलर्जिकल लॅबोरेटरी, पुणे
५७. हिंदुस्तान अॅडव्हरटायजिंग, पुणे
५८. आरती इंजिनिअर्स, पुणे
५९. थ्रीअॅडॉल, पुणे
६०. पूना पॅटर्नस् अँड फाउंड्रीज प्रा. लि., पुणे
६१. उत्तम जाहिरात वितरक, पुणे
६२. मे. एस. एन. धारपुरे, पुणे
६३. अक्षय एजन्सीज, पुणे
६४. पॉप्युलर ब्रेड फॅक्टरी, भुसावळ
६५. सारडा परिवार, नाशिक
६६. सुरेश खेर, पुणे
६७. वैभव बिल्डर्स, पुणे
६८. प्रोग्राफ अॅडव्हरटायजिंग, पुणे
६९. डॉ. लोहिया केंद्र, पुणे
७०. पूना ऑटोमोटिव्ह रेसिंग असो. पुणे
७१. कांचन खेतमले
७२. आर्ट अलोन, पुणे
७३. आशिश एंटरप्रायझेस, पुणे
७४. आईज अॅडव्हरटायजिंग, पुणे
७५. बँक ऑफ महाराष्ट्र, कर्वेरोड, पुणे
७६. स्टेप इन प्रोसेस, पुणे
७७. फोटोन ग्राफीक्स प्रा. लि., पुणे
७८. हॉटेल अश्वमेध, पुणे
७९. मेघना एंटरप्रायझेस, पुणे
८०. गुरुप्रसाद एंटरप्रायझेस, पुणे
८१. साकेत अॅडव्हरटायजिंग, पुणे
८२. वाय. एल. थत्ते आणि कं., पुणे
८३. सफायर अॅडव्हरटायजिंग, पुणे
८४. भवानी अॅडव्हरटायजिंग, पुणे
८५. क्लासिक, पुणे
८६. ग्राफीज, पुणे
८७. निको ट्रेडिंग, पुणे
८८. एस. एच. परांजपे, पुणे
८९. रमेश सोलंकी, पुणे
९०. विजय जैन, पुणे
९१. सुनील जैन, पुणे
९२. विजय बीडकर, पुणे
९३. हेमलता बीडकर, पुणे
९४ शा. न. तिळगुळकर, पुणे
९५. एस. व्ही. देवधर, पुणे
९६. सौ. चारुशीला कुलकर्णी, पुणे
९७. दत्तप्रसाद दाभोळकर, दिल्ली
९८. आर. एन. तावडे, पुणे
९९. मिलिंद देसाई, पुणे
१००. मृणाल देसाई, पुणे
१०१. अमृत पुरंदरे, पुणे
१०२. विरेंद्र भंडारी, पुणे
१०३. महेंद्र भंडारी, पुणे
१०४. डॉ. कांतिलाल भंडारी, पुणे
१०५. मिसेस व्ही. व्ही. देशपांडे, पुणे
१०६. व्ही. के. देशपांडे, पुणे

वरील सर्व व्यक्तींनी, संस्थांनी पाठवलेल्या दीपावली शुभेच्छा पत्राबद्दल आभारी आहोत.

**राजहंस प्रकाशन । साप्ताहिक माणूस । साप्ताहिक मुद्रण । पुणे**

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW - 28

## प्रकाशित झाले

खूप लहानपणी एक कविता वाचली होती
" वाटते सानुली मंद झुळूक मी व्हावे
घेईल ओढ मन, तिकडे स्वैर झुकावे "
आता 'सानुलं' होणं तर शक्य नाही. पण
झुळकेच्या प्रसन्नपणानं सभोवारच्या आयुष्याकडे,
त्यातल्या माणसांकडे बघणं शक्य आहे.
असं बघताबघता मला
'अय्याऽऽकेळी' म्हणून लाजत
केळी विकणारा फेरीवाला दिसला,
अंगणात शिरावं तितक्या सहजपणे वंगणात
शिरणारं पोर दिसलं,
घासाघीस करून अडीच रुपये डझनाची केळी
अडीच रुपयांनीच घेणारी गृहिणी दिसली,
इंग्लीशाळलेलं मराठी दिसलं,
'गोसुमारा' नावाचं घर दिसलं,
'फुरू फुरू फुरू फुरू मन लागे फुरफुरू'
अशा कविता रचणारा कवी दिसला,
पाळण्याचा पोवाडा करणारी गायिका दिसली,
आणि या सगळ्यात कुठेकुठे मला मीही दिसले.

या पुस्तकातल्या व्यक्ती आणि प्रसंग
मुळीच काल्पनिक नाहीत.
त्यांचे एखाद्या जिवंत किंवा मृत व्यक्तीशी
साम्य आढळल्यास तो अजिबात योगायोग
समजू नये !
झुळकेच्या नजरेनं दिसलेलं आयुष्य हे असं आहे !

# झुळूक

मराठी ललित लेखनात
महत्त्वाची भर टाकणारं पुस्तक

लेखिका : **मंगला गोडबोले**

किंमत : **रुपये पंचवीस**

वेगळ्या
विषयांवरची
राजहंसची
दोन
दर्जेदार
प्रकाशने

राजहंस प्रकाशित

१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

## प्रकाशित होत आहे

गर फरदौस बर रुए जमी अस्त .....
जमिनीवरचा स्वर्ग येथेच आहे
असे बेगुमान मगरूरीने सांगणारा लाल किल्ला

देशातील सर्वांस गरीब माणसाला विसराल
तर ते पाप ठरेल
हे सांगणारा गांधीजींचा राजघाट.

असे विरोधाभास बरोबर घेऊन राजधानी दिल्ली
दरक्षणी वाटचाल करते.
तुम्ही आम्ही गोंधळून जावे अशा
विस्मयजनक घटना
म्हणून दरक्षणी या दिल्लीत घडत राहतात.

दिल्लीच्या धमन्यातून फक्त राजकारण वाहते
आणि श्वासातून बाहेर पडत असतात
साऱ्या भारतावर राज्य करायचे
राजकारण्यांचे मनसुबे.
हे मनसुबे मनात बाळगून
येथे दरक्षणी
नवे फासे फेकले जातात.

अशा या दिल्लीत
गेल्या दशकात घडलेल्या तीन प्रमुख घटना.
– शरद जोशींचे आव्हान
– अप्पूचा अलिशान एशियाड
– नादिरशाहने शरमेने मान खाली घालावी अशी
३१ ऑक्टोबरची कत्तले आम
या घटनांचा जवळून पण तटस्थपणे
घेतलेला शब्दवेध

# बखर राजधानीची

लेखक : **डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर**